
# माणूस

जुलै ६४



# सवलतीच्या दोन आकर्षक योजना



## राजा शिवछत्रपती

भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

तिसऱ्या सचित्र आणि डी लक्स

आवृत्तीच्या छपाईस प्रारंभ.

प्रसिद्धी : डिसेंबर १९६४

दीड हजार पृष्ठांच्या ज्या साधार पण ललितरम्य शिवचरित्राने मराठी वाचकाला आजवर एक अपूर्व मोहिनी घातली,

जो ग्रंथ प्रत्येक मराठी भाषिकाच्या घरी असावा यासाठी आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी अव्वल आणि मातब्बर मंडळी लेखद्वारा, पत्रद्वारा, संभाषणातून वा भाषणातून आपला अमोल शब्द वेचीत आहेत,

तो हा ग्रंथ सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी माणसाला विकत घेऊन संग्रही ठेवता यावा म्हणून –**राजहंस प्रकाशन संस्था**

सवलतीच्या पुढील दोन योजना जाहीर करीत आहे.

**१ : राजहंस प्रकाशन संस्थेकडे पांच वर्षासाठी शंभर रुपयांची ठेव ठेवणारास हे संपूर्ण शिवचरित्र व्याजाच्या मोबदल्यांत विनामूल्य घरपोच दिले जाईल. पांच वर्षानंतर ठेव परत करण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील हवा असल्यास पत्रकाची मागणी संस्थेकडे करावी.**

**२ : या तृतीय आवृत्तीच्या संपूर्ण शिवचरित्र संचाची किंमत प्रसिद्धिनंतर रुपये पसतीस राहील. १५ सप्टेंबर १९६४ पर्यंत रुपये पंचवीस फक्त पाठवून प्रसिद्धिपूर्व ग्राहक होता येईल.**

**[ संच पोस्टाने हवा असेल तर रजि. पोस्टखर्चासाठी अडीच रुपये अधिक पाठविणे. ]**

ठेवीची वा प्रसिद्धिपूर्व ग्राहकाची रक्कम ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

चेक असल्यास शक्यतो पुणे-मुंबई येथील बँकेवरचा पाठवावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास वटणावळ ७५ न. पै. अधिक पाठवावेत.

चित्रकार दीनानाथ दलालांची शंभरहून अधिक रेखाचित्रे व आकर्षक मुखपृष्ठे, ऐतिहासिक स्थळांची व व्यक्तींची छायाचित्रे, पांढरा शुभ्र कागद, मोहोरदार छपाई, टिकाऊ बांधणी–या व इतर वैशिष्ट्यानी युक्त असल्याने, एका सुबक पेटीतून वाचकांच्या भेटीस येणारा हा संच म्हणजे प्रत्येक कुटुंबाचे, प्रत्येक ग्रंथालयाचे एक भूषणच ठरणार आहे.

## राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

वर्ष चौथे : अंक दुसरा

★

जुलै १९६४ : एक रुपया

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

दूरध्वनि : ५७३५९


१. **वर्गणीदारांस सूचना** : दीपावली व सर्व खास अंकासह माणूसची वार्षिक वर्गणी दहा रुपये व परदेशी पंधरा रुपये आहे.

२. **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस मासिक' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ न. पै. वटणावळ पाठवावी.

३. **अंक न पोचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविला जातो.

४. **लेखकासाठी** : स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

५. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

६. या मासिकात व्यक्त झालेली मते 'माणूस' मासिकाच्या चालकाची अधिकृत मते असतातच असे नाही.

७. **जाहिरातीचा व्यवहार** : हा परस्पर विश्वासाचा असतो. गिऱ्हाइकाच्या इच्छेनुसार जाहिरात छापण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. तरीही काही तांत्रिक अडचणीमुळे जाहिरातीत कमी जास्त फरक झाला तर त्याची जबाबदारी व्यवस्थापकांवर नाही.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि. ३८३ नारायण पेठ पुणे, येथे छापून ४१९ नारायण पेठ पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.





## स्वरूपदर्शन


व्यक्ती आणि वार्ता :

- प्रिय कमला
  :
- पं. नेहरूंचा वारसा आणि तरुण पिढी
  : **महेश जोशी**

कथा :

- यक्षप्रश्न
  : **स्नेहलता दसनूरकर**
- अभिनय
  : **श्री. वा. कुलकर्णी**

ललित लेख :

- गोवा साहित्य संमेलन : एक रसास्वाद
  : **डॉ. रंगनाथ देशपांडे**
- सवाई
  : **प. त्रिं. सहस्रबुद्धे**

कविता :

- **सुरेश भट, केशव मेश्राम, शरद ग. वाघ, रामकुमार, अरविंद लेले, सुधाकर देशमुख, मा. ल. व्यवहारे, शारदात्मज.**

पुस्तकपरिचय :

- नाझी भस्मासुराचा उदयास्त
  : **रा. म. शास्त्री**

समीक्षा :

- केळफूल, वैशाखातील वावटळ, रागिणी, काळा समुद्र, स्वर्ग दोन बोटे, पं. नेहरू जीवन-प्रसंग

विविध विषय विभाग :

- रंगभूमी : **रत्नदीप**
- चित्रपट : **काश्मिरकी कली**
- माहितीपूर्ण चौकटी, पत्रव्यवहार, इत्यादि

सजावट :

- मुखपृष्ठ : **अनंत सालकर**
- आतील रेखाटने : **सहस्रबुद्धे**

# पत्रव्यवहार

[ सौ. जयश्री खिरे यांची ' टेकण ' ही कथा गेल्या अंकात आम्ही प्रसिद्ध केली. लेखिकेला जे अभिप्रेत आहे, ते वाचकाला कितपत स्पष्ट झाले यासंबंधी आलेल्या पत्रांपैकी ही काही पत्रे—सं. ]

स. न. २ जून ६४

कथा पान ६४ वरील [ पृष्ठ २३ वरील एक प्रश्न ] या स्तंभातील पत्र आधी वाचले गेले आणि मग टेकण उत्सुकतेने ! या पत्राच्या व त्यावरील आपल्या मल्लीनाथीच्या संदर्भातच अर्थात पुढील वाचन झाले. आणि 'टेकण' मधील गूढरम्यता नाहीशी झाली. खरे म्हटले तर पान ६४ वरील टेकण देण्याची कथेला आवश्यकता नाही. त्याशिवाय ती वाचली असता थोडे गूढ रम्य वाटेल आणि म्हणूनच सुंदर !

आता लेखिकेला जे अभिप्रेत आहे ते या कथेतून स्पष्ट होते काय हा आपला प्रश्न ! सांगितल्याशिवाय होत नाही हे त्याचे उत्तर! पण बिघडले कुठे ? स्वतंत्रपणेही कथा चांगली आहे. अभिप्रेत आहे ते स्पष्ट न होताही !

मी पान ६४ आधी वाचले होते. त्यामुळे मला सस्पेन्स मिळाला असण्याची शक्यता लक्षात घेऊन एक छोटा प्रयोग करून पाहिला. आमच्या सौ. ला कथा वाचावयास सांगितले, पान ६४ ची कल्पना न देता ! तिचा अभिप्राय...कथा सुंदर आहे. पण...पण...कळत नाही...का कशासाठी ?...तेव्हा पान ६४ चे टेकण नसेल तर कथेतील अभिप्रेत अर्थ स्पष्ट होत नाही हेच खरे !

कथानायिकेबद्दल सौ. ला सहानुभूती वाटणे साहजिक आहे—सौ. लंगडी नाही... पण तेच... कौन्टरवर बसून पुस्तकांची देवाण घेवाण करण्याचे ग्रंथपालाचे काम करणारी आहे म्हणून.

पान ६४ वरील पत्रव्यवहारामुळे सौ. खिरे यांच्या कथेची सौंदर्यहानी झाली आहे असे मला वाटते !

प्रा. मधुसूदन गोखले
गारगोटी (कोल्हापूर)

स. न. ३ जून ६४

—टेकण वाचली. लेखिकेने कथा चांगली फुलविली आहे 'टेकण'चे प्रतीक योग्य निवडले आहे. पण कथेमधील 'ती' आणि हे 'टेकण' याच्यात यावी तशी सुसंगती न आल्यामुळे कथेचा शेवट कृत्रिम वाटतो. सूचकता मर्यादेबाहेर संकुचित झाल्यासारखी वाटते. कथेतील 'ती' एकाच पायाने 'थोडीशी' अधू आहे हे काही त्यावरून सूचित होत नाही, हे खरे. त्यामुळे अपंग जो 'पूर्णत्वाचा शोध' घेत असतो तो त्याच्या मनातच राहिल्यासारखा वाटतो. 'ति'च्या कमरेपर्यंत 'झुळुक' गेली असे वर्णन जिथे आहे, तिथेच 'एका अधूपाया'पर्यंत ती पोचली असती तर चांगले असते. हे लिहिल्याबद्दल लेखिकेने मला क्षमा करावी !

शरद काळे
पडेल (जि. रत्नागिरी)

स. न. १० जून १९६४

सौ. खिरे यांच्या 'टेकण' या कथेतून 'ती' अधू असल्याचे स्पष्ट होत नाही. म्युझियममधल्या शिल्पाच्या उल्लेखाने फार तर 'ती' आधार शोधीत असावी असा अर्थ निघू शकेल.

शाम सरवटे
नागपूर

स. न. १५ जून ६४

जून १९६४च्या आपल्या माणूस मधील 'टेकण' ही कथा वाचली. लेखिकेला जे अभिप्रेत आहे ते कथेतून स्पष्ट होत नाही. अंकाच्या शेवटी दिलेल्या लेखिकेच्या पत्रातूनच, लेखिकेला काय अभिप्रेत आहे याचा बोध झाला ! 'टेकण' कथेला पत्राच्या टेकणाची ही अशी आवश्यकता पडलेली पाहून मौज वाटली.

भास्कर ताम्हणे
भोपाळ

* *

स. न. ५ जून ६४

'माणूस'चा जूनचा अंक आवडला. हिटलरच्या जीवनावरील लेख तर सुरवात केल्यानंतर पुरा केल्याशिवाय खाली ठेववत नाही. अंकाची अंतरबाह्य सजावट छानच आहे. 'माणूस'चे वेगळेपण नजरेत भरते एवढे खरे !

अनंतराव पाटील
नागपूर

टेकणप्रमाणेच हिटलरच्या लेखासंबंधी आलेली अनेक पत्रे छापण्याचा मोह जागेच्या अभावी आवरावा लागत आहे. —सं.

स. न. ८ जून ६४

जूनचा 'माणूस' कालच भेटला. त्याचे स्वरूप मोठे आकर्षक वाटले. सजावटीच्या दृष्टीने पाहू गेल्यास त्यात बरेच कौशल्य पणाला लावल्याचे प्रत्ययास येते. छोटुकल्या कथा वाचताना वेळ कसा निघून जातो कळत नाही. पण या कथांबद्दल खटकणारी गोष्ट एवढीच की, त्या वाचायला अगदी लहान पडतात. या चिटेपणामुळे वाचकाचा बहुधा विरस होतो.

कवितांबद्दल लिहावयाचं म्हणजे, अलिकडे 'माणूस'मधे कविता वेगवेगळ्या पानांवर, जिथे जागा मिळेल तिथे छापल्या जातात. हे बरोबर दिसत नाही. त्यासाठी खास दोन पाने राखून ठेवल्यास सर्व कविता वाचकासमोर एकत्रित स्वरूपात येऊ लागतील व तुलनात्मक दृष्टीने कवितांचा आस्वाद घेण्याची सवय 'माणूस'च्या वाचकांना लागेल असे वाटते.

ललित सोनोने
गुंजी

[ सर्व पत्रलेखकांचे मन:पूर्वक आभार—सं.]

• • •

पंडित नेहरूंच्या

'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'

या पुस्तकातील एक प्रकरण....



# प्रिय कमला

: १ :

सप्टेंबर ४, १९३५; माझ्या पत्नीची प्रकृती जास्त बिघडल्याची बातमी येऊन थडकल्यामुळे अल्मोरा तुरुंगातून माझी एकाएकी सुटका करण्यात आली. दूर जर्मनीत बॅडनवायलर येथे एका आरोग्यधामात औषधोपचारासाठी तिला ठेवण्यात आले होते. अल्मोऱ्याहून प्रथम मोटारीचा व नंतर गाडीचा प्रवास संपवून दुसऱ्या दिवशी मी अलाहाबादला आलो व त्याच दिवशी दुपारी मी युरोपला जाण्यासाठी पुढे निघालो. कराची-बगदाद-कैरो-अलेक्झांड्रिया-ब्रिंडिसी हे अंतर विमानाने काटले आणि पुढे स्वित्झरलंडमधील बॅसलेपर्यंत आगगाडीने प्रवास केला. ९ सप्टेंबरला सकाळी मी बॅडनवायलरला पोहोचलो. अल्मोरा सोडल्यापासून सतत पाच दिवसांचा प्रवास होता हा.

कमलाच्या चेहऱ्यावर तेच तिचे नेहमीचे निर्भय स्मित मला दिसून आले. पण दुखण्यामुळे ती इतकी खंगलेली होती, की त्या प्रथमभेटीत अधिक काही तिच्याशी बोलणे शक्य नव्हते. पण मी आल्यामुळे तिला फार बरे वाटले असावे, कारण दुसऱ्या दिवशी तिच्या प्रकृतीत थोडी सुधारणा दिसून आली आणि नंतरही काही दिवस ही प्रगती टिकून होती. तिच्या सहवासाला मी कायमचा अंतरेन हा विचारच मला असह्य असल्याने, कदाचित् मी मनाची समजूत करून घेत असेन, की हळूहळू ती बरी होत आहे. कारण तसे पाहिले तर काळजी करण्यासारखी परिस्थिती कायमच होती. डॉक्टर मला धीर देत होते, त्यांची ती नेहमीच पद्धत असते म्हणा!

पण सध्या तरी जवळ येऊन ठेपलेले संकट टळले होते. खूप बोलत राहण्यासारखी मात्र तिची परिस्थिती नव्हती. आणि तिच्या चेहऱ्यावर थकवा दिसताच मीही माझे बोलणे आटोपते घेत होतो. अधूनमधून मी तिला एखादे पुस्तक वाचून दाखवी. पर्ल बक्ची 'गुड अर्थ' ही कादंबरी अशी तिला वाचून दाखवल्याचे आजही आठवते. तिलाही अशा वाचनात खूप गोडी वाटत होती. पण वरचेवर खंड पडत होता म्हणून एकूण वाचन काहीं फारसे पुढे गेले नाही.

राहत्या ठिकाणापासून कमलेच्या आरोग्यधामाकडे रोज सकाळ-संध्याकाळ माझी पायपीट चालू असे. मला तिला खूप काही सांगायचे होते, पण तिच्या प्रकृतीकडे पाहून मनाला आवर घालावा लागत असे. कधी जुन्या आठवणी निघत, कधी पुढे कायकाय करायचे याचे मनोरे रचण्यात वेळ निघून जाई. इतकी तब्येत काळजी करण्यासारखी असूनही तिचा आशावाद कायम होता. तिच्या डोळ्यातील चमक कमी झाली नव्हती, की तिचा उल्हास मावळला नव्हता. तिच्या समाचारासाठी येणाऱ्या मित्रमंडळींना तिच्या चेहऱ्यावरचे टवटवीत हास्य व तिच्या डोळ्यातली चमक पाहून मोठे आश्चर्य वाटत असे.

दिवस उन्हाळ्याचे होते. संध्याकाळी मी माझ्या खोलीत एकटाच बसून राही, किंवा गावालगतच्या शेतातून किंवा जंगलातून फिरायला बाहेर पडे. कमलेची विविध रूपे, तिच्या समृद्ध आणि खोल व्यक्तिमत्त्वाचे एकेक पैलू आठवू लागत. आज वीस-एक वर्षे आम्ही एकत्र काढली. पण या कालावधीत कितीतरी वेळा तिने मला आपल्या व्यक्तिमत्वातील काहीतरी नवीनच सामर्थ्याचा प्रत्यय दाखवून आश्चर्य करायला लावले असेल! तसा मी तिच्या पुष्कळच जवळ गेलो होतो, आणि पुढे पुढे तर तिला समजावून घेण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्नही करीत असे. माझ्या प्रयत्नाला पुष्कळ यशही आले असे वाटते; पण अशीही शंका येते, की खरोखरच मला तिची ओळख पटली की नाही? तृणांकुराप्रमाणे तिच्या अस्तित्वात असा काही तरलपणा होता, की जो जाणवायचा, पण स्पर्श करायला जावे तर हाती काही येत नसे. कधी तिच्या नजरेतून असा काही भाव ओसंडायचा, की वाटे एखादा परका माणूसच आपल्याकडे डोकावून पाहत आहे.

तिचे शालेय शिक्षण बेताचेच झाले होते. आधुनिकतेचा म्हणावा असा कुठलाच गंड तिला जडला नव्हता. तिच्या चेहऱ्यावरची पोरपणाची झाक कधीच कमी झाली नाही, पण जसजसे वय वाढत गेले तसतसे तिच्या डोळ्यात एक प्रकारचे गंभीर तेज व्यक्त होऊ लागले होते. एखाद्या शांत जलाशयात

वादळाचे थैमान चालू असावे असा भास तिचे डोळे पाहताना होत असे. तिची प्रकृती आधुनिक मुलीची नव्हती आणि आधुनिकतेबरोबर येणारा व्यक्तिमत्त्वातील एक प्रकारचा चचलपणाही तिच्या ठायी नव्हता. जरी आमच्या कुटुंबाला अवश्य तितक्या आधुनिक सवयी तिने आत्मसात् केल्या होत्या, तरी त्यामुळे तिच्या मूळ स्वभावात कसलाही फरक घडून आला नाही. ती खरोखरी भारताची एक सुपुत्री, विशेषत: काश्मीरची सुपुत्री होती–भावनाप्रधान पण अभिमानी; बालिश पण प्रौढपण अंगी बाणलेली; काहीशी खेडवळ पण शहाणी. ज्याच्याशी तिची ओळख नसे, किंवा ज्या व्यक्ती तिला आवडत नसत अशांच्या बाबतीत ती अबोल असे; पण तिच्या आवडीच्या मंडळीशी वागताना मात्र तिचा उत्साह ओसडून वाहत असे. ती दुसऱ्याविषयी एकदम काहीतरी ग्रह करून घेई. कित्येकदा ते चुकीचे व त्या व्यक्तीवर अन्याय करणारेदेखील असत. पण हे सहज बनलेले चुकीचे ग्रह सोडायला ती तयार नसे. यात अर्थात् कुठलीही दुष्टबुद्धी नव्हती. तिला एखादी व्यक्ती नाही आवडली, की ते तिच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसून येई. आणि ही आपली नावड लपवण्याचा तिनेही कधी प्रयत्न केला नाही. केला असता तरी तिला यश आले नसते. इतका सरलभाव मला इतरत्र अगदी क्वचितच अनुभवास आलेला आहे.

## : २ :

आमच्या लग्नानंतरचे ते सुरवातीचे दिवस आठवतात मला जरी तिच्याविषयी जबरदस्त आकर्षण वाटत होते तरी मी तिला माझ्या सहवासाचे जेवढे सुख द्यायला हवे होते, तेवढे देऊ शकलो नव्हतो. मी तिला जवळजवळ विसरलोच होतो असे म्हणायला हरकत नाही. माझ्या ध्येयस्वप्नाने माझ्या मनाचा त्याकाळी इतका ताबा घेतला होता, की भोवतालची जिवत माणसेही मला हाडामासाची न वाटता सावल्यासारखी हवेत तरगणारी भासत होती. स्वीकृत कार्याशिवाय अन्य विषय माझ्या मनात येत नव्हता. अहोरात्र मी या स्वीकृत ध्येयासाठी माझे सर्वस्व वेचत होतो. माझी सर्व शक्ती याच कार्याकडे लागून राहिली होती.

आणि तरीही मी तिला विसरू शकत नव्हतो. सुखाचे हक्काचे ठिकाण असे मला तेच एक होते. घर सोडून कामानिमित्त परगावी बरेच दिवस राहण्याचा प्रसग आला तर तिच्या आठवणीच्या सुखद सोबतीमुळे माझा शीण कमी होई आणि तिच्या भेटीच्या दिवसाची मी आतुरतेने प्रतीक्षा करीत राही. भेटीनतर माझ्यावर सुखाचा शिडकावा करून, माझ्या थकलेल्या शरीराला आणि मनाला पुन्हा ताजेतवाने करायला ती तिथे जागेवर नसती तर मी कुठे गेलो असतो ! काय केले असते !

तिने मला जे देऊ केले ते मी सगळे घेतले. मी त्याची परतफेड केली का ? मी उघडच अपराधी होतो आणि मी केलेल्या अपराधाची खत तिने बाळगली असावी अशी माझी कल्पना आहे. ती फारच अभिमानी आणि मनाला लावून घेणारी असल्यामुळे तिचे दु:ख तिने मला कधी सागितले नाही किंवा माझ्याकडून मदतीची अपेक्षाही कधी व्यक्त केली नाही. मी तिला अशी मदत केव्हाही आनदाने दिली नसती का ? माझ्याशिवाय दुसरा कोण तिला हवी असणारी मदत देऊ शकत होता ! आपल्या नवऱ्याची केवळ सावली म्हणून राहण्यापेक्षा त्याच्याप्रमाणेच आपणही स्वातत्र्यचळवळीत भाग घ्यावा अशी तिची इच्छा होती. स्वत:चे व्यक्तिमत्त्व स्वत:समोर आणि बाहेरच्या जगासमोरही सिद्ध करून दाखवावे, ही तिची सुप्त आतरिक प्रेरणा, माझ्या कार्यव्यापृततेमुळे माझ्याही काही ध्यानात येऊ शकली नाही. नाही तर तिला हवी तशी सधी प्राप्त करून देण्यात मला सुखच वाटले असते. त्यातून कधी ती आजारी तर कधी मी तुरुगात. त्यामुळेही तिच्यामाझ्यातला हा दुरावा कमी होऊ शकला नाही. टागोरांच्या 'चित्रा' नाटकातील चित्रा म्हणते, तशी ती मला जणू म्हणत असावी–'मी चित्रा आहे. कुणी देवता नव्हे की जिची पूजा करावी किंवा क्षुद्र पाखरू नव्हे की ज्याची उपेक्षा करावी किंवा तुच्छतेने ते झिडकारून टाकावे. तुम्ही पत्करलेल्या धोक्याच्या आणि साहसाच्या मार्गावर जोडीदार म्हणून तुम्ही माझा स्वीकार करणार असाल, तरच तुम्हाला माझ्या योग्यतेची खरी ओळख पटेल.' पण कमलाने हे कधी माझ्याजवळ शब्दाने व्यक्त केले नाही आणि तिच्या मनातला हा भाव माझ्याही ध्यानात यायला फार काळ लागला.

१९३० च्या सुरुवातीला काही काळ आम्ही दोघांनी एकत्र काम करण्यात घालवला. सहजीवनाचा एक नवाच अनुभव आम्ही घेत होतो. दोघेही आनदात होतो. पण राजकीय परिस्थिती निकराला पोचत होती. आणि हे सहवासाचे सुख लवकरच सपणार अशी चिन्हे दिसू लागली. शेवटी तसेच घडले; एप्रिल महिन्यात देशभर कायदेभंगाची चळवळ सुरू झाली आणि मी पकडला जाऊन तुरुगाच्या गजाआड पुन्हा कोंडला गेलो.

नैनीच्या तुरुंगात आम्हा सत्याग्रह्यांच्या कानावर बाहेरील घटना येत होत्या आणि त्यातील एक घटना ऐकून तर आमची हृदये अभिमानाने भरून आली. आमच्या डोळ्यात पाणी जमा झाले. माझे वडील माझ्या मागोमागच नैनीच्या तुरुगात आले होते आणि त्यानी सागितले, की या आदोलनात नेहरू कुटुंबातील सर्व स्त्रियानीही मोठ्या अहमहमिकेने भाग घेतला आहे ! देशभर सर्व थरातील लहानमोठ्या स्त्रिया, सरकारी बधने मोडून, स्वराज्याची प्रतिज्ञा घेण्यासाठी प्रचंड सख्येने सभा भरवीत होत्या. त्याना कोण प्रवृत्त करीत होते, त्याचे कार्यक्रम ठराविक वेळी, ठराविक शिस्तीने देशभर कसे पार पडत होते, याची आम्हाला काहीच कल्पना येत नव्हती कारण, सर्व पुरुष कार्यकर्तावर्ग तर तुरुगात होता. माझे वडीलसुद्धा स्त्रियाची कर्तबगारी पाहून थक्क झाले होते. तसे ते थोडे सनातनीच असल्याने घरातील स्त्रियानी उन्हातान्हात भररस्त्यावरून पोलिसाशी काही झटापट करावी हे त्याना तितकेसे पसत नव्हते. पण त्यानी वातावरण ओळखले आणि कुणालाच आडकाठी केली नाही. उलट आमच्या कुटुंबातील सर्वांनी या आदोलनात पुढाकार घेतला आहे याचा त्याना अभिमानच वाटत असावा, असे मला तुरुगातील त्यांच्या बोलण्यावरून कळून आले.

कमलाने या प्रसगी फार मोठी कामगिरी बजावली होती. अलाहाबादेतील सर्व अनुभवी पुरुष कार्यकर्तावर्ग तुरुगात असल्यामुळे शहरातील चळवळीची सूत्रे तिच्याकडेच आली. तिला अनुभव असा काहीच नव्हता. पण तिच्याजवळ तडफ भरपूर होती, कार्याची तळमळ होती. त्यामुळे काही दिवसातच अलाहाबादेत ज्याच्या त्याच्या तोंडी तिचे

नाव ऐकू येऊ लागले.

पुन्हा आमची भेट झाली ती वडिलांच्या अखेरच्या आजारपणात. आम्ही बरोबरीच्या नात्याने प्रथमच एकमेकांच्या इतके निकट येत होतो. काही महिने लोटले आणि विश्रांती-साठी आम्ही मुलीला घेऊन सिलोनला गेलो. लग्नानंतर विश्रांतीसाठी दोघे निघालो असा हा पहिलाच प्रवास, -आणि अखेरचाही ठरणारा! आम्ही परस्परांच्या खूप जवळ आलो होतो, मागचा सर्व काळ या नव्या नात्याच्या पूर्वतयारीचा काळ असावा असे वाटत होते.

आम्ही लवकरच परतलो. मी नेहमीच्या कामात व्यग्र झालो आणि लवकरच तुरुंगात जाण्याची पाळीही माझ्यावर आली. आता कुठली विश्रांती...एकत्र, एक भावनेने कार्य करण्याचे आमचे उभयतांचे स्वप्नही आता हवेत विरून गेले. कारण; थोडा मध्यंतराचा काळ सोडला, तर पुढची चार वर्षे मला तुरुंगा-तच काढावी लागल्याने, साध्या सहवासालाही आम्ही पारखे झालो होतो. आणि माझी शिक्षा संपवून मी बाहेर येणार तो कमलाचे हे गंभीर आजारपण!

३४ साली फेब्रुवारी महिन्यात मला अटक झाली तेव्हाचा प्रसंग मला आठवतो. कमला माझे कपडे वगैरे बांधून देण्यासाठी आतल्या खोलीत गेली. निरोप घ्यावा म्हणून मीही तिच्या मागोमाग आत गेलो. तिने मला एक-दम मिठी मारली आणि एकाएकी तिची शुद्ध गेली. तिला मूर्च्छा आली. हा नवीनच प्रकार होता. कारण, दु:खाचे कुठलेही प्रदर्शन न करता या जेलयात्रा हसतखेळत करण्याचे शिक्षण आम्ही दोघांनी अंगी बाणवले होते. काळाने ही काय पूर्वसूचना आम्हाला दिली होती का, की उभयतांची सुखासुखी भेट आता पुन्हा होणे नाही!

जेव्हा एकमेकांना आमची फार जरूर होती, एकमेकांतील अंतर जेव्हा कमी होत आले होते, तेव्हाच तुरुंगवासाने आमची फारकत करून टाकली. तुरुंगात यासंबंधीचे विचार नेहमी माझ्या मनात येत. पण पुन्हा संधी मिळेल, पुन्हा एकत्र येऊ अशी मला आशा वाटत होती. ही चार वर्षे तिने कशी काढली असतील! मला अंधुकशी कल्पना आहे, पण नक्की काहीच माहित नाही. कारण जेलमधल्या भेटीत आपली दु:खे लप-वून, आपण खूप आनंदात आहोत असेच भासवण्याचा दोघांचा प्रयत्न होता. पण एवढे नक्की, तिच्या मनात कसली खळबळ चालू होती, तिला कसलेतरी दु:ख बोचत होते. तिला स्वस्थता नव्हती. मला हे सगळे दिसत होते, कळत होते. बाहेर असतो तर तिच्या-साठी मी काही करूही शकलो असतो; पण तुरुंगातून काय करणार?

## : ३ :

बॅडनवायलर येथे एकांतात दिवस घाल-वीत असता माझ्या मनात अशी अनेक विचार-चक्रे चालू असत. तुरुंगामुळे मला ही एकट्या-नेच विचार करीत बसण्याची सवय जडली आणि बॅडनवायलर येथे तुरुंग नसला तरी अगदी एकटाच असल्याने ही जुनी सवय कायम राहिली. जर्मनी त्यावेळी नाझींच्या अमलाखाली होता. ज्याबद्दल मला मनापासून तिटकारा वाटत होता अशा अनेक घटना तेथे घडत होत्या. पण मी राहत असलेल्या 'ब्लॅक फॉरेस्ट'च्या कोपऱ्यातील या लहा-नशा खेड्यात नाझी पोचले नव्हते आणि त्यामुळे त्यांच्यापासून मला कसलाच उपद्रव होऊ शकला नाही.

शिवाय माझे मन वर्तमानकालात होते कुठे? ते वावरत होते भूतकालात — कमलाच्या आणि माझ्या संबंधाचा मागोवा घेत. अखेर कमला होती कशी? मला तिची ओळख पटली होती का? तिने तरी मला जाणून घेतले का? माझ्यावरोबर संसार करणे तसे कोणालाही अवघडच होते, कारण मी काही अगदी चारचौघांसारखा सरळ संसारी माणूस नव्हतो. माझ्यात काही वेगळे-पण होते, पण ते नेमके काय होते, माझ्या अंतरंगाची ओढ कोणती होती, हे माझे मलाच नीट कळले नव्हते. कमलाच्या आणि माझ्या स्वभावात काही साम्य असले तरी फरकही फार होता. म्हणूनच आम्ही एकमेकांना पूरक ठरू शकलो नाही. आमच्या दोघांच्या स्वभावातील तीव्रताच दोघांच्या घनिष्ठ मीलनात व्यत्यय आणीत होती. चारचौघां-सारख्या सामान्य सांसारिक आयुष्यावर संतुष्ट राहावे असे दोघांनाही वाटत नव्हते. मग दोघांनी एकमेकांच्या स्वतंत्र प्रेरणा ध्यानात घेऊन एकत्र राहण्याचे ठरवले तरच सुख! नाहीतर गैरसमज आणि त्रास हा अटळच होतो.

त्यावेळी हिंदुस्थानात आमच्या दोघांची एकत्र असलेली छायाचित्रे विक्रीसाठी बाजा-रात निघाली होती. त्यातील एका चित्रावर 'आदर्श जोडी' असे शीर्षक दिलेले होते. लोक आमच्या संसाराला आदर्श संसार समजत होते, पण हा आदर्श गाठणे आणि सांभाळणे किती भयंकर अवघड होते याची त्यांना काय कल्पना! तरीपण मला आठवते आहे, की सिलोनला आम्ही प्रवासात असताना, मी कमलाला सांगत असे— 'मतभेद असतील, अडचणी आल्या असतील; नियतीने आपल्या आयुष्याशी काही विचित्र खेळ केला असेल; मुळात संसार हाच एक चमत्कारिक संबंध आहे, आणि हजारो वर्षांच्या अनुभवानंतरही मानवी संसाराच्या या स्वरूपात काही फरक पडलेला नाही.— हे जरी सगळे खरे असले तरी तसे आपण स्वत:ला भाग्यवानच समजले पाहिजे.' आमच्या अवतीभवती कितीतरी संसार उध्वस्त झालेले आम्ही पाहिले होते; किंवा काही टिकून असले तरी त्यातला जिवंतपणा केव्हाच संपलेला आम्हाला दिसत होता. आम्ही भाग्यवान या अर्थाने की रागा-वलो, भांडलो तरी आमच्या संसाराला ही अवकळा प्राप्त झालेली नव्हती. आमच्या आतला प्रकाश टिकून होता, परस्परांच्या व्यक्तिमत्त्वातील नवनवीन आविष्कार कौतु-काने पाहत पाहत ऊर्वरित आयुष्याचा प्रवास करण्याची आमची उमेद आणि उत्साह कायम होता. कमलालाही मी सांगत असलेले सारे पटत होते.

हा मानवी संबंधांचा मूलभूत प्रश्न! किती महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा! पण राजकारणाच्या आणि अर्थकारणाच्या मोठ-मोठ्या वादवादंगात आपले याकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे असे वाटते. भारत आणि चीन यासारख्या प्राचीन संस्कृतीच्या देशात जुन्या काळी याकडे आजच्यापेक्षा अधिक लक्ष पुर-विले जात होते. अनेक दोष त्या काळच्या समाजरचनेत असले तरी व्यक्तीला एकप्रका-रची स्वस्थता त्यामुळे लाभत होती. हिंदुस्था-नातच हे घडते आहे असे नाही; इतर क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करणाऱ्या पाश्चिमात्य देशा-तही व्यक्तीचे स्वास्थ्य हरपले असल्याचे दृश्य दिसून येते. का स्वास्थ्य आणि प्रगती यांचा काही अंतर्विरोध असतो? एकासाठी दुस-

त्याचा त्याग करणे अवश्यच आहे काय? नसावे. स्वास्थ्य आणि प्रगती दोन्ही साधणे शक्य आहे. त्यासाठी आधुनिक विज्ञान आणि प्राचीन ज्ञान याचा काहीतरी मेळ घालणे अवश्य आहे; आणि हा मेळ आपण घालू शकलो नाही, तर मानवजात आज अशा अवस्थेला येऊन ठेपली आहे, की आजवरच्या सर्व प्रगतीचा, ज्ञानविज्ञानाचा, जुन्याचा आणि त्याबरोबरच नव्याचाही, विनाश आपल्याला उघडया डोळयानी पाहावा लागेल.

## : ४ :

मला येऊन महिना उलटून गेला होता. कमलाच्या प्रकृतीतही थोडीफार सुधारणा होती म्हणून मध्येच मी माझ्या मित्रमंडळींना भेटण्यासाठी, काही दिवसासाठी इंग्लंडला एक फेरी मारून आलो आठ वर्षांत तिकडे मी गेलो नव्हतो आणि मित्रांचा आग्रहही बराच चालला होता बरोबर इंदिरेलाही नेले होते.

बॅडनवायलरला परतलो तेव्हा हिवाळा सुरू झाला सारा निसर्ग बर्फाच्छादित होता. १९३५ चे ते अखेरचे दिवस होते. ख्रिसमस जवळ आला होता. पण मला आनंदाचा आणि उत्साहाचा स्पर्श नव्हता. कमलाची प्रकृती पुन्हा खालावत होती. माझ्या निवासस्थानाहून कमलाच्या आरोग्यधामात रोज बर्फ तुडवीत सकाळ संध्याकाळ मी जात येत होतो खरा; पण यावेळी बर्फाने गोठलेल्या निसर्गातून मला मृत्यूच्या थंड पावलाची चाहूल ऐकू येत आहे असा भास होत होता.

कमलाला मध्येच थोडे बरे वाटू लागले आणि बॅडनवायलरहून मला दुसरीकडे न्या असा तिचा आग्रह सुरू झाला. ती त्या ठिकाणाला कटाळली होती आणि त्याच आरोग्यधामातील एक रुग्ण मुलगा नुकताच मरण पावल्याचे तिला समजले होते. हा मुलगा कमलाला अधूनमधून फुलाची भेट पाठवीत असे आणि एक-दोन वेळा तो तिला समक्ष येऊन भेटूनही गेला होता. तशी त्याची प्रकृती पुष्कळच चांगली होती, त्याला बाहेर हिंडण्याफिरण्याचीही परवानगी होती. पण तो अचानक गेला खरा. कमलापासून ही बातमी लपवून ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण तिला ती कशीतरी समजलीच. आजाऱ्याला आणि त्यातल्या त्यात रुग्णालयात राहाव्या लागणाऱ्या आजाऱ्याला अतर्ज्ञानाचे सहावे इंद्रिय असते की काय, असा विचार सहज माझ्या मनात येऊन गेला.

जानेवारीत मी पॅरिस आणि लंडनची सहज एक छोटीशी सफर पुन्हा करून आलो. माझा गेलेला उत्साह पुन्हा येत होता. इतक्यात बातमी आली, की काँग्रेसच्या अध्यक्षपदावर पुन्हा माझी यावेळी निवड झालेली आहे. मला याची थोडीफार कल्पना होती. म्हणून मी कमलाजवळ हा विषय अगोदरच काढला होता. अध्यक्षपद स्वीकारायचे म्हणजे तिला अशा स्थितीत एकटीला सोडून जावे लागणार! मोठाच प्रश्न होता. अध्यक्षपदाचा 'नकार' देऊ नये असे कमलाचे निक्षून मत होते. एप्रिल महिन्यात काँग्रेस अधिवेशन आटोपल्यावर मी परत इकडे यावे असे आम्हा उभयतामध्ये ठरले.

जानेवारीच्या अखेरीस आम्ही बॅडनवायलरही सोडले, कारण स्वित्झरलंडमध्ये लॉसेनच्या नजिक असलेल्या एका विश्रांतिधामात कमलाची नवीन सोय झाली होती.

## : ५ :

हा बदल आम्हाला दोघानाही मानवला. मला हा भाग पूर्वीपासून ओळखीचा होता म्हणून घरच्यासारखे वाटले. कमलाच्या प्रकृतीत एकदम काही सुधारणा दिसण्यासारखी नव्हतीच. पण तसा धोकाही वाटत नव्हता हे खरे.

इकडे हिंदुस्थानात परतण्याविषयी मित्राची पत्रावर पत्रे येऊ लागली. माझी अस्वस्थताही वाढली, कारण तुरुंगवास आणि कमलाचे आजारपण यामुळे बाहेरच्या जगाशी माझा संबंध गेले काही महिने पार सुटला होता. आता मात्र मला स्वस्थ बसवेना. या एकांतवासातून बाहेर पडलेच पाहिजे अशी ओढ लागून राहिली.

मी डॉक्टराचा सल्ला घेतला; कमलाशी विचारविनिमय केला आणि एका डच कंपनीच्या विमानाचे हिंदुस्थानच्या प्रवासाचे तिकीट रिझर्व्ह करून टाकले. फेब्रुवारी २८ ही माझी निघण्याची तारीख होती. पण जाण्याचा सर्व बेत आधीपासून ठरलेला असतानाही निघायचा दिवस जवळ येत चालला, तसे कमलाला माझे जाणे मुळीच पसत नाही, असे माझ्या ध्यानात आले. मी जाणे रहित करावे असेही ती सांगेना. तरीपण मी तिची समजूत घातली—अधिवेशनाचे काम आटोपल्यावर मी इकडे परतणार होतो. आणि मध्येच तिला वाटले तर तिने केबल केल्यास मी आठ दिवसाच्या आत येथे सहज हजर राहू शकत होतो!

पण निघायच्या चार-पाच दिवसच अगोदर डॉक्टरानी मला सल्ला दिला, की मी माझे जाणे लांबणीवर टाकावे. का वगैरे त्यानी काही सांगितले नाही. त्याच्या सल्ल्याप्रमाणे मीही चटकन् विमानाचे पहिले तिकीट रद्द करून पुढच्या तारखेचे नवीन तिकीट काढून ठेवले.

हेही दिवस पार पडले. कमलाच्या प्रकृतीत बाहेरून तसा काही फरक जाणवत नव्हता. पण तिचे मन जागेवर नसावे. कारण 'कोणीतरी आपल्याला बोलवत आहे,' असे ती मला सांगत होती. खोलीत कसलीशी आकृती प्रवेश करीत आहे असाहि तिला भास होत होता.

इंदिरा यावेळी आमच्याजवळच होती. शेजारच्या बेक्स येथील शाळेत ती शिकत होती व मी जाणार म्हणून मुद्दाम येथे ४।८ दिवसासाठी राहायला आली होती.

२८ फेब्रुआरीची सकाळ उजाडली. मी व इंदिरा शेजारी होतोच; शिवाय या काळात मित्रासारखा ज्याचा आम्हाला सहवास होता ते डॉ. अतलही जवळ होते. पण कोणाचा काही उपयोग नव्हता. कमलाची प्राणज्योत मालवली होती!

जवळच्या गावातून आमचे काही मित्र होते ते ही बातमी कळताच लॉसेनला आले. कमलेचा देह आम्ही लॉसेनच्या स्मशानभूमीत नेला आणि तेथेच त्याला अग्नी दिला. काही क्षणातच त्या सुंदर देहाची, त्या गोड आणि हसऱ्या चेहऱ्याची रक्षा झाली आणि जे जिवंत आणि रसरशीत असे काही होते, ते एका निर्जीव कलशात केवळ अस्थिरूपाने साठवून ठेवले गेले.

## : ६ :

आता लॉसेनमध्ये किंवा युरोपातही मला बांधून ठेवणारा धागा तुटला होता. या घटनेचा माझ्या अंतर्मनावर काय परिणाम घडला हे त्यावेळी ध्यानात येणे शक्य नव्हते, कारण माझे जागृत मनच जागेवर नव्हते आणि विचारावरचा तावा सुटला होता. म्हणून मी

व इंदिरा मॉंट्रेक्सला निवांतपणासाठी काही दिवसासाठी राहायला गेलो.

मी मॉंट्रेक्सला असताना लॉसेनचा इटालियन कॉन्सल, सीनॉर मुसोलिनी याना या दु खाच्या प्रसगी माझ्याविषयी वाटणारी सहानुभूती व्यक्त करण्यासाठी मुद्दाम मॉंट्रेक्सला माझी भेट घेण्यासाठी आला. मला थोडे आश्चर्य वाटले. कारण यापूर्वी माझी व मुसोलिनीची कधीच गाठभेट नव्हती किंवा इतरही पत्रापत्री काही सबंध नव्हते. पण सहानुभूतीबद्दल आभारप्रदर्शन करणे माझे कर्तव्य होते आणि कॉन्सलमार्फतच माझा निरोप देऊन ते मी पार पाडलेही.

काही दिवसापूर्वी रोमला असणाऱ्या माझ्या एका मित्राकडून मला एक पत्र आले होते व त्यात सिनॉर मुसोलिनीना माझी भेट व्हावी असे वाटत आहे असे त्याने लिहिले होते. त्यावेळी मी कमलाला सोडून कुठे जाऊच शकत नव्हतो आणि तसे मी माझ्या मित्राला कळवूनही टाकले होते. नतर मी भारतात विमानमार्गे परतण्याच्या विचारात आहे हे कळल्यावर पुन्हा त्या मित्राचे पत्र आले व *वाटेत रोमला मुक्काम करून मी मुसोलिनीची भेट घ्यावी* असे त्याने फार आग्रहाने कळवले होते. एरव्ही मी, मला या माणासाविषयी वाटणारा तिटकारा बाजूस ठेवून, त्याची भेट घेतलीही असती; कारण हा हुकूमशहा कसा आहे हे पाहण्याची मलाही उत्सुकता होतीच. पण त्यावेळी इटालीने अॅबिसिनियावर आक्रमण केले होते आणि माझी मुसोलिनीशी भेट झालीच, तर त्यातून नाना तर्कवितर्क निघाले असते आणि फॅसिस्ट प्रचारानेही या भेटीचे बरेच भांडवल केले असते. आणि मग मी कानावर हात ठेवले असते, तरी त्याचा काही उपयोग झाला नसता. इटलीत काही भारतीय विद्यार्थ्यांचा, त्याच्या इच्छेविरुद्ध, त्याना माहित नसतानादेखील प्रचारासाठी इटालियन फॅसिस्टांनी असा उपयोग करून घेतल्याचे माझ्या कानावर आले होते. 'गिओरनेल डी इटालिआ' या पत्राने गाधीजींची एक खोटीच मुलाखत प्रसिद्ध केल्याचे उदाहरण तर अगदी ताजेच होते.

तरी पण गैरसमज होऊ नये, म्हणून माझ्या मित्राला प्रथम पत्राने व मागाहून फोन करून मी भेटीसाठी येऊ शकत नसल्याचे कळवून टाकले. ही सगळी निरोपानिरोपी कमलाचा मृत्यू घडून येण्यापूर्वी झाली होती. नंतर मी पुन्हा कळवले, की इतर कारणे काहीही असली तरी सध्या कमलाच्या जाण्यामुळे भेट इत्यादि कार्यक्रम करण्यासारखी माझी मन.स्थितीच ठीक नाही.

भारतात परतताना वाटेत रोमला मला काही वेळ थांबावे लागणारच होते; तेव्हा हा भेटीचा आग्रह पुन्हा होऊ नये, म्हणून ही सारी अगोदरची तजवीज आणि पत्रापत्री करून ठेवणे मला इष्ट वाटले.

मी मॉंट्रेक्सहून जिनिव्हामार्गे मार्सिलसला आलो व तेथून K. L. M. विमानाने पुढचा प्रवास सुरू केला. दुपारी ३-४ च्या सुमारास विमान रोमला पोचले असेल. विमानतळावर मी उतरलो तो तेथे मुसोलिनीच्या कॅबिनेट प्रमुखाचे एक पत्र मला इटालियन सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सादर केले. ते मुसोलिनीचे भेटीचे निमत्रण होते व त्याच सध्याकाळी सहा वाजता भेटीची वेळ नक्की करण्यात आली होती. मी माझ्या पूर्वी पाठवलेल्या पत्राची आठवण दिली. पण तो अधिकारी ऐकेना व '*सर्व कार्यक्रम आता निश्चित* झाला आहे; मी त्यात आता व्यत्यय आणू नये' असे तो आग्रहाने सागू लागला. इतकेच नव्हे, तर ही भेट घडून आली नाही, तर तो नोकरीवरून बडतर्फ होण्याचीही बरीच शक्यता होती असेही त्याने सागून पाहिले. "या भेटीचे आवाक्षरही वृत्तपत्रात येणार नाही, भेट फक्त काही मिनिटातच आटोपेल' असेही आश्वासन मला दिले गेले. केवळ हस्तादोलन आणि माझ्या पत्नीच्या निधनाबद्दल वाटणारा दुखवटा प्रत्यक्ष शब्दांत व्यक्त करणे, एवढाच या मुलाखतीचा हेतू आहे, हेही स्पष्ट करण्यात आले. एक तासभर अतिशय सौजन्यपूर्वक हा त्याचा आग्रहाचा आणि माझा नकाराचा कार्यक्रम सुरू होता. शेवटी तर ताण अगदी असह्य होऊ लागला होता. पण सुदैवाने तेवढ्यात भेटीची वेळ टळून गेली आणि मुसोलिनीच्या राजवाड्यात भेटीसाठी येऊ शकत नसल्याचे फोनने कळविले गेले. माझ्या नकाराला यश आल्याचे पाहून मीही सुटकेचा निःश्वास टाकला. मात्र विमानात चढण्यापूर्वी सिनॉर मुसोलिनीना एक खेदाचे पत्र पाठवून त्यानी दाखवलेल्या सहानुभूतीबद्दल त्याचे आभार मानण्यास मी विसरलो नाही.

माझा प्रवास पुढे चालू झाला. कैरोला काही जुने मित्र विमानतळावर भेटायला आले. नंतर मात्र मध्य आशियाच्या वैराण वाळवटातून सुरू झालेल्या प्रवासात मला कोणाचीच सोबत नव्हती. मला विलक्षण भकास व एकाकी वाटू लागले. आतापर्यंत प्रवासाची तयारी करणे, इतर अनेक व्यवस्था लावणे यात मन व्यग्र राहिल्याने हा एकाकीपणा जाणवला नाही. पण आता सारी खिन्नता दाटून आली. मी एकटाच माझ्या घरट्याकडे निघालो होतो. पण आता माझे 'घरटे' तरी कुठे होते ? माझ्याजवळ असलेल्या करंडीत कमलाच्या अस्थी ठेवलेला कलश होता. तेवढीच काय ती कमलाची आणि आमच्या रम्य स्वप्नाची शेष स्मृती ! 'कमला नाही' 'कमला नाही' असा आक्रोश माझे मन सारखा करीत होते

मला माझ्या आत्मचरित्राची आठवण झाली. ती आजारी असताना तिच्याशी मी यासबंधी बोलत असे. मधूनच एखादे प्रकरण तिला वाचून दाखवी. पण तिने असा न ऐकलेला किंवा पाहिलेला आत्मचरित्राचा भागच पुष्कळ होता. आता ती तो कधीही पाहू शकणार नाही. या आत्मचरित्रात आमच्या संसाराविषयी आणखी काही पुढील प्रकरणे लिहिली जावीत हेही नियतीने आता अशक्य करून टाकले होते.

बगदादला पोचलो आणि लंडन येथील माझ्या पुस्तकाच्या प्रकाशकाला आत्मचरित्राची अर्पण पत्रिका मी तारेने लिहून पाठवली. माझे आत्मचरित्र मी, 'कमलेला—जी आता नाही'—तिला अर्पण करीत होतो.

कराची आले आणि विमानतळापासूनच ती सुपरिचित गर्दी आणि ते परिचिताचे चेहरे दिसू लागले. तेथून पुढे अलाहाबाद. गगेच्या त्या पवित्र सगमावर कमलाच्या अस्थी आम्ही मोठ्या श्रद्धेने समर्पित केल्या. या गगामाईने अशा आमच्या किती पूर्वजाच्या अस्थी आणि रक्षा समुद्राकडे यापूर्वी वाहत नेल्या असतील ! आमच्या किती भावी पिढ्याच्या अनताच्या यात्रा तिच्या या विस्तीर्ण प्रवाहातून यापुढे पार पडणार असतील !

● ● ●

# पं. नेहरूंचा वारसा
## आणि
# तरुण पिढी

महेश जोशी

नेहरूंनी आपल्यामागे ठेवलेला वारसा कोणता ? हा वारसा जतन करण्याची, त्याची उत्तरोत्तर वृद्धी करण्याची कुवत आणि धमक सत्तारूढ काँग्रेसपक्षात, इतर विरोधी पक्षात किंवा सर्वसाधारण भारतीय समाजातच आहे काय ? या संदर्भात तरुण पिढीचे कर्तव्य कोणते ?

**अशी चर्चा पंडितजींच्या अचानक निधनानंतर 'माणूस'च्या लेखक-संपादक वर्गात सुरू होती.**

**या चर्चेत श्री. महेश जोशी यांच्या मतांना एक वेगळे महत्त्व होते. कारण नोकरी सोडून, त्यांनी पूर्ण वेळ राजकीय कार्य करण्यासाठी जाणीवपूर्वक नुकताच काँग्रेसप्रवेश केलेला आहे**


**त्यांच्या या लेखावरून काँग्रेस पक्षात नव्याने प्रवेश करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांच्या मनोगताचा वाचकांना चांगलाच कानोसा घेता येईल.**

**—संपादक**

अखेर नेहरू गेले आणि विनोबाजींनी म्हटल्याप्रमाणे लोकात्मा झाले. खरे म्हणजे नेहरू आपल्या जीवनातच सदैव लोकात्म भावनेने जगले. नेहरू आणि लोक हे कधीच दोन नव्हते. त्यामुळेच नेहरू लोकावर अनन्यसाधारण असे प्रभुत्व निरकुंश आणि निरपवाद रीतीने अखंडपणे ठेवू शकले; आणि लोकांनीही या प्रभुत्वापुढे प्रेमाने आणि हसतमुखाने मान तुकविली. नेहरूंनी भारतीय जनमानसावर टाकलेली ही अपूर्व मोहिनी संपूर्ण जगाच्या कौतुकाचा आणि आश्चर्याचा विषय बनलेली आहे. इतकेच नव्हे तर खुद्द नेहरूनाही लोकांवरील आपल्या या प्रभावाचा अचंबा वाटत असावा. कारण, त्यांनी भारताचे पतप्रधानपद स्वीकारल्यानंतर या प्रभावाच्या जोरावर कधीही लोकावर हुकूम गाजविला नाही; उलट, सदैव लोकाचा अनुनयच केला जगात क्रांतीचे पुढारीपण करणारे नेते सामान्यतः त्या क्रांतीचे जनकत्व स्वत कडे घेतात. नेहरूनी मात्र स्वत चा गौरव 'मी क्रांतीचे लेकरू आहे' अशा शब्दात करून घेण्यात धन्यता मानली ! क्रांती लोक करतात; नेते करीत नाहीत, अशी जी भावना 'मी क्रांतीचे लेकरू आहे' या शब्दामध्ये ओतप्रोत भरलेली आढळते ती नेहरूंच्या मनातील लोकनिष्ठेची पुरेशी निदर्शक आहे. आपल्यावर भारतीय जनतेचे अलोट प्रेम आहे आणि त्याबद्दल आपण तिचे सदैव ऋणी असले पाहिजे अशी निरागस कृतज्ञतेची धारणाच राजकीय पुरुषाना अशी विनम्रतेची वृत्ती बहाल करू शकते. देव आणि त्याचा भक्त याच्यामधील एकत्व हा जसा भक्तीचा आदर्श मानलेला आहे तसाच लोक आणि त्याचा नेता यांच्यातील एकत्व हा लोकशाहीचा आदर्श होय. भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जो पहिला पतप्रधान लाभला तोच मुळी या लोकशाही आदर्शाचा निष्ठावंत उपासक असावा, हे केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण मानवजातीचे भाग्य होय. लोकशक्तीचा असा पहिला निष्ठावंत उपासक अब्राहम लिंकन याच्या रूपाने जगाच्या पाठीवर वावरला आणि दुसरा उपासक, त्याच्यानंतर, नेहरूंच्या रूपाने जन्मास आला. लोकशाहीच्या अशा निष्ठावंत उपासकाच्या हाती भारताच्या राज्यशासनाची सूत्रे सोळा वर्षे राहिल्यामुळे या देशात गेली पन्नास-साठ वर्षे वसत चाललेली लोकशाहीची घडी सुस्थिर होऊ शकली, यात शंकाच नाही. या सोळा वर्षांच्या काळात भारतीय लोकशाहीला प्रौढत्व आले. दादाभाई–रानडे–गोखले–टिळक यानी लोकशाहीचा पाया रचला; तर नेहरूंनी लोकशाहीचा कळस बांधला, असे यथार्थतेने म्हणता येते.

लोकशाहीची एकनिष्ठ उपासना हा नेहरूंनी मागे ठेवलेला वारसा होय हा वारसा पुढे चालविण्याची कुवत आणि धमक भारतीयामध्ये किती आहे, याची कसोटी काळ घेणारच आहे अशी कुवत आणि धमक आपल्यात आहे की नाही आणि असेल तर ती कशी वाढवावयाची याचा विचार केलाच पाहिजे. पण तो विचार करण्यापूर्वी नेहरूंनी काय साधले नाही याचा प्रपंच आधी केला पाहिजे. त्यासाठी विद्यमान जग आणि त्यामधील भारताचे स्थान याचे आकलन करून घेतले पाहिजे.

*अतर्क्य ना झाले काही*
*जरी अकस्मात*



## आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांततेचा उद्घोष

आधुनिक जगाचा विचार करताना एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध यामधील ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ स्पष्ट केला पाहिजे. एकीकडे तंत्रवैज्ञानिक प्रगतींमुळे वाढीस लागलेल्या औद्योगीकरणातून निर्माण झालेली भांडवलशाही आणि दुसरीकडे या भांडवलशाहीच्या जोरावर प्रस्थापित झालेली साम्राज्यशाही यांना विरोध करणाऱ्या प्रवृत्तींचा उदय आणि उत्कर्ष या काळात झाला. भांडवलशाहीतून निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे निर्मूलन करून समतेच्या अधिष्ठानावर नवी राज्यव्यवस्था उभी करण्याचे साम्यवादी तत्त्वज्ञान आणि साम्राज्यशाही अंतर्गत वसाहतवादातून जन्माला आलेली राजकीय विषमता नष्ट करून स्वायत्त आणि सार्वभौम राज्यांची निर्मिती करण्यासाठी सर्व जगभर पसरलेले राष्ट्रीय आंदोलन ही दोन्ही ऐतिहासिक गरजांमधून निर्माण झालेली अपरिहार्य कार्ये होत. साम्यवादाचे तत्त्वज्ञान हे मूलतः अखिल मानवजातीतील शोषित वर्गाच्या प्रथमतः मुक्तीचे आणि नंतर वर्चस्वाचे विजीगीषु तत्त्वज्ञान होय. या तत्त्वज्ञानात राष्ट्रीय आकांक्षेच्या पूर्ती किंवा घोषणापेक्षा आंतरराष्ट्रीय जाणीवेच्या आणि प्रवृत्तींच्या स्वीकारावर आणि संवर्धनावर अधिक भर होता. या उलट, स्वातंत्र्याच्या हेतूने प्रेरित झालेल्या राष्ट्रीय आंदोलनात पृथक् पृथक् राष्ट्रभावनेला आद्य आणि अपूर्व असे स्थान चढत्या प्रमाणावर मिळत गेले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आधुनिक जग हे एकीकडे साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या आणि दुसरीकडे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनातून निर्माण झालेले आहे. संपूर्ण जगाची विभागणी भांडवलशाही आणि साम्यवादी अशा दोन गटांमध्येच होईल किंवा व्हावी अशी अपेक्षा आणि धारणा साम्यवादी तत्त्वज्ञानाने वाढीस लावलेली होती. परंतु इतिहासाचा स्वभाव हा अतर्क्य असल्यामुळे अखेरीस जगाची विभागणी भांडवलशाही, साम्यवाद आणि केवळ स्वातंत्र्याच्या भावनेने भारलेले छोटे मोठे तटस्थ राष्ट्रगट अशा त्रिविध स्वरूपाची झाली. या त्रिविध जगाच्या जोडीलाच तंत्रवैज्ञानिक प्रगतीमुळे संकोच पावलेले जगही निर्माण झाले. अशा जगाचे राजकारण भूतकाळातील अनुभवांच्या आधारे किंवा एखाद्या तत्त्वज्ञानाच्या आग्रही मार्गाने होणे शक्य नाही, अशी धारणा दुसऱ्या महायुद्धानंतरच्या चारपाच वर्षांतच उदय पावली आणि प्रबळ झाली. त्यामुळे जागतिक राजकारणात अगतिकता आली होती. ही अगतिकता मानवजातीला पुनश्च संहाराच्या खाईत लोटणार की काय अशी भयाकुलता सर्व जगाला खात होती. ही भयाकुलता अखिल

मानवजातीचे सर्व विधायक कर्तृत्व खच्ची करील असा धोका उघड उघड दिसू लागला होता. स्वतंत्र भारताचा आणि त्या द्वारे नेहरूंच्या नेतृत्वाचा जो उदय झाला तो या भयव्याकुल पार्श्वभूमीवर.

आणि पंडित नेहरू यानी भारताच्या वतीने पहिला उद्घोष जागतिक शांततेचा केला. या उद्घोषाला संपूर्ण जगातून जी प्रचंड साद मिळाली त्याचे रहस्य उपरोक्त भयव्याकुलतेतच आहे. पण पंडित नेहरू याना अभिप्रेत असलेली शांतता ही स्मशान शांतता नव्हती. त्यांची शांतता ही विधायक कर्तुत्वाची सुजलाम् सुफलाम् भूमी होती. या जागतिक शांततेच्या पोटात शोषित वर्गाच्या उत्थापनाची प्रेरणा होती, समतेच्या अधिष्ठानावरील नवसमाजरचनेची दृष्टी होती, पृथक् पृथक् राष्ट्रीय अस्मिताना सहिष्णु वृत्तीची जोड देऊन अखिल मानवजातीच्या एकतेची जोपासना करण्याची दुर्दम्य धारणा होती. जागतिक शांततेचे हे विधायक रूप हा काही नेहरूंच्या मनाचा खेळ नव्हता. गेल्या शंभर वर्षांतील इतिहासाने असे निक्षून सांगितले होते की, विषमतेच्या आधारावरील समाजव्यवस्था यापुढे टिकणार नाही, आंतरराष्ट्रीय शोषित वर्गाचीच केवळ नव्हे तर संपूर्ण मानवजातीची एकी झाल्यावाचून भागणार नाही, या एकीच्या प्रयत्नात राष्ट्रीय अस्मिताना पायदळी तुडवून चालणार नाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या लोकशाही धारणेचा बळी देऊन झालेली प्रगती कधीही चिरस्थायी होणार नाही. इतिहासाने दिलेले हे सर्व इशारे लक्षात घेऊन नेहरूंनी आर्थिक समता, राजकीय सहिष्णुता आणि व्यक्तिगत स्वतंत्रता यांचा समन्वय साधण्याचा ध्यास घेतलेला होता. जागतिक शांतता या समन्वयाचे एकमेव अधिष्ठान होय, अशी त्यांची मनोमन खात्री पटलेली असल्यामुळेच खरोखरी त्यांनी जागतिक शांततेचा अत्यंत उत्कटतेने आणि अत्यंत निर्धाराने पुरस्कार आणि प्रचार केला. जागतिक शांततेची प्रस्थापना ही विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील ऐतिहासिक गरज असल्यामुळेच पंडित नेहरू यांच्या शांततेच्या धोरणाला प्रतिष्ठा आणि जगन्मान्यता लाभली.

## राष्ट्रीय क्षेत्रात धर्मातीत राज्याचा स्वीकार

भारत स्वतंत्र झाला तोच मुळी खंडित होऊन. हिंदू आणि मुसलमान ही दोन वेगवेगळी राष्ट्रे आहेत या भ्रामक तत्त्वाचा काही अंशी जय होऊन हिंदुस्थानातील मुसलमानाचे एक वेगळे असे राज्य तयार झाले. पण या राज्याची स्थापना झाल्यानंतरही हिंदु-मुसलमानाचा प्रश्न सुटला नाही. हा प्रश्न चारशे वर्षांहून अधिक काल आपल्यापुढे आहे. या प्रश्नाला पहिल्या प्रथम हात घातला तो अकबराने. या दोन्ही जातीमध्ये सलोखा प्रस्थापित करण्याची जबाबदारी तत्कालीन राज्यकर्त्या मुसलमान जमातीच्या नेतृत्वाने आपली जबाबदारी आहे असे मानले होते. औरंगजेब हा हिंदुस्थानच्या इतिहासातील एक अपघात आहे. हा अपघात झाला नसता तर हिंदु-मुसलमानाच्या प्रश्नाला कदाचित् वेगळे वळणही लागले असते. असे म्हणण्याचे कारण हे की, औरंगजेबाच्या अमानुषतेला पायबंद घालण्याची प्रतिज्ञा केलेल्या शिवाजीमहाराजानी मुसलमानद्वेषाचा यत्किंचितही उपसर्ग आपल्या मनाला होऊ दिलेला नव्हता. याचा एक आनुषंगिक अर्थ असा की, या देशात मुसलमानी अत्याचाराची पराकोटी झाली असतानाही हिंदू समाजातील कर्त्या पुरुषांनी मुसलमानाविरुद्ध विद्वेषाची आग कधीच पेटविली नाही. १८५७ सालच्या ब्रिटिशविरोधी उठावात तर येथील मुस्लिम जमातीने मराठ्याचे नेतृत्व आपखुषीने पत्करले होते. आणि अगदी अलिकडच्या काळातही न्यायमूर्ती रानडे याच्यासारख्या ज्ञानमहर्षीने पुढाकार घेऊन 'आम्ही हिंदू असू वा मुसलमान—आमची पहिली आणि अंतिम निष्ठा ही भारताला वाहिलेली असली पाहिजे' असें नवे वळण या प्रश्नाला दिले होते. पण साम्राज्यशाहीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी परकीय सत्तेने या प्रश्नाचे रूप विकृत केले आणि पाकिस्तानची निर्मिती घडवून आणली. ही निर्मिती घडून आली तरी भारतीयत्वाची कल्पना ही धर्मातीत आणि पंथातीत आहे या भूमिकेचा विसर आम्हांस पडला नाही, हे खरोखर सुदैवच म्हटले पाहिजे. ही भूमिका राज्य चालविताना नेटाने आणि अनेकदा हिंदू समाजातील कडव्या धर्माभिमान्याचा रोष पत्करूनही पंडित नेहरू यानी कायम ठेविली. खरे म्हणजे लोकशाही ही बहुमतावर चालत असल्यामुळे जेथे जेथे अल्प-मतवाल्याना धोका वाटेल किंवा जेथे जेथे अल्पमतवाले दुखावले गेले असतील तेथे तेथे पंडित नेहरू यानी तातडीने धाव घेतली. या देशातील सर्व प्रकारच्या अल्पसंख्य लोकाचा विश्वास संपादन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे अशी धारणा नेहरूंच्या राष्ट्रान्तर्गत आचारविचारात प्रामुख्याने आढळते. पंडित नेहरूंच्याची ही भूमिका हिंदु—मुसलमानातील इतिहास-दत्त वैमनस्याची धार बोथट करणारी अशी होती. या निष्कलंक भूमिकेमुळेच आपल्या आयुष्याच्या अखेरीस शेख अब्दुला याची सुटका करून हा संपूर्ण प्रश्न झाले गेले सर्व विसरून, नव्या दृष्टीने आणि नव्या दमाने सोडविण्याचा निश्चय करण्याचे धारिष्ट्य त्याना प्राप्त झाले.

## हे यश !...

गेल्या दोनतीन वर्षांत जगाच्या राजकारणात एकीकडे साम्य-वादी गोटात चीन आणि मुसलमान जगतात पाकिस्तान एकाकी पडल्याचे जे स्पष्टपणे प्रत्ययास आलेले आहे ते नेहरूनीतीच्या प्रभावाचे उत्कृष्ट गमक होय. धर्माच्या नावाने 'पॅन्—इस्लामिझम्' आणि विचारसरणीच्या नावाने 'साम्यवादीकरण' असे जे दोन धोके आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेले होते ते नेहरूनीतीमुळेच टळले असे इतिहासाला म्हणावे लागेल. वर्णविद्वेषावर आधारलेला संघर्ष विकोपाला नेण्याचा जो अट्टाहास चिनी राज्यकर्त्यांनी चालविलेला आहे त्यास मुख्य अडथळा नेहरूनीतीचाच होय. या सर्व संघर्षांची बीजे जागतिक राजकारणात आहेत, हे लक्षात घेऊन त्यांच्या वाढीला प्रतिबंध करू शकेल असे सामर्थ्य राष्ट्रसंघाला प्राप्त व्हावे या तळमळीने आपली कुवत कमी आहे हे माहीत असूनही, त्यानी अनेकदा धाडसाची पावले टाकली. कांगोच्या प्रकरणात त्यानी घेतलेली भूमिका हे या संबंधातील अगदी ताजे उदाहरण होय. या सर्व प्रकरणी कोणत्याही तऱ्हेने पुढाकार न घेता संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तींना आणि शक्तींना पूरक आणि पोषक अशी भूमिका भारताचे हिताहित लक्षात घेऊन अत्यंत सावधगिरीने घेणे एवढेच आपले जागतिक संदर्भातील कार्य होय अशी खूणगाठ त्यानी आपल्या मनाशी बांधलेली असावी. राष्ट्राराष्ट्रातील मानसिक दुरावे आणि जगाच्या राजकारणात प्रभावी ठरणाऱ्या प्रवृत्तीतील बारकावे

अत्यंत डोळसपणे निरखून त्याच्या दृष्टीला अचूक वेध आला होता. या अचूक दृष्टीमुळेच भारत–चीन संघर्षातील पहिल्याच सशस्त्र चकमकीत अनपेक्षित रीतीने हार खाल्ल्यानंतरही ते आपला तोल सावरू शकले.

## आणि अपयश !...

भारत-चीन संघर्षात पहिल्याच फेरीत भारतीय सैन्याची नेफा आघाडीवर जी दाणादाण उडाली ती काही नेहरूंचे अपयश नव्हे नेफा आघाडीवर भारतीय आणि चिनी सैन्याची जी व्यूहरचना झालेली होती ती लक्षात घेतली तर भारताचा पराभव अटळच होता. नेहरूंचे अपयश कोणते हे जर समजावून घ्यावयाचे असेल तर या देशातील राज्यकारभाराकडे दृष्टि फेकावी लागेल. गेल्या सोळा वर्षात, देशाचा आर्थिक आणि औद्योगिक कायापालट करण्याच्या हेतूने, जी नियोजनाची परंपरा निर्माण झालेली आहे ती या नेहरूंच्या यशाची निदर्शक असेल, तर नियोजनाच्या अम्मलबजावणीतील शैथिल्य आणि वैफल्य ही नेहरूंच्या अपयशाचा डांगोरा पिटीत आहेत. या देशातील साम्राज्यशाहीचे हस्तक असे बिरुद ज्यांच्या ललाटी लिहिले गेले आहे अशा भांडवलशाहीला बांध घालण्याची जिद्द घेतलेल्या या अलौकिक लोकनेत्याचा पराभव ब्रिटिशांच्या परंपरेत वाढलेल्या आणि मुरलेल्या नोकरशाहीने चोरटेपणाने आणि कपटीपणाने केल्याचे दृश्य आज दुर्दैवाने पाहावे लागत आहे. नेहरूंना उघड उघड तोंड देण्याची धमक नसलेल्या भांडवलशाहीने नोकरशाहीला आपले हस्तक बनविले आणि आशियातील लोकशाहीच्या या बालेकिल्ल्याला आतून पोखरले. नवीन समाजरचनेच्या कार्यात कधी आडव्या तर कधी वाकड्या चालीने अडथळे निर्माण करणाऱ्या नोकरशाहीला वळणीवर आणण्याचे कार्य नेहरूंच्या हातून होऊ शकले नाही, हा निष्कर्ष बोचक असला तरी खरा आहे.

## बुद्धिवादी वर्गाकडून अपेक्षा

याचा अर्थ स्पष्टपणे असा होतो की, या देशातील लोकशाहीच्या उपासकाना नेहरूंचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील शांततेचे आणि राष्ट्रीय क्षेत्रातील धर्मातीत सलोख्याचे धोरण पुढे चालवावे लागेल आणि ज्या नोकरशाहीने नेहरूंचा पराभव करण्याचे करंटे चातुर्य दाखविलेले आहे त्या नोकरशाहीचा अंतर्बाह्य कायापालट करण्याचे नवे धोरण स्वीकारले पाहिजे. या तीनही क्षेत्रातील कार्य हे अत्यंत अवघड, अत्यंत जोखमीचे आणि अत्यंत गुंतागुंतीचे आहे. परिस्थिती प्रवाही असते. प्रवाही परिस्थितीत धोरणाचा लवचिकपणा नसेल तर एखाद्या भोवऱ्यात जाऊन पडण्याचा धोका असतो. हे भोवरे कळले पाहिजेत. केवळ कळून उपयोग नाही; ते टाळण्याचे कौशल्य हस्तगत केले पाहिजे. नेहरूंच्या नंतर राज्यकारभाराची धुरा ज्यांच्या शिरावर पडलेली आहे त्याना या बिकट वाटेची पूर्ण कल्पना आहे. सुदैव हे की, या देशातील विरोधी पक्षानी अत्यंत संयमाने आणि सहानुभूतीने सत्तारूढ पक्षाकडे पाहण्याची कुवत आपल्या ठायी आहे हे नेहरूंच्या मृत्यूनंतरच्या पहिल्या दहा-बारा दिवसात दाखवून दिले आहे. देशापुढे कोणती संकटे उभी आहेत आणि त्या संकटांतून तरून जाण्याचा मार्ग किती बिकट आहे याची जाणीव विरोधी पक्षालाही आहे हे त्यावरून सिद्ध झाले. नेहरूंच्या मृत्यूमुळे देशाचा कारभार ढासळेल आणि लोकामध्ये बेदिली माजेल अशी नाहक भीती परदेशात पसरलेली होती. अशी भीती पसरविणारे महाभाग दुर्दैवाने भारतीयच होते. ज्या लोकाच्या शहाणपणावर भिस्त ठेवून आम्ही येथे सार्वत्रिक मतदानाचा स्वीकार केला त्या लोकाचा शहाणपणा गेल्या सोळा वर्षात वाढण्याऐवजी खलास झाला अशी स्वत:ची समजूत करून घेतल्याशिवाय नेहरूनंतर हा देश रसातळाला जाईल असा भ्रम होऊ शकत नाही. गेल्या शे-सव्वाशे वर्षात राजा राममोहन रॉय याच्यापासून विनोबाजी याच्यापर्यंत ज्या अनेक विचारवंतानी या देशांतील अनिष्ट परंपराचा बीमोड करण्यासाठी आणि इष्ट विचारांचे पीक फुलविण्यासाठी आपल्या जीवाचा जो आटापिटा केला आणि जे रक्त आटविले ते सर्व वाया गेले असे मानल्यावाचून नेहरूनंतर या देशाला भविष्य नाही, असे कोणी म्हणू शकणार नाही. या देशातील लोकांचे शहाणपण आणि विचारवंताचे द्रष्टेपण अद्याप संपुष्टात आलेले नाही, अशी खात्री आम्ही नि शकपणे बाळगिली पाहिजे. ज्याच्या मनात अशी खात्री नाही त्याच्या मनात भारतीय समाजाविषयी गैरसमजांचे काटेरी रान माजलेले आहे, असे निखालसपणे सांगण्याची वेळ आता आलेली आहे. या देशात बुद्धिमेदी लोकांचा कधीच दुष्काळ नव्हता. अगदी महाभारतकालापासून याचा पुरावा उपलब्ध आहे. तसे नसते तर भगवान श्रीकृष्णाना ' नेणत्या कर्मनिष्ठांचा बुद्धिभेद करू नये ' असे आवर्जून सांगण्याची वेळ कदापि आली नसती. महाभारतकालात आणि आधुनिक काळात एकच फरक दिसतो. तो हा की, महाभारतकालीन बुद्धिभेद्याच्या आधुनिक वंशजांना बुद्धिवादाच्या आवरणाखाली प्रतिष्ठेची प्राप्ती झालेली आहे. या तथाकथित बुद्धिवाद्यांच्या आहारी न जाण्याचे धैर्य आणि सामर्थ्य आमच्या ठायी कसे निर्माण होईल, हाच खरा निकडीचा प्रश्न आहे.

आधुनिक बुद्धिवाद्यानी सत्तेचा विटाळ मानला आहे. राजकारणात सदैवच भल्याबुऱ्यांची जत्रा भरलेली असते, हे ध्यानात न घेता किंवा ध्यानात घेऊनही ते बुद्धिपुरस्सर विसरून जाऊन राजकीय पक्षांमध्ये सत्तेच्या आणि स्वार्थाच्या बेबंद उपासकांनी धुमाकूळ माडलेला आहे असे किटाळ त्यांनी अत्यंत अक्कलहुशारीने रचले आहे. सत्तारूढ पक्ष हा तर त्याच्या दृष्टीने अस्पृश्यच ठरलेला आहे. जणूकाही सत्तारूढ पक्षाचा स्पर्श होताच आमची सर्व पितरे नरकात जाऊन पडतील ! अखेरीस राजकारण हा समाजाचा आरसा आहे. जसा समाज तसे त्याचे राजकारण ! आहेत, या देशात सर्व प्रकारचे दोष आहेत. स्वार्थी आणि सत्तालंपट माणसांचा येथे तुटवडा नाही, भ्रष्ट आणि विघ्नसंतोषी शासकांना येथे फार मोठी मागणी आहे, ' मी आणि माझ्या पलिकडे मीच ' अशी ऐट मिरविणारे महाभाग येथे सर्वत्र राजरोस मिरवत आहेत. हे सर्व खरे आहे. पण त्याचा अर्थ असा नव्हे की, आम्ही त्याच्या दर्शनाने भयभीत होऊन संपूर्ण समाजाकडेच पाठ फिरवावी. हा शुद्ध भ्याडपणा आहे. या भ्याडपणाचे तत्त्वज्ञान होऊ शकत नाही. आणि याहीपेक्षा अत्यंत महत्त्वाची गोष्ट ही की, ज्यावेळी जाणते पळ काढतात तेव्हा मेकडाची पोळी पिकते. आज राजकारणामध्ये आणि समाजकारणामध्ये, कोणत्याही प्रकारच्या वैफल्याला आपल्या मनात थारा न देता, येणाऱ्या सर्व अडीअडचणीना, आपत्तीना आणि अपयशाना पायाखाली सारून निधडेपणाने कार्य करणारे जे अनेक निष्ठावंत आणि प्रामाणिक, धिटाईचे आणि कळकळीचे कार्यकर्ते

आहेत, त्यांना नव्या दमाने साथ देणे हेच खरे कार्य आहे. हे कार्य न करता तथाकथित बौद्धिक पातळीवरील शुद्ध मार्गदर्शनाचा वायफळ काथ्याकूट करण्यात कुठलाही पुरुषार्थ नाही.

जो नेहरूंचे नाव घेतो तो सत्तेला हपापलेला, जो विनोबांचे नाव घेतो तो बुळा, जो साम्यवादाचे बोल सांगतो तो देशद्रोही, जो शेतकरी कामगाराचा टिळा लावतो तो जातीय, जो हिंदीचा कडवेपणाने पक्ष घेतो तो वेडपट. मग नि.स्पृह कोण, मर्द कोण, जातीय नसलेला कोण आणि शहाणा कोण ? जो यापैकी काहीही करीत नाही तो ? ज्याला कशाचाच आग्रह नाही, कशाचीच आस्था नाही कशाचीच चाड नाही, तो ? की, एकाद्या परकीय राष्ट्राच्या पैशावर पुष्ट होणारा, इतर सर्वांना मूर्ख मानणारा आणि लोकशाहीची जपमाळ रात्रंदिवस ओढणारा तो ? बुद्धिवादाच्या नावाखाली कॉंग्रेस, सर्वोदय, साम्यवादी शेतकरी-कामगार पक्ष, समाजवादी आणि प्रजासमाजवादी पक्ष या सर्वांवर चिखलफेक करण्यात आणि तोंडसुख घेण्यात स्वतःच्या जीवनाची सार्थकता मानणारा तेवढा नि.स्पृह, मर्द, जातीय भावनेच्या पलीकडे गेलेला आणि शहाणा, आणि बाकी सर्व मूर्खांचे शिरोमणी असा समाज का आपल्याला हवा आहे ? हा प्रश्न आम्ही वारंवार विचारला पाहिजे. तसे केले नाहीतर तथाकथित बुद्धिवादाच्या मगरमिठीतून महाराष्ट्राची सुटका होण्याचा दिवस कधीच उगवणार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्व पक्षोपपक्षात जसे हिणकस द्रव्य आहे तसेच बावनकशी सोनेही आहे. आपला सपूर्ण समाजच चांगल्यावाईटाचे मिश्रण आहे. आपल्या समाजाची उभारणी समतेच्या पायावर झाल्याविना हे चित्र बदलणार नाही. हे चित्र बदलण्याचे आपापल्या परीने जे योग्य आणि व्यवहारी मार्ग वाटतील त्या त्या मार्गांनी जाण्याचा यत्न करणे हेच आजच्या परिस्थितीतील कर्तव्य होय. *कोणाला कॉंग्रेस तर कोणाला जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष योग्य वाट*तील. पण हा ज्याच्या त्याच्या पिंडाचा, परिस्थितीचा आणि प्रेरणांचा प्रश्न आहे. या ठिकाणी महत्त्वाचा मुद्दा एवढाच की, राजकारणात वावरणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी, मग तो कोणत्याहि पक्षाचा वा मताचा असो, अनादर व्यक्त करणे, त्याची टवाळी करणे वा त्याचा अव्हेर करणे हे सर्वस्वी चुकीचे आहे. 'नेणत्या कर्मानिष्ठाचा बुद्धिभेद करू नये' या वचनाचे मर्म आता सर्वांनीच ओळखले पाहिजे.

## निष्ठावंत कार्यकर्त्यांची पोकळी

—आणि सत्तेचा विचार बाजूला काढला तर राजकारणात काय उरेल ? राजकारण हा मुळातच सत्तेचा खेळ आहे. ज्याला सत्तेची रुची नाही, ज्याला सत्तेचे प्रलोभन नाही किंवा ज्याला स्वार्थासाठी सत्तेची गरज नसते असा माणूस राजकारणाकडे ढुंकूनदेखिल पाहणार नाही. त्यामुळे राजकारणात सत्ताबाजीचा नगा नाच सुरू आहे असे जेव्हा सरसकट म्हटले जाते तेव्हा राजकारणाचे मर्म आपण पुरेसे लक्षात घेत नाही. स्वतंत्र भारताच्या राजकारणात तत्त्वनिष्ठेपेक्षा संधिसाधुपणाला अधिक भरती आलेली आहे, हा आरोप मात्र बव्हशी मान्य करावा लागेल. हा आरोप करणारे डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारखे काही मोजके विचारवंत सोडले तर राजकारणात चांगल्या कार्यकर्त्यांची कशी वाण निर्माण झालेली आहे आणि ही वाण भरून काढण्यासाठी किती पद्धतशीर प्रयत्न करावा लागेल याची जाणीव फारच थोड्यांना आहे. राजकीय किंवा सामाजिक कार्यकर्ता आज ज्या मार्गाने पुढे येतो तो मार्ग कोणता आणि केवळ सत्तारूढ पक्षातच नव्हे तर सर्वच राजकीय पक्षात नवीन पिढीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांची कशी पोकळी निर्माण झालेली आहे, हे कोणी आणि कोणाला सांगावयाचे हाच मुळी प्रश्न आहे. मिळेल तो कार्यकर्ता हस्तगत करणे, आपल्या गावात आपल्या विरुद्ध जाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विरोधासाठी तो ज्या पक्षाचा असेल त्याच्या विरोधी पक्षात सामील होणे, आपल्या जातीच्या साह्याने एखादे स्थान मिळविणे, कोणाचा तरी छुपा हस्तक म्हणून राजकारणात वावरणे हे आणि यासारखे अनेक प्रकार गेल्या सोळा वर्षांत घडले आहेत. या बरोबरच कार्यकर्ते पक्षांची लेबले कधी तत्त्वाच्या आधारे तर कधी स्वार्थाच्या आशेने बदलत आहेत असेही दृश्य पाहावयास मिळाले. या सर्व प्रकारात असे झालेले दिसते की राजकारणातील कार्यकर्त्यांची संख्या मात्र फारशी वाढली नाही. अर्थात् राजकारण करण्याच्या ईर्ष्येने अनेक तरुण आपापल्या क्षेत्रात पुढे सरसावत होतेच. त्याची फारशी माहिती इतरत्र न झाल्यामुळे म्हणा, किंवा त्याना पुरेसा वाव न मिळाल्यामुळे म्हणा ते समाजापुढे आलेले दिसले नाहीत. असे तरुण आता हळूहळू उजेडात येतील. पण तेवढयाने भागेल असे नाही. राजकारणाची ओढ म्हणून पुढे येणाऱ्या विविध प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांमधून काही विशिष्ट हेतू डोळ्यापुढे ठेवून निवड झाली नाही तर मागचाच पाढा पुन्हा वाचावा लागेल. सर्वच राजकीय पक्षाना हा धोका दिसतो आहे हे त्यातल्या त्यात समाधान.

भारतीय राजकारणात तत्त्वनिष्ठेपेक्षा संधिसाधुपणाला अधिक भरती आलेली आहे, हा आरोप वेगळ्या शब्दांत सांगितला पाहिजे. राजकारण हा योग्यवेळी योग्य गोष्ट करण्याचा मार्ग आहे. या मार्गात संधी ही इतर कोणत्याही क्षेत्राइतकीच निर्णायक ठरणारी गोष्ट आहे. कधी कधी कधी तर जे अपरिहार्य आहे त्याचा स्वीकार करून आपले हित साध्य करण्यासाठी योग्य त्या संधीची वाट पाहणे एवढेच राजकारणी पुरुषांच्या हाती राहते. राजकारणाचे हे स्वरूप ओळखल्यावाचून राजकारणाविषयी व्यवहार्य विचार करता येत नाही. या राजकारणात समाजातील सर्व हितसबंधी गटाच्या हालचाली, कोणाला त्या कितीही अनिष्ट आणि घृणास्पद वाटल्या तरी, चालूच असतात. ज्या समाजात समतेच्या आधारावर नवी समाजरचना करण्याची ऊर्मी आणि आकांक्षा वाढीस लागलेली असते, त्या समाजात नवीन समाजरचना उभी करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या धोरणाचा अवलंब आणि अम्मल कसा करावयाचा हाही राजकारणाचा भाग असतो. खरे म्हणजे सर्वच विकासोन्मुख राष्ट्रात जीर्ण समाजव्यवस्थेतून उद्भवलेले हितसंबध आणि नवीन समाजरचनेच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या शक्ती *याचा कधी छुपा तर कधी उघड संघर्ष चालूच असतो. भारतीय राज*कारणात या दोन प्रवृत्तीचा संघर्ष गेली काही वर्षे चालू आहे. जे पक्ष स्वतःला पुरोगामी म्हणवितात त्याचा भर नवीन समाजरचनेच्या दृष्टीने एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या आधारे आपल्या धोरणाना आणि कार्यक्रमाना कोणती वळणे लावावी यावर असतो; तर या पुरोगामी धोरणाचा आपल्या हिताला बाध येणार नाही अशा रीतीने कसा प्रतिकार करावयाचा यात हितसंबंधी गटांचे सर्व लक्ष गुंतलेले असते. राजकारणाचा हा सर्व खेळ ध्यानात घेऊन नवीन समाज

रचनेच्या तत्त्वज्ञानावर निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांची फौज कशी उभारावयाची हा पुरोगामी पक्षाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न ठरतो. याचा अर्थ असा की, समाजातील राजकीय वातावरण आणि समाजरचनेचे नवे तत्त्वज्ञान यांची सांगड तत्त्वज्ञानाला धक्का न पोचता कशी घालावयाची हा प्रश्न पुरोगामी नेतृत्वाला सोडवावा लागतो. भारतात गेल्या सोळा वर्षांत सर्वच पुरोगामी पक्षानी आपापल्या परीने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण त्या सर्व प्रयत्नांवर राजकीय वातावरणाने सदैव मात केलेली आढळते. भारतीय राजकारणात तत्त्वनिष्ठेपेक्षा संधिसाधुपणाला अधिक भरती आलेली आहे या आरोपाचा खरा अर्थ असा आहे.

## काँग्रेस पक्षातील नवे प्रवाह

हा प्रश्न अत्यंत अक्राळविक्राळ स्वरूपात कोणत्या एका पक्षापुढे उभा राहिला असेल तर तो पक्ष सत्तारूढ पक्ष होय. काँग्रेस पक्षाने शांततेच्या मार्गाने नवीन समाजरचना करण्याचे ध्येय एकोणिसशेतीस सालापासून आपल्या डोळ्यापुढे ठेवले होते, हे खरे. पण स्वातंत्र्यपूर्वकालात समाजातील सर्व घटकाना काँग्रेस संघटनेत स्थान मिळालेले असल्यामुळे जेव्हा प्रत्यक्ष सत्ता या पक्षाच्या हाती आली तेव्हा या नवीन समाजरचनेच्या ध्येयाला आतरिक विरोध असणाऱ्या किंवा त्या धोरणावर पुरेसा विश्वास नसलेल्या लोकांनी काँग्रेस संघटनेतील आपले स्थान भक्कम करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. काँग्रेसमधील अशा गटाचा विरोध कमी कमी करत नवीन समाजरचनेच्या दृष्टीने पावले टाकण्याचा निर्णय करणे तत्कालीन पुरोगामी नेतृत्वाला भाग पडले. या बरोबरच या देशात काही काळ तरी समिश्र अर्थव्यवस्थाच ठेवावी लागेल असा मूलभूत निर्णय केल्यामुळेही सत्तारूढ पक्षाचे स्वरूप संमिश्र झाले. नवीन समाजरजनेचे ध्येय आणि समिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण यांची तडजोड करावी लागल्यामुळे काँग्रेसपक्षात पुरोगामी तत्त्वज्ञानावर निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांची काही अशी कुचंबणाच झाली. पण काही काळ ही तडजोड अपरिहार्य आहे ही धारणा बलिष्ठ ठरल्यामुळे काँग्रेसपक्षाला हे सर्व परिणाम भोगणे भाग होते. अर्थात् या परिस्थितीत ज्या प्रमाणात पुरोगामी पावले टाकणे शक्य होते त्या प्रमाणात ती पावले टाकण्याचा प्रयत्न नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसपक्षाने केलेला आहे. नेहरूंच्या नेतृत्वामुळे अत्यंत कठिण परिस्थितीतदेखील काँग्रेसपक्षातील पुरोगामी शक्तीची वाढ झालेली आहे. या वाढलेल्या शक्तीच्या आधारे आपल्या ध्येयाकडे अधिक विश्वासाने जाण्याचे धारिष्टय पुरोगामी दृष्टीच्या कार्यकर्त्यांना प्राप्त झालेले आहे.

१९७५ सालाच्या अखेरीस दर डोई वार्षिक उत्पन्न सुमारे पाचशे रुपयांच्या घरात नेण्याचा विचार करून १९५१ साली आम्ही नियोजनाच्या कार्याला आरंभ केला. हे उद्दिष्ट अद्यापही दृष्टीच्या टप्प्यात येऊ शकलेले नाही. औद्योगीकरणाचा आणि कृषिउत्पादनाचा-वाढीचा दर अपेक्षेइतका वाढला नाही. औद्योगिक वाढीचा दर अडीच टक्क्यावर आणि कृषिउत्पादनवाढीचा दर चार टक्क्यावर स्थिरावल्यासारखा दिसतो आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात दरवर्षी दोन टक्क्यांची भर पडत आहे. हे सर्व दृश्य चिंताजनक होय. गेल्या १५-१६ वर्षांत देशात वाढलेली संपत्ती समाजातील वरच्या थरात विभागली गेली आहे. आणि खालचा थर नियोजनाच्या फळांना वंचित झालेला आहे. नियोजनाची कागदी घोडदौड वेगाने होत असली तरी नियोजनाचे कार्य प्रत्यक्षात ती घोडदौड दाखवू शकत नाही. समाजातील असंतुष्ट वर्गाची सहनशीलता कमालीबाहेर ताणली गेली आहे. सत्तारूढ पक्षाला या परिस्थितीची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. किंबहुना, या परिस्थितीला काबूत आणून संसदीय लोकशाहीच्या मार्गाने समाजातील आर्थिक विषमतेचा वाढता ओघ रोखण्याचे सामर्थ्य सत्तारूढ पक्षात पुढील पाच-दहा वर्षांत निर्माण झाले नाही, तर या देशातील सर्वसामान्य लोकांचा लोकशाही मार्गावरील विश्वास अनाठायी होता, असा निष्कर्ष काढावा लागेल. लोकशाही एकदा मान्य झाली की, ती सदैव स्थिरपद झाली, असे नाही. लोकशाहीचा धर्म सदैव राखावा लागतो. या देशातील बहुसंख्य लोकांच्या किमान गरजा भागविण्याचा आणि देशातील वाढत्या संपत्तीचा लाभ समाजातील खालच्या आणि मधल्या थरांना मिळवून देण्याचा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविणे हाच या देशातील लोकशाहीचे रक्षण करण्याचा आजच्या परिस्थितीत शक्य असलेला एकमेव मार्ग आहे. काँग्रेसपक्षाला या वस्तुस्थितीची पूर्ण जाणीव झालेली आहे, हे भुवनेश्वर ठरावावरून स्पष्टपणे दिसून येते.

## महाराष्ट्र काँग्रेस

महाराष्ट्रापुरतेच बोलावयाचे झाले तर असे म्हणता येते की, येथील काँग्रेसपक्षाच्या नेतृत्वाला आणि बहुसंख्य कार्यकर्त्या वर्गाला या वस्तुस्थितीची अत्यंत तीव्र जाणीव झालेली आहे. गेल्या सोळा वर्षांतील अनुभवांच्या आधारे निर्भीड आत्मनिरीक्षण सुरू झाले आहे. आमचे नवीन समाजरचना करण्याचे कार्य अधिक प्रभावी व्हावे यासाठी काय करावे, हे तपासून पाहण्याची मानसिक तयारी महाराष्ट्रातील काँग्रेस नेतृत्वाने केलेली आहे. नियोजन कार्यातील किंवा दारूबंदीसारख्या कायद्यातील मूळ हेतूची पूर्ती का झाली नाही आणि त्यात कोणते दोष शिरले हे उघडया डोळयानी पाहण्याचे आणि मोकळया मनाने मान्य करण्याचे धारिष्टय महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व नव्या उमेदीने दाखवू लागले आहे. राजकारणाविषयी विचार करणाऱ्याना या उमेदीत नवा दिलासा दिसतो आहे. तरुण पिढीतील सुबुद्ध आणि समंजस कार्यकर्त्यांना काँग्रेसपक्षाकडे आदराच्या भावनेने पाहता येईल, अशी ही उमेद आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसपक्ष काही नवी उमेद उराशी बाळगून कार्यप्रवण झालेला आहे म्हणून महाराष्ट्रातील तरुणांनी काँग्रेस पक्षाकडे धाव घ्यावी, अशी जाहिरात देण्याचा हा प्रकार नाही. अशा जाहिराती वाचून किंवा ऐकून कोणी कोणाकडे धाव घेईल असा काळ राहिलेला नाही आणि तरुण पिढी तर भावी आश्वासनाच्या जाहिरातीना विटून मुख्यत: आपल्या पोटापाण्याचा प्रश्न जास्तीत जास्त चागल्या रीतीने सोडविण्याच्या कार्यात मग्न झालेली आहे. हे स्वाभाविकही आहे. समाजातील दारिद्रय नष्ट करण्यासाठी नियोजनाचा घाटच जेथे आम्ही घातला आहे तेथे आपले उत्पन्न वाढविण्याच्या मार्गाला तरुण पिढी लागली तर त्यात आश्चर्य नाही. स्वातंत्र्योत्तर कालात भूतकाळातील त्यागाचे पारितोषिक मिळावे म्हणून त्यागी कार्यकर्त्यांमध्ये जी चुरस लागली होती त्या चुरशीचा देखावा पाहून त्यागाच्या उदात्त कल्पनेवरील सर्वसामान्य माणसाचा विश्वासच उडून गेला. पण विशेषत: तरुण पिढी-

वर या आपल्या त्यागाचे भांडवल करून जगणाऱ्या लहानमोठ्या पुढारी वर्गाने फार मोठे उपकार केले असे म्हटले पाहिजे. कारण, त्यांच्या दर्शनाने खोट्या त्यागाच्या कल्पनेचे तरुण पिढीच्या मनातून कायमचे उच्चाटन झालेले आहे. अशी ही तरुण पिढी जवळ करणे हे केवळ काँग्रेसपक्षाच्या दृष्टीने नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांच्या दृष्टीने अत्यंत कठिण पण महत्त्वाचे असे कार्य आहे. हे कार्य जाहिरातीनी होणार नाही. पण, काँग्रेसपक्ष, निदान महाराष्ट्रातील काँग्रेसपक्ष, कोणत्या दिशेने विचारशील झालेला आहे हे सागणे आणि कोणी ते सागितले तर ते समजावून घेणे हे महाराष्ट्रातील राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या वर्गाच्या दृष्टीने आवश्यक आहे. ज्या कोणाचा पिंड दमादमाने नवी समाजरचना करण्याला अनुकूल असेल त्याने काँग्रेस पक्षाच्या नजीक यावयास आजची वेळ सर्वस्वी योग्य वेळ आहे, एवढे मात्र सागितलेच पाहिजे.

## कार्यकर्त्यांची उणीव : नोकरशाहीला संधी

सत्तारूढ पक्ष आणि तरुण वर्ग या दोघांनीही लक्षात घ्यावा असा महत्त्वाचा मुद्दा या सर्व विवेचनातून निर्माण होतो तो हा की, *नियोजनाचा अम्मल आणि व्याप जसजसा वाढत जाईल तसतसा* सार्वजनिक क्षेत्राचा व्यापही वाढत जाईल. हा व्याप वाढत असताना सार्वजनिक क्षेत्रातील सर्व थरावरील औद्योगिक मडळे किंवा तत्सम सस्था याच्या सचलनासाठी पक्षाच्या ध्येयधोरणाची कदर बाळगणारे लहानमोठे सचालन निर्माण झाले पाहिजेत. पक्षाचे राजकारण चालविणारा कार्यकर्ता आणि सार्वजनिक क्षेत्रातील कार्याची धुरा उचलणारा कार्यकर्ता असे दोन प्रकारचे कार्यकर्ते तयार होण्यावरच नियोजित अर्थव्यवस्थेचा प्रपच लोकशाही मर्यादाचे उल्लघन न करता चालविता येईल की नाही हे अवलबून आहे. सध्या सार्वजनिक क्षेत्राचा कारभार सर्वस्वी नोकरशाहीच्याच हाती आहे असे नाइलाजाने म्हणावे लागते. नोकरशाहीच्या हाती नियोजन गेल्यामुळे मूळ हेतूचा कसा विपर्यास होतो याची दोन ठळक उदाहरणे देता येण्याजोगी आहेत. कृषी आणि ग्रामीण विकासाची नवीन यत्रणा उभारण्यासाठी समाजविकास योजनेअंतर्गत विकासखडाची स्थापना झाली. या विकासखडामार्फत ग्रामीण विभागाचा सर्व क्षेत्रातील विकास एकममयावच्छेदे घडवून आणावा अशी धारणा यामागे होती. त्यावेळी या विकासखडाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा प्रश्न आला त्यावेळी महसूलखात्यातील अनुभवी नायब-तहसीलदाराची नेमणूक केल्यामूळे हे काम अधिक चांगल्या रीतीने करता येईल अशी भूमिका नोकरशाहीने घेतली. आणि मग जे घडू नये ते घडले. महसूलखात्याचे सर्व परपरागत दोष विकासयत्रणेत शिरले. विकासयत्रणा ही स्वतंत्र यंत्रणा न होता महसूलयत्रणाची व्यवहारतः एक शाखा झाली. विकास यत्रणेच्या द्वारे लोकाचा उत्साह वाढीस लावण्याचा मूळ उद्देश विस्मृतीच्या दरीत फेकला गेला. आता या समाजविकासखडामधील नियोजनाचा विचार करताना महसूल खात्याचा हा प्रभाव कमी कमा करावयाचा असा नवाच पण अत्यंत कठीण असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. हा प्रश्न सोडविल्याशिवाय विकासखंडाचा मूळ हेतू सिद्धीस नेणे अशक्यप्राय झालेले आहे. दुसरे उदाहरण औद्योगिक क्षेत्रातील घेता येईल. सार्वजनिक क्षेत्रात उद्योगधंद्याची स्थापना नेटाने केल्यानतर त्याचे सचालन कोणाकडे द्यावयाचे असा प्रश्न आला. हा प्रश्न इतका बिकट होता की, अखेरीस भारत सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी कोणाची तरी नेमणूक या उद्योगधद्याच्या सचालकपदी झाली पाहिजे असे वाटू लागले. कारण, भारत सरकारच्या सपूर्ण यत्रणेची आणि धोरणाची माहिती जेवढी सचिव वर्गाला असते तेवढी कोणालाही नसते अशी समजूत शासनयत्रणेत दृढमूल झालेली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधद्याच्या संचालक मंडळात अशा रीतीने वरिष्ठ आय. सी. एस. अथवा आय. ए. एस. कर्मचाऱ्याची वर्णी प्रथम लागून गेली. आणि मग सरकारी यंत्रणेच्या शिरस्त्यानुसार सरकारी नोकराची संख्या सार्वजनिक क्षेत्रात वाढतच गेली. परिणाम काय झाला! मजुराचे हितरक्षण करण्याचा ध्यास घेतलेल्या सरकारच्या अधिकारक्षेत्राखालील असलेल्या सार्वजनिक उद्योगधद्यात मजूरविरोधी धोरणाचा शिरकाव झाला. मजुराच्या मागण्या पूर्ण न झाल्यामुळे किंवा त्यांच्या हिताची काळजी न घेतल्यामुळे असंतोष वाढू लागला. अनेक ठिकाणी सार्वजनिक उद्योगधद्यात सपाचा अवलब करण्याची पाळी मजूरवर्गावर येऊन ठेपली. हे जे दोन प्रकारचे विपरीत परिणाम दिसून येतात ते का, *याचा सखोल विचार झाला पाहिजे. असा विचारकरता* हे लक्षात येईल की, ज्याच्या मनात नवीन समाजरचनेचे स्वप्न कधीच तरळले नाही त्यांच्या हाती कारभाराची सूत्रे गेल्यामुळे नियोजनाचा विचका होतो. जुन्या समाजव्यवस्थेतील शासनयत्रणेच्या द्वारे नवीन समाजरचना करण्याचे उद्दिष्ट वेगाने आणि विश्वासाने गाठता येणार नाही. शासनयंत्रणेचे स्वरूप तर पक्षातीत राहिले पाहिजे आणि पक्षाच्या ध्येयधोरणावर आधारलेला कार्यक्रम यशस्वी रीतीने अमलात तर आलाच पाहिजे, ही लोकशाहीची दोन पथ्ये होत. ही दोन्ही पथ्ये साभाळावयाची तर नियोजित अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या नवनवीन शासकीय जबाबदाऱ्या आपापल्या मर्यादेत राहून यशस्वी रीतीने पेलू शकतील असे नानाविध क्षेत्रातील राजकीय उद्दिष्टाची जाणीव ठेवणारे कार्यकर्ते फार मोठ्या प्रमाणावर पुढील दहा वर्षात निर्माण झाले पाहिजे. एका बाजूने सत्तारूढ पक्षाला हे आव्हान आहे आणि दुसऱ्या बाजूने तरुणवर्गाला हे आवाहन आहे.

## सत्तारूढ पक्ष आणि तरुणवर्ग

समाजवादी विचाराकडे ज्याचा कल आहे आणि ज्याना संपूर्ण समाजाच्या हिताची कळकळ आहे असा तरुणाचा पाठिंबा सत्तारूढ पक्षाला मिळेल काय? राजकारण म्हणजे स्वार्थांध बुभुक्षिताचा मेळावा नव्हे आणि काँग्रेस पक्षाकडे वळणे म्हणजे सत्तेचा दास होणे नव्हे. सत्ता हीच राजकारणाची अधिष्ठात्री देवता आहे. आजचा विरोधी पक्ष हाही सत्तेच्या प्राप्तीसाठीच राजकारणाच्या मैदानात उतरलेला असतो. गली सोळा वर्षे काँग्रेसपक्ष सातत्याने सत्तारूढ झाल्यामुळे काँग्रेस म्हणजे सत्तेचे घर असा, समज बळावत गेला आहे. आजचा सत्तारूढ पक्ष हा उद्याचा विरोधी पक्ष असतो आणि आजचा विरोधी पक्ष हा उद्याचा सत्तारूढ पक्ष असतो. हे लक्षात घेता सत्तारूढ पक्षात प्रवेश करतो म्हणजे आपण काही पाप करतो अशी जी भावना विरोधी पक्षानी आपल्या पक्षाच्या आग्रही प्रचाराच्या ओघात निर्माण करून ठेवलेली आहे, ती किती पोरकट आणि फुस-

कट आहे, हे कळून चुकते. प्रश्न आहे तो दृष्टीचा. या देशातील सत्तारूढ पक्षाने समाजवादाचा स्वीकार केल्यानंतर पुरोगामी विरोधी पक्षांना समाजवादाची प्रस्थापना आपण कांग्रेसपेक्षा अधिक द्रुतगतीने करू अशी भूमिका घेणे परिस्थितीने भाग पाडले. कांग्रेसने मात्र समाजवाद दमादमाने प्रत्यक्षात आणावयाची आणि समतेचे व लोकशाहीचे बंधन पाळून आपल्या देशाच्या प्रकृतीला आणि प्रवृत्तीला झेपेल असा नवा समाजवाद घडविण्याची आपली मूळ प्रतिज्ञा कायम ठेवली. वस्तुतः एवढा लवचिकपणा धोरणात हवाच, पण या लवचिकपणाला विरोधी पक्षानी भोंगळपणा म्हणून हिणविले. अर्थात् हा ज्याच्या त्याच्या दृष्टीचा प्रश्न आहे. समाजवाद कोणत्या वेगाने येऊ शकतो याविषयी मतभेद होणे स्वाभाविकहि आहे. मुद्दा हा की, तरुणवर्गाने राजकारणाविषयी, सत्तारूढ पक्षाविषयी किंवा विरोधी पक्षाविषयी कोणत्याहि प्रकारच्या भ्रामक समजुती आपल्या मनात न बाळगता राजकारणाचा खुल्या दिलाने आता विचार करावा.

आणि हे खुले दिल कसे असावे ? हे खुले दिल गोखल्यासारखे असावे. टिळकाना या देशातील सामान्य लोकाची जेवढी चाड आणि चिंता होती तेवढीच चाड आणि चिंता गोखल्यानाहि होती. या देशातील ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत होऊन स्वराज्याची प्रतिष्ठापना झाल्याशिवाय लोकाचे मूलभूत प्रश्न सुटणार नाहीत अशी टिळकाप्रमाणे त्याचीही धारणा होती. आणि इतके असूनही तत्कालीन परकीय सत्तेची लोकाच्या हिताच्या प्रश्नावर सहकार्य करण्याची तयारी ठेवून सरकारच्या लोकहितविरोधी कार्याला त्यांनी नेटाने विरोध केला. पण हे काहीच नाही. त्याचे सर्वांत मोठे कार्य सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना हे होय. स्वराज्यप्राप्तीनंतर राज्ययंत्रणेचा गाडा आणि लोकशाहीचा कारभार सचोटीने आणि हिंमतीने आपल्या शिरावर घेऊ शकतील अशा कार्यकर्त्यांची माळचमाळ उभी करण्यासाठी ही सोसायटी त्यांनी स्थापन केली. आपला देश आज ना उद्या स्वतंत्र होणार, तेथे लोकशाही नांदणार आणि त्या लोकशाहीच्या संचलनासाठी सचोटीचे आणि हिंमतीचे कार्यकर्ते लागणार याचा योग्य अंदाज बांधून सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना करणारा हा महापुरुष खरोखर द्रष्टाच होता. तत्कालीन परिस्थितीच्या मर्यादानी त्यांचे मन जखडून गेले नव्हते. ते एक अत्यंत खुल्या दिलाचे दूरदर्शी मुत्सद्दी होते. म्हणूनच पन्नास वर्षांनंतर आपल्या समाजाची गरज कोणती असेल आणि ती गरज भागविण्यासाठी नेमके काय केले पाहिजे याचे यथार्थ दर्शन त्याना घडले.

कांग्रेसचा समाजवाद हा आज अपुरा असेल; पण उद्या तो अपरिहार्यपणे वाढत जाणार आहे हे विसरून चालणार नाही. या देशात गेली पंधरा वर्षे नियोजित अर्थव्यवस्था नांदल्यामुळे काही नवी कार्यक्षेत्रे निर्माण झाली आहेत आणि तीही सारखी वाढत जाणार आहेत. आणखी दहाच वर्षांनी या नियोजित अर्थव्यवस्थेचे स्वरूप काय राहील याचे आराखडे तयार झालेले आहेत. १९७५ सालच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप जरी डोळ्यापुढे आणले तरी कोणत्या दर्जाचा आणि कोणत्या प्रवृत्तीचा कार्यकर्ता राजकारणामध्ये आणि सत्तारूढपक्षामध्ये असावयास हवा हे सहज ठरविता येण्याजोगे आहे. हे स्वरूप ओळखून सत्तारूढपक्षाने जशी काही निश्चित उपाययोजना केली पाहिजे तशीच तरुणवर्गाने आपल्या मनाची काही विशिष्ट तयारीही केली पाहिजे. समाजवादाच्या यंत्रणा लोकहितबुद्धीने कशा चालविता येतील आणि आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण नोकरशाहीच्या हाती न होता राजकीय पक्षाच्या द्वारे संपूर्ण समाजाचे नियंत्रण त्यावर कसे राहील या प्रश्नाची निरपवाद उत्तरे आणि या उत्तराना आकार देणारे धडाडीचे कार्यकर्ते पुढील दहा पंधरा वर्षात काळ मागणार आहे. ही काळाची मागणी ओळखण्याचे चातुर्य सत्तारूढ पक्षाने आणि तरुण पिढीने दाखविले पाहिजे.

## नेहरूंचा वारसा : लोकशाही

लोकशाहीची एकनिष्ठ उपासना सातत्याने करण्याची कुवत आणि धमक भारतीय समाजात आहे काय ? कुवत ओळखावी लागते आणि धमक दाखवावी लागते. आपण होऊन पुढाकार घ्यावा लागतो. पुढाकार घेण्यास मन कचरले तर कुवत गजते आणि धमक सरते. काळाचे आव्हान स्वीकारण्याची मनाने तयारी करणे हा कुवत जाणण्याचा आणि धमक कारणी लावण्याचा एकमेव मार्ग आहे. अशी तयारी तरुण पिढीने दाखविली तर आपल्या समाजात लोकशाहीची एकनिष्ठ उपासना सातत्याने करण्याची कुवत आणि धमक अमर्याद रीतीने वस्ती करून आहे असे त्याच्या प्रत्ययास येईल. अखेरीस लोकशाही ही माणसाच्या मनात वावरावी लागते. गोखले आणि नेहरू याच्या मनात लोकशाहीची तेजस्वी ज्योत अखंड तेवत राहिली म्हणूनच ते अखेरपर्यंत लोकहितवादी राहिले. दुसऱ्या कोणत्याही वादाने त्याच्या मनाला स्पर्श केला नाही. राजकारणाच्या दैनंदिन धबडग्यात मानेपर्यंत बुडालेली माणसे नानाविध आरोपाचे धनी होतात. गोखले आणि नेहरू हेही यातून सुटले नाहीत. स्वातंत्र्यापूर्वीचे मुत्सद्दी नेहरू हे स्वातंत्र्योत्तर कालात राजकारणी ठरले असा आरोप सहज करता येण्याजोगा आहे. पण याबरोबर हेही तितकेच खरे की या थोर पुरुषांचे आपल्यासारखे सामान्य समकालीन किंवा सामान्य निरीक्षक हेही नेहरूंचे मुत्सद्दीपण विसरून त्याचे केवळ राजकारणी रूपच पाहू शकले. नेहरूच्या डोळ्यापुढे केवळ हिंदुस्थान कधीच नव्हता. संपूर्ण जगाचे दीर्घकालीन राजकारण आणि अखिल मानवजातीचे भवितव्य त्याना सारखे दिसत असे. संपूर्ण जगाचे एक राज्य व्हावे आणि त्या राज्यात लोकशाहीचा व्यवहार असावा, असे भव्य स्वप्न त्यानी पाहिले होते. हे भव्य स्वप्न त्याच्या हयातीत साकार झाले नाही; पण अणुयुगात मानवजातीला त्या स्वप्नाला साकार केल्यावाचून गत्यंतर नाही. अणुयुगातील माणूस सहिष्णु झाला नाही तर त्याचा विनाश अटळ आहे. ही सहिष्णुता हाच तर भारतीय धर्माचा आणि संस्कृतीचा मूलाधार आहे. अशा देशात लोकशाहीची एकनिष्ठ उपासना सातत्याने करण्याची कुवत आणि धमक नाही, अशी समजून करून घेणे म्हणजे आपल्या भ्रांतपणाचा पुरावा जाहीर करणेच होय. आणि भ्रांत समाजाला भवितव्यच नसते ! भारतीय समाजाची मूल प्रकृती ही लोकशाही उपासनेला प्रेरक आणि पोषक आहे, याविषयी निःशंकपणे विश्वास बाळगून तरुण पिढी कार्यशील झाली तर भारताचे भवितव्य उज्ज्वल होईल. लोकात्म नेहरूंचा वारसा पुढे चालविण्याचा हाच एकमेव मार्ग होय.

• • •

६ चांगली पुस्तके

जी सहा वर्षे मिळत नव्हती

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर


आग्रा

लेखक

**ब. मो. तथा बाबासाहेब पुरंदरे**

मूल्य : प्रत्येकी दोन रुपये केवळ

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २




## गौरी

रुचे श्रमाचिया घरी
विसाव्याला पाहुणेर,
शोभे सुखाच्या शालीला
वेदनेचीच किनार

अंधाराशी खेळताना
चांदण्याचा लपंडाव,
पुनवेच्या अंगोपांगी
हिमस्पर्शाचे लाघव.

माझ्या मनाच्या गौरीला
नीलकंठाचेच वेड,
अंगी मदनविभूती
उरी प्रीतीचे पवाड.

—शारदात्मज

## उद्या

आज मी जे गीत गातो ते उद्या गातील सारे
चालु दे वक्षात माझ्या वादळांचे येरझारे

कोट कंठातून माझी वैखरी घेईल ताना
शब्द हा एकेक माझा वेचुनी घेतील तारे

लाघवी काही फुलांची लोचने होतील ओली . . .
दूरच्या येतील हाका-- "तू पुन्हा येशील का रे ?"

रंगत्या पूर्वेस माझी वेदना देईल लाली
अन् तुझ्या दारात माझी धूळ हे नेतील वारे

— सुरेश भट

## ......बोलवेना

पान्हावली रात्र पुन्हा
डोळे ढाळतात गाणे
व्यथा सावडून मुक्या
दु:ख निघाले देखणे

विनादिशांचा प्रवास
छाया माखलेली वाट
कुणी मिळेल घेणारा
दु:ख सर्वस्वाचा घोट

रिता क्षितिजघुमट
बोल त्यालाही फुटेना
'सोबतीला घेई मला !'
बोलायाचे... बोलवेना.

— केशव मेश्राम

## पंख

कातडीने पांघरावी नजरेची शाल
रक्तासाठी होउ नये पापण्याचे हाल
कोसळती प्राणभित चालत रहावी
कंठातल्या पाण्यामध्ये आरती भिजावी
पेटलेले निळे दिवे डोळ्यात विझावे
सांडणारे बळ आता पंखात मिटावे

—सुधाकर देशमुख

**सासूबाई अन् सावित्री हळू हळू बोलत होत्या. त्यांच्यापुढे कागदाचे उलगडलेले पुडे होते. सावित्री गावातील अनुभवी दाई होती... वसुंधरेच्या मनात चर्र झाले... यक्षप्रश्नाची अशी ही सोडवणूक भयंकर होती...!**

# यक्ष-प्रश्न

वसुंधरा कॉलेजातून आली तेव्हा मोलकरणीने तिच्यापुढे टपाल आणून ठेवले. त्यातले बाबासाहेबांचे पत्र तिने उत्सुकतेने वाचले. त्यांनी पत्रातून तिच्या प्रकृतीविषयी खूपच काळजी व्यक्त केली होती. तिच्या सासूबाईचा कळकळीचा निरोपही लिहिला होता सविस्तर—

"तिला म्हणावं सुट्टी लागली की तावडतोब निघून ये. तापानं जीव कसा हल्लक झाला असेल. इथे तुला विश्रांती मिळेल. दोन महिने राहा न् ताजीतवानी होऊन परत जा."

एवढे लिहून बाबासाहेबांनी दिवाकरला आज्ञा केली होती.

"...तरी सूनबाईस अवश्य पाठवून देणे."

ती गालातल्या गालात हसत होती. म्हणे 'तापानं जीव हल्लक झाला असेल.' इथे कुणाला येतोय् ताप? नका लिहू म्हटलं तरी 'ह्यांनी' लिहिलं गेल्या पत्रात; "घराला गेले दोन महिने बरं नाही. रोजची तब्येतीची तक्रार असते." त्यांचं म्हणणं, वडील माणसांना एकदम धक्का देणं बरं नाही. मग तो सुखाचा असो की दुःखाचा. आधी 'सूतोऽवाच' करून ठेवावं.

घ्या आता. बरं नाही लिहिलं तर सासुबाईंनी ग्रह करून घेतलाय् की तापच येतोय आपल्या सुनेला. किती अस्वस्थ झाली आहेत ही मोठी माणसं!

एकीकडून ती मनात सुखावलीही. एवढ्यासाठीच तर हवीत मोठी माणसं. दुखलं खुपलं जाणायला अन् कौतुक करायला. तिला आवडतं सासूसासऱ्यांजवळ राहाणं. पण गेली दोन वर्षं ती जाऊच शकली नव्हती. जायचं म्हणजे सुट्टीत आणि तिला तर एम्. एड्. च्या वर्गांना सुट्टीतच हजर रहावे लागे ना? आता मात्र जायचेच. तिने मनाशी निश्चय केला. रोजच्या सकाळच्या ह्या ओकाऱ्यांनी सारी शक्ती जशी काही पिळवटून काढली आहे. सासूबाई काही उपाय तरी करतील. निदान आलटून पालटून नित्य नवे जिन्नस खायला तरी घालतील आग्रहाने, अडचण होणार आहे 'ह्यांची!' त्यांना काही लवकर रजा मिळणं शक्य नाही. पण ते म्हणताहेत "मी निभावेन पंधरा दिवस."

तिला खरंच थारेपालट हवा आहे. विश्रांती हवी आहे हे त्याला तीव्रतेनं जाणवतं आहे. रोज सकाळी उठून हा उलट्यांचा त्रास; आणि वर कॉलेजमधल्या लेक्चर्सचा ताण.

त्याचे आई-वडील आणि इतर भावंडं एका तालुक्याच्या गावी आहेत. 'धड ना शहर धड ना खेडं' असं मधलंच गाव आहे ते. त्यांनी तिथे रहावं खेड्यातल्या अडचणींशी तोंड देत, नी आपण इथे ह्या सहा लाख वस्तीच्या शहरात मुसज्ज बंगलीत राहावं हे दिवाकरला पटत नाही. पण आई-वडील तिथेच राहण्यात राजी आहेत. दोन मैल तर अंतर आहे तेथून त्यांच्या शेतीच्या गावाचं. आजकाल काळ कसा आलाय्. तुमची पाठ फिरली की तुमची शेती नी घर घातलंच दुसऱ्यानं आपल्या घशात असं समजा!' शेतातलं धान्य नी हक्काचं लांबरुंद दल्लाणखानी घर सोडून कशाला जायचं शहरात? सुंदर दिसली तरी बंगलीच ती छोटेखानी. कशाला गर्दी करायची सगळ्यांनीच तिथे?

दिवाकर दरमहा तीनशे रुपये अव्याहत पाठवतो आहे. खरं म्हणजे धराच पाठवते तिचा पगार झाला की परस्परच मनिऑर्डर करते. त्यामुळे दिवाकरचे आई-वडील संतुष्ट आहेत. निदान भावंडं तरी आपल्याकडे आणावीत असं दिवाकरला वाटतं. पण त्याचा तो विचार वसुंधराने मोडून काढला होता. मुलं आईबापांजवळच सुखी रहातात. आणता येतील कॉलेजच्या वयात. म्हणून टाळाटाळ केली होती. दिवाकरच्या पाठच्या दोघी बहिणी बेताचं शिकल्या न् लग्न झाल्यावर आपापल्या सासरी दूर गेल्या. सुखात आहेत त्या. नंतरचे दोघे भाऊ. पण त्यांच्या कॉलेजची वेळ आली तोपर्यंत गावातच कॉलेज निघालं. आणि नंतरची माया. तिला कॉलेजशिक्षण द्यायचं नाकारलं सासूबाईंनी.

"करायचंय् काय? शिकून काय दिवे लागायचेत् वेगळे? नोकरी थोडीच करायचीय्?" मग एकदम सासूबाईंनी जीभ चावली. भलतंच बोललो आपण. ही ऐकतेय् ती आपली सद्गुणी सून शिकलेली आहे. कॉलेजात प्रोफेसर आहे. त्यांनी सावरून घेतले. एकदम नूर बदलून त्या म्हणाल्या होत्या,

"सगळ्याच का तुझ्यासारख्या हुशार नी विवेकी असतात धरा?"

त्यावेळी धरा म्हणाली होती,

"ह्यांना फार हौस आहे मायाताईंना शिकवायची. माझ्याकडेच ठेवून घेणार होते मी त्यांना!"

"छे ग. तू कशाला नेतेस तिला? तुम्ही दोघं असणार आपापल्या कामात. हिच्यावर लक्ष कुणी ठेवायचं बरं? शिवाय तुझा स्वभाव पडला मऊ. हिला शिस्त कशी लागायची? कामाचं वळण कसं लागायचं? "धाडम धाडवा न् आवशीला पाडवा'

सौ. स्नेहलता दसनूरकर



असलं सोंग हे. आतां चार माणसांचा स्वयंपाक करता यायला हवा की नाही हिला ? तूच सांग !"

वसुंधरा त्यांचं म्हणणं खोडून काढू शकली नव्हती. त्यावेळी माया सारी पंधराच तर वर्षांची झाली होती. लग्नाचं वय खऱ्या अर्थानं होईपर्यंत कॉलेजची चार वर्षं पदरात पाडून घ्यायला काय हरकत आहे ? पण त्या म्हणतात तेही खरं ! तरुण मुलगी म्हटली की जबाबदारी आलीच. देखरेख, वळण, शिस्त. ठीक आहे आईजवळ आहे तीच.

पण मायाचा खूपच हिरमोड झाला होता. आता ह्या गोष्टीलाही दोन वर्षं झाली आहेत. सासूबाईंची इच्छा आहे तिच्या जबाबदारीतून मुक्त व्हावं लग्न करून तिचं. खटपटी चालू आहेत. दिवाकरने आपल्या ह्या लाडक्या बहिणीला दागिने करण्यासाठी दोन हजार रुपये राखून ठेवले आहेत.

★

अचानक वसुंधराचं लक्ष मांडीवर पडलेल्या कागदाच्या घडीकडे गेले. पाकिटातूनच पडली वाटतं ही. तिने उलगडून पाहिले; हे तर मायाचं पत्र. मामंजींनी पत्र टाकायला सांगितलं असेल पोस्टात तेव्हा हिनं आपलंही घातलं असणार त्यात. यादी असणार लांबलचक वहिनीनं काय काय आणावं त्याची.

छे ! मायानं नेहमीसारखी एकही वस्तू मागितली नव्हती. फक्त दोनच वाक्यं; "वहिनी, तू ताबडतोब ये. मी तुझी चातकासारखी वाट पहाते आहे." आणि हे काय ? सहीवर पाण्याचा ठिपका ? कमाल आहे मायाच्या हळवेपणाची.

★

दिवाकरने जाताना म्हटले होते;

"आता जाहीर करून टाका बाईसाहेब. माझ्या वाटणीला बातमी फोडायचं काम ठेवू नका. पंधरा दिवसांनी येतोच मी. मग खूप मजा करू आपण. सारा शीण तर जाईलच. आणि हा इथला तोचतोच पणाही टळेल. मग काय, सांगून टाकणार ना आईला ? की आता तीन महिने होत आले तरी अजूनही शंकाच आहे तुला ?"

"इश्श ! न सांगताच ओळखतील त्या. मोठ्या बायकांना नुसत्या एका नजरेंतच समजतं सगळं !"

"अस्सं ? मग काय भाव आहे एका माणसाचा ? खूपच लाड होणार आता !"

हेच आठवतं, वसुंधरा फर्स्ट क्लासच्या डब्यात बसली होती. एका प्रख्यात कॉलेजची प्राध्यापिका एका प्रथमश्रेणीच्या ऑफिसरची पत्नी, त्यातून इतक्या उशीरा दिवस राहिलेले. थर्डक्लासची गर्दी नी खेचाखेची टाळणंच भाग होतं.

वसुंधराच्या समोरच्या सीटवर एक युवती बसली आहे. सुंदर आहे. पण माया हिच्याहूनही सुंदर आहे. ही लहानखोरी आहे. माया छानच वाढली आहे म्हणत होते गेल्या वर्षी हे गेले होते तेव्हा. ही समोरची मुलगी किती नटली आहे. मायेनं नाही सांगितलं म्हणून काय झालं, वसुंधरानं खूप वस्तू घेतल्या आहेत तिच्यासाठी; जेव्हा ह्या वस्तू पाहील तेव्हा तिचे ते हरिणासारखे टपोरे डोळे आनंदानं आणखीच उत्फुल्ल होतील.

छान नवरा मिळायला हवा मायाला. खूप सुख लागायला हवं. खूपच !

स्टेशनवर गाडी थांबली तेव्हा वसुंधराने पाहिले," छोटे भाऊजी दिसताहेत दोघं आणि अय्या, बाबासाहेबही ?" गाडीतून खाली उतरताच मायाने चटकन् बाबासाहेबांना नमस्कार केला वाकून. "अरे, अरे ! इथे कशाला !" गहिवरात त्यांचे शब्द बुडून गेले.

"आपण कशाला त्रास घेतला !" ती संकोचाने म्हणाली.

"मला तरी काय उद्योग असतो हल्ली ? घरी तरी बसूनच राहायचं ते आलो चालत इथवर." त्यांनी वातावरणात सहजपणा आणण्यासाठी म्हटले. वसुंधरा जाणून आहे. त्यांना आपल्या सुनेचा अत्यंत अभिमान आहे.

दिवाकराचं लग्न झालेलं नव्हतं तेव्हाची गोष्ट. सांगून आलेल्या मुली पहायचे त्याने साफ नाकारले; आणि आईला स्पष्टच सांगून टाकले; "मी ठरवून ठेवली आहे मुलगी माझ्या मनानं. तुम्हांला सुद्धा फार आवडेल ती."

हे ऐकताच आईबापांच्या पायाखालची जमीन हादरली होती. म्हणजे हा दिवाकर, हा आपला ज्येष्ठ पुत्र प्रेमविवाह करणार आहे ? आईबापांच्या पसंतीने अन् पुढाकाराने लग्न झाले तरी सून कशी वागते ? हा धसका असतो हल्ली. काय चार दोन महिने नम्र राहील त्यातच समाधान मानून ' सारं भरून पावलो ! ' असं म्हणायचा काळ हा ! त्यातून

तिन जर रूपाच्या नी नवऱ्याच्या बळावरच पोराला मोहिनी घातली असली तर सपलच म्हणायच सार. ती समजते; 'फक्त नवरा माझा अन् मी नवऱ्याची !' पण तो काही आकाशातून टपकलेला नाही. कुणाच्या कष्टां-मुळे, कुणाच्या आशीर्वादामुळे तो मोठा झालेला आहे, त्यालाही त्याचा परिवार आहे हे ती कशाला पहातेय् ? परिवार आटोपशीर असला सासूसासऱ्याचा, तर सुनेच्या अशा वागण्याचाही वाऊ वाटत नाही. पण जर तो मुलगा आपल्या बापाच प्रथम अपत्य असेल, जर बापाला अजून चार सहा मुल असतील, लेकी माहेरवासाची आशा करीत असतील, एखाद्या दुसऱ्या लेकीच अजून लग्नच व्हायच असेल, लेकांची अजून शिक्षण पुरी व्हायची असतील, अन् तो बाप मुलाच्या लग्नाच्या वेळी विना पेन्शनीन सेवानिवृत्तीत निघाला असेल, तर अशा बापासारखा दीन हीन दुनि-येत दुसरा कोणी नाही ! मुलाच प्रेम न् आदर नाहीसा होण ह्या भावनेच्या गोष्टी झाल्या पण आता 'पुढे कस ?' ह्या व्यवहार त्याला पार कुठित करतो.

पण दिवाकरने आत्मविश्वासाने ठासून सागितले होते, "तुम्हांलासुद्धा फार आवडेल ती." आणि त्याचे शब्द खरे झाले. वसुधरेने हे घर आपले मानले आहे. म्हणून तर दरमहा अव्याहत पैसे पाठवते आहे. नवऱ्याच्या प्रति-ष्ठेला शोभेलसे राहणीचे जीवनमान समाळून पैसे पाठवते आहे. स्वतः नोकरी करते आहे ना ! बाबासाहेब म्हणतात; "माझा नबर एकचा मुलगा दिवाकर, न् नबर दोनचा मुलगा ही घरावाई ! आणि दिवाकराविषयी त्याना प्रेम आहे तर घराविषयी भरीला आदरही आहे. म्हणून तर तिला उतरवून घ्यायला ते स्वत. स्टेशनवर आले."

घराच्या दारातच तिला सगळ्यात धाकट्या दिराने अडवले;

"थांबा वहिनी इथेच. आईन सागितलय्... आणि तेवढ्यात सासूबाई डाव्या हातात पाण्याची तपेली आणि उजव्या हातात काहीतरी घेऊन आल्या. त्या ते तिच्यावरून ओवाळून टाकीत असताना वसुधरा इतकी सकोचली की तिने त्यांच्या हाताकडे पाहि-लेहि नाही खाली मान घालून ती पुटपुटली;

"लहान आहे का मी आता ?"

"अग आम्ही आहोत तोवरच हो !" त्या भरल्या आवाजात म्हणाल्या आणि वसुधरे-चाही कठ रुद्ध झाला. आत गेल्यावर देवाला, सासूबाईंना नमस्कार करताना तिचे मन एक नवल करीत होते. नंतरसुद्धा सारे जमले, ती नात्याने मोठी म्हणून धाकट्यांनी पुढे येऊन वाकून तिला नमस्कार केला. पण माया कुठेच दिसली नाही. गावाला गली आहे काय कुठल्या ? चहा गाळणाऱ्या सासूबाईंना शेवटी विचारलेच तिने;

"मायाताई कुठे गेल्या आहेत काय ?"

"कुठे जाणार ? असेल इथेच कुठेतरी !"

आणि त्यांना चहात दूध घालताना सायीकडे लक्ष द्यावे लागले. घराला चहात साय पडलेली खपत नाही.

दहाबारा दिवसापूर्वीच मायाने लिहिले होते ना ? 'मी तुझी चातकासारखी वाट पहाते आहे !" ते काय नुसतेच लिहिण्या-पुरते ? कुठेतरी वाचलेले वापरले काय ?

"घेऊन टाक ना चहा तो. तुला गार चालत नाही !" सासूबाईंनी आठवण करून दिली. नाइलाजाने पाटावर बसता बसता वसुधरा म्हणाली.

"खूप गमती आणल्यात मी त्यांच्यासाठी."

"आता नको काढूस काही. सावकाश जेवणं झाल्यावर काढ हं !"

"आणि वहिनी मला ?" सगळ्यात धाकट्या दिराने विचारले.

"तुम्हांलासुद्धा ! पण मिळणार सगळ्यांना बरोबरच हं !" आणि आघोळीसाठी न्हाणी-घराकडे जाता जाता ती दिराला हळूच म्हणाली, "मायाताईंना शोधून काढील त्याला एक गंमत जास्त !"

"आहे की वरच्या खोलीत. तिला काय शोधायचीय ?"

"काय करताहेत वरती ?"

बबात तिच्यापुरतं चागलं कडकडीत पाणी आहे की नाही ह्याची खात्री करून घ्यायला आलेल्या सासूबाईंनी जरबेने म्हटले.

"असेल काहीतरी वाचीत. तू आता ह्यावेळी ह्या पोराच्या नादी लागून आघोळीला उशीर करू नकोस. जेवायला उशीर झाला तर "ह्याना" पित्त होतं, तुला माहीत आहे !" आणि वसुधराला हेही माहीत आहे की आज तिला बाबासाहेबाच्याच पंक्तीला जेवायला हव. आज ती प्रवासाने शिणलेली आहे. तिला मागच्या पंक्तीला थांबू दिले जाणार नाही. आज सासूबाईंनी जेवणातले एकूण एक पदार्थ तिच्या आवडीला प्राधान्य देऊन केलेले असणार; हेही ती जाणून आहे. ती मुकाट्याने न्हाणीत उतरली.

पण हे अघटित आहे. मायाच हे वागणं नवीनच आहे. वहिनीच्या येण्याची तारीख, गाडी, वेळ सारं निश्चित माहीत असून माया थडपणाने वर वाचीत बसते ? आणि नवल अस की घरातलं कोणीही तिला खाली बोला-विण्याच मनावर घेत नाही अशी का वागते आहे ती ? नेहमी तर धावत येते आणि सारखी तिच्यामोवती घोटाळत राहते.

मोरीतून बाहेर पडताच कुकू लावून वसुधराला पाटावर बसाव लागल. माया जेवायलाही बसलेली नाही अन् वाढायला मदतही करायला आलेली नाही.

जेवणानतर बाबासाहेब जेव्हा ओसरीवर गेले तेव्हा माया हळूच पाय न वाजवता खाली आली. वसुधरा थक्क झाली. जिना न वाजवता चढउतार करण हे तिच्या स्वभावाला सोडून आहे. दोघीनी एकमेकीकडे पाहिले. अचानक वसुधराला धक्का बसला. ती मुद्दाम हसली. मायाही हसली. पण त्या हसण्यात उमलतेपणा नव्हता. कोमेजलेल्या मनाने मुद्दाम केलेला प्रयत्न होता तो; केवळ कर्तव्यतत्परतेमुळे.

माया आणि सासूबाई जेवायला बसल्या होत्या. वसुधरा वाढायला तयार होती पण सासूबाईंनी नको म्हटले. एका पाटावर बसून वसुधरा मायाच निरीक्षण करीत होती सासूबाईंची नजर चुकवून.

माया जेवणाचा प्रयत्न करते आहे. केवढी बदलली आहे ही ? हे वयाला न शोभणारं, स्वभावाशी न जुळणारं गाभीर्य, ह्या उदास हालचाली, कळाहीन चेहरा आणि...आणि... वसुधराने मायाची नजर पकडली. ह्या नजरेत हा भेदरटपणा कसा ?

ह्यानी हिच्या मनाविरुद्ध हिच लग्न ठरवलं आहे काय ?

"तू झोप पाहू जाऊन जरावेळ ! कालचं जागरण झालेल. आधीच दुखण्यातून उठलेली तू."

"मी जरा मागच आवरू लागले असते."

"अहं ! आज मुळीच हात लावायचा नाही कामाला. ऊठ पाहू आधी. मोहन,

वहिनीसाठी माजघरातल्या अंधाऱ्या कोपऱ्यात गादी पसर. ह. उठा धरावाई. विश्राती घ्या थोडी. कोणी येणार नाही आता तिकडे."

तिला उठणच भाग पडल. त्यांचं म्हणणहि खर आहे. रात्री तिला थोडीशी सुद्धा झोप मिळाली नव्हती. गाडी पहाटेची होती. आणि दुसरं म्हणजे घर आवरून ठेवणं भाग होतं. दिवाकर येताना आवरआटोप करून का येणार आहे ? त्या व्यापात सारी रात्र सपली होती. शिवाय आताच्या जेवणानं सुस्ती आली आहे. बऱ्याच दिवसात ती इतकं जेवली नव्हती.

अथरुणावर पडल्या पडल्या ती विचार करते आहे. सासूबाईंना काय झालं आहे ? त्याना अजूनही मला 'दुखणच झाल होत' असं वाटाव ? वसुधराचा अपेक्षाभग झाला; पण तिच्या हेही लक्षात आल की, सासूबाईंच मन ठिकाणी नाही; म्हणून त्यानी आपल दुखणं कोणत हे ओळखल नाही. आता हळूहळू तिच्या मनात आलं, घरातल वातावरणच स्वाभाविक नाही. साऱ्याचेच चेहेरे लावट झालेले आहेत. सासूबाई, मामजी, माया ह्याच्या मनावर कसल तरी ओझ आलेल आहे.

छे ! काहीतरीच. आपला विरस झाला म्हणून वाटतय्. दुसरं काय ? मला किंवा ह्याना न विचारता तिचं लग्न परस्परच पक्क कस करतील ? माया काही तरी मोठं नुकसान करून बसली असेल. साड-लवड, पाडफोड अशापैकी. सासूबाईंना स्वच्छतेच न् टापटिपीच अती वेड. माया तितकीच निष्काळजी अन् धडपडी ! किंवा हरवलं सुद्धा असेल तिन काही महागामोलाचं. विचारू नंतर थेट मायालाच !

मनाच अस समाधान करून वसुधरा झोपेच्या आधीन झाली.

ती जेव्हा जागी झाली तेव्हा घरात सामसूम होती. उठून तिने चूळ भरली आणि हलकेच जिना चढून वर गेली. वरच्या खोलीत मोहन काहीतरी वाचीत होता. आणि पलीकडे चटईवर माया पाठमोरी निजली होती. जागी आहे की झोपलेली कुणास ठाऊक ? मोहनच्या देखत तिच्या मनातल्या गोष्टी सागणार नाही ती. कशाला घाई ? आता आहोतच आपण इथे. वसुधरान मनाची समजूत केली आणि ती खाली आली.

सासूबाई कुठे आहेत ? ती मागच्या पडवीत आली.

सासूबाई अन् सावित्री हळू हळू बोलत होत्या. अगदी व्यग्र होऊन त्याच्यापुढे कागदाचे उलगडलेले पुडे होते. सावित्री बोलत होती न् मधून मधून पुड्यातल्या वस्तू उचलून, दाखवून, पुन्हा ठेवीत होती.

सावित्री त्या गावातली एक अनुभवी वयस्कर दाई होती. सासूबाईंच्या प्रत्येक बाळतपणाच्या वेळी तीच जवळ होती. ह्या घरातल्या दिवाकरपासूनच्या प्रत्येक मुलाला तिनेच दोनदोन वर्ष न्हाहू–माखू घातलेले आहे तशी ती ह्या घरचीच एक मानली जाते. सासुबाईहि तिला खूप मानतात. पण ह्यांचं हे खुसूफुसू काय चालल आहे ?

आधी सावित्रीचं लक्ष गेल. "सूनबाई उठली." तिने म्हटले. सासूबाईंनी वळून पाहिले. समोरच्या पुड्या बाधीत त्या म्हणाल्या,

"झाली झोप ? चला आता चहा घ्या. सावित्री, बस ह ! चहा घेऊनच जा."

सासूबाई गेलेल्या पाहून वसुधराने विचारले, "मावशी, बऱ्या आहात ना ?"

"तर ग. चागली बेश आहे मी. तुझ बाळतपण केल्याशिवाय मरत नाही मी. तू आता मनावर घे. माझा सारा जीव गुतलाय् तुझं लेकरू पहायला."

"इश्श, भलतंच काय—"

"आता आणि काय राहिल आहे तुमच? परीक्षाही उतरली म्हणे तुझी ? बेश कमावताय दोघ जण. आता थाबणं म्हणजे काही खर नव्हे."

वसुधराचे गाल लाल होऊ लागले. म्हातारपणी माणसाला कुठली आलीय मर्यादा. जे पोटी तेच ओठी ठेवतात ह्या वयात. ना त्या बोलण्याला कसाला आडपडदा ना झिलाई-झालर ! म्हातारी वस्ताद आहे अगदी. बघतेय् पहा कशी भेदक डोळ्यांनी.

"आत चला मावशी." असं म्हणून गडबडीन वसुधरा पाठ फिरवून चालायला लागली....चहा झाल्यावर सासूबाई म्हणाल्या.

"ह आता काढा तुमचा खजिना. बघू या तरी काय काय आणलय् !" आणि मग सारे भाऊजी गोळा झाले. निःशब्दपणाने मायाही येऊन उभी राहिली. मोहनने ट्रंक आणून ठेवली. वसुधराने सासूबाईंजवळ

## पूर्ती

**ओठानी वाहिला**  
**शब्द पारिजात**  
**गंध आसमंत भरला हा ।**  
**असा जाणवता**  
**रक्ताचा जिव्हाळा**  
**प्रीतीचा सोहळा आरंभिला ।**  
**तुझा पारिजात**  
**तुझ्या या पायाशी**  
**अर्पून मी असा झालो धन्य ।**

*—शरद गजानन वाघ*

किल्ली देऊन म्हटले,

"उघडावी आपणच !"

मग सासूबाई एकेक वस्तू उचलून विचारायच्या 'हे कुणासाठी ?"

★

पण सासूबाईंच्या ह्या उल्हासात जीव नाही हे वसुधराला जाणवल. ती उदास झाली.

काय झालय् ह्या घराला ? माझं काही चुकल आहे काय ? वेळच्या वेळी पत्रं पाठवली. ह्यात साऱ्याना न चुकता, आवडतील अशाच वस्तू आणल्या. आल्यापासूनही काही चूक घडलेली नाही. छे छे ! माझ काहीही चुकल नाही. मग झालय् काय ?

एक मात्र नक्कीच ! जे काही घडल आहे ते मायाच्याच बाबतीत. पण सासूबाई मुळी तिला न् मायाला एकत्र एकट्या अशा येऊच देत नाहीत. अस का ? मी का परकी आहे ?

सध्याकाळी पलिकडच्या वाड्यातल्या मथुराकाकी आल्या. ह्याच न् त्यांच मागच परड एकमेकीना लागून आहे आणि बायकाना एकमेकीकडे ये जा करता यावी म्हणून कुपणातून रस्ता ठेवला आहे. उमाबाईच्या लाडक्या सुनेला भेटायला येताना मथुराकाकी आपल वय विसरतात. 'ती येईल की !' म्हणून दम धरवत नाही त्याना.

इतका वेळ वसुंधराला त्याच्या सुमनची आठवणच झाली नव्हती. आत्ता तीव्रतेने

झाली. माया अशी कवचात शिरून बसलीय् तशीच सुमननेही दीक्षा घेतलीय् काय ? ती का नाही आली सकाळपासून ?

मथुराकाकींनी आल्या आल्या थेट प्रश्न केला;

" अजून नव जुन काही नाही ना सूनबाई तुमच्याकडे ? अग शहरात रहाता तुम्ही. डॉक्टरणीला तरी दाखवा एखाद्या चागल्याशा ! "

सुनेला अजून मूल नाही ह्याची सासूला खंत आहे. पण काकींच्या असल्या बोलण्याने तिचे मन दुखावलेले त्यांना खपणार नाही. त्या एकदम उसळून म्हणाल्या.

' कशाला ती डॉक्टरीण ? असं काय वय झालय तिचं ? परीक्षेच्या न् नोकरीच्या नादांत गुतलीय् ती इतकंच ! "

मग मथुराकाकींनी विषय वदलला. " माया कुठे दिसली नाही अलीकडे ? "

" असेल वाचीत वरच्या खोलीत. गावात नवी लायब्री निघालीय् ना– "

वसुधराला आठवण झाली,

" काकी, सुमन ठीक आहे ना ? यदा लाडू देणार की नाही ? "

" कसले लाडू घेऊन बसलीस सूनबाई ! पोरीन सोडिवलं आम्हाला विवचनेतन कायमचं ! अशी काय बघते आहेस ? उमाबाईंनी पत्रातून कळवल नाही काय तुला ? "

वसुधरा हतबुद्ध झाली. काय म्हणताहेत या ? कायम ? म्हणजे ?

" चांगली का बातमी होती काकी मुद्दाम पत्रातून कळवावी अशी ? " सासूबाईंनी बचाव केला.

" पण काय झाल होत तिला ? "

" आता काय सागायचं सूनबाई ! भोग म्हणायचे आमच्या प्राक्तनाचे न् गप्प बसायच. "

" चला काकी, सूनबाईने तुमच्यासाठी, करज्याची चिरणी आणलीय् स्टीलची न् साली काढायचही यंत्र आणलय् ते देते तुम्हाला. "

*

वसुंधराला सुमन डोळ्यापुढे दिसू लागली. सावळ्या रंगाची, तेजस्वी डोळ्याची सुमन ! शरीर कसं वेळच्यावेळी प्रमाणबद्ध भरलं होत. नटण्याची तरी किती आवड. सावळा रग गोरा दिसावा म्हणून कोण धडपड. लिंबू चोळ, डाळीच पीठ लाव, हळद चोळ; पावडर फास ! अशी सारखी खटपटीत असायची. वसुधरा म्हणाली होती;

" तुला नवरा मोठा हौशी मिळायला हवा ग बाई ! " तेव्हा लाघवीपणाने हसून सुमन म्हणाली होती; " तुम्ही मनावर घ्या ना वहिनी ! "

ते विसरली नव्हती वसुंधरा. दोघींसाठी दोन नवरेमुलगे तिने हेरून ठेवले होते. नुक्तेच ते दिवाकरच्या ऑफिसात लागले होते. ते उमदे तरुण दिवाकरच्या शब्दाबाहेर जाणार नाहीत अशी खात्री होती तिची.

वसुधराचे मन गलबलून गेले. एक हौशी फुलपांखरीवृत्तीचं आनदी अस्तित्व नाहीसं झाल होत.

*

मागच्या ओटीवर मोलकरीण काम करीत होती तिथे जाऊन ती भिंतीला टेकून बसली.

" वैनीसा ? मुकाट का बसल्या ? बोला नं काय तरी ! " मोलकरणीने आव्हान केले.

" लच्छी... ! " नुसतीच हाक मारून ती गप्प झालेली पाहून लक्ष्मीने नवलाने म्हटले;

" काय वो वैनीसा ?"

" लच्छी, काकीच्या सुमनला काय झाल होतं ग ?" तिच्या तोडाकडे पाहूनच लक्ष्मी तिचं मन समजून गेली, न् म्हणाली;

" काकी गेल्या काय ?"

" अं . हो ! "

" दमाशीक. मीच बगून येतीय्. तुमचं डोकं न्हाई दिसत ठिक्काणावं. " आणि कमरेला खोचलेला पदर सोडून गळयावरचा घाम पुशीत लक्ष्मी घरात जाऊन खात्री करून घेऊन आली. अन् वसुधराच्या अगदी जवळ जाऊन हलक्या आवाजात म्हणाली, " सुमन पोटुशी व्हती चार म्हैन्याची ! "

" आं ? ... हं ह ! पण लग्न कधी झाल होतं तिचं ? आम्हांला कळवलही ......"

" कशाचं लगीन घिऊन बसला वैनीसा ? मग अस कशाला झालं असत ? काकीला माइदळ हौस ! लगीन बी वाजल असतं न् गरवारपण बी वाजल असत. पण साराच चोरीचा मामला न् हळू हळू × × × ! दारावर वैदु वाया येतात का नाय ! त्याच्याकडन औशीद घेतलं काकीबाईनी न् दिलं लेकीला. ते काळजाला भिडलं. रातभर पोरगी गडवडा लोळली रगतात अन् पहाटेच्या पारी गपगार ! "

अंगावर शहारे देत वसुधरेने विचारले;

" पण चार महिने होईपर्यंत काकी स्वस्थ बसल्या ?"

" तर हो ! कसं कळावं ? दुन्या कुटं चाललीय बगा की. शेरगावातली सुदारना खेड्यात पन आलीया. "

" पण लच्छी तो ... तो कोण होता ते तरी कळलं ?"

" कळलं की, तो मघव्या आळीतला तो यकू पाहिला व्हता कंदी ?"

" व्यकटेश ! "

" ह्या त्योच तर ! "

" बाई ग ! " व्यकटेश म्हणजे सत्रा धदे करणारा न् अठरा लफड्यात सापडणारा एक तरुण पोरगा हॉटेल, पानपट्टीच दुकान, शिप्याचं दुकान, जुगाराची बैठक, दारूची बैठक, सार जेव्हा जे जमेल ते करीत असतो तो. सहा वर्षांपूर्वी मामलेदाराचा आश्रित म्हणून त्यांच्याबरोबर आला होता. ते बदलून जाईपर्यंत ह्याचा जम चागला बसला होता. ते बदलून गेले न् ह्या इथेच राहून गेला.

" कशी त्यान ह्या पोरीला फशी पाडली कुनालाच कळल न्हाई. आन् मग जवा हे समदं काकीच्या लक्षात आलं तवा त्याचा कुटं पत्त्या व्हता गावात ?"

लक्ष्मीच्या तोडाकडे टक लावून पहात वसुंधरा ऐकत होती. अचानक सासूबाईंची हाक आली;

" घराबाई ! "

*

वसुधराला वाटत होतं आपल्याला आता कडकडून थडी वाजून येणार. सारखा पाठीच्या कण्यातून थडीचा काटा अगात कापरं भरवीत होता. राहून राहून तिची नजर मायाचा पाठलाग करीत होती. पत्रातली तिने केलेली विनंती सारखी आठवत होती; " मी चातकासारखी वाट पहाते आहे ! "

रात्री तिला सारखी कुशी पालटताना पाहून सासूबाईंनी विचारले;

" अग दुखतय् का तुझं. दाबून देऊ देत ?" मग मात्र घराने सकोचाने डोळे मिटून घेतले.

बऱ्याच वेळाने तिने किलकिलत्या नजरेने पाहिले, सासूबाई अथरुणावर नव्हत्या. आणि माया पण ? ती अथरुणातच उठून बसली. स्वयंपाकघरात आहेत वाटत ?

एकदम तिला कुशकेने घेरले. ती उठली

आणि स्वयंपाकघराच्या भिंतीशी टेकून उभी राहिली.

"भीति वाटते ग आई!"

"रामाचं नाव घे बाई माझे, न् पिऊन टाक चटकन्! सकाळी—"

धराने एकदम निर्णय घेतला अन् ती स्वयपाकघरात शिरत म्हणाली;

"काय दिलंय् ते आई मायाताईंना?"

एकदम दचकून त्या म्हणाल्या;

"काही नाही बाळा, औषध, ...... गवती चहा..."

"मग मला पण द्या. आग आवून गेलंय् माझं न् डोक जड झालय्!"

माझ्याकडे लक्ष ठेवीत तिने त्याच्यापुढचे पातेले ओढले.

"छे छे ... भलतच ... धरा!" त्यांनी पातेले खेचून घेतले. आणि धराने मायाच्या हातचा पेला काढून घेतला.

"आपण मला परकी समजताय्!"
तिने पेल्यातला द्रव मोरीत ओतीत म्हटले;

"नाही धरा, नाही. तुला परकी समजायचं तर जगायच कुणाच्या जिवावर? वाटल होतं शिणून आलेली तू. कशाला मनस्ताप तुला. तुझ तरी वय काय ... पण... कशाला लपवू आता. ह्या पोरीनं आपल्या सर्वांच्या तोडाला काळं फासलंय् ग!"

धरा मायाजवळ सरकली. तशी माया एकदम तिला बिलगली. तिच्या पाठीवर हात फिरवीत धरा म्हणाली,

"आता मी पाठीशी आहे. मुळीच रडायच नाही.

"मी...मी तुझीच वाट पहात होते गऽ!"

पोरीला अस उराशी धराव, जगाच्या प्रहारापासून बचावावं अस आईलाही गेले चार दिवस वाटतय, पण ती हे जे करून बसली आहे ते कठोर होऊन निस्तरायला नको होतं काय?

धराने मायाला उठवून अथरुणावर झोपायला लावले. ती परत स्वयपाकघरात आली. पातेल्यातला उरलेला द्रव मोरीत ओतत असतानाच म्हणाली;

"त्याना साथ कुणी दिली हे समजलं?"

"काढून घेतल तिच्याकडून. इथल्या कॉलेजात शिकणारा पोरगा होता. लायब्रीत भेटला वाटत हिलाः..कसा आमच्या डोळ्यावर पडदा पडला ... कसं कळलं नाही देव जाणे."

"मग ह्याना 'तार करून बोलावू या अन् मग ते जातील त्याच्याकडे —"

"करून पाहिलं ते ह्यानी. आज चार दिवस झाले बघ हे लक्षात आलं त्याला. कॉलेजला सुट्टी होती. पत्ता मिळवून हे त्याच्या गावी गेले. पण त्या पोरानं साफ कानावर हात ठेवले. मग त्याच्या बापानं ह्यांचा अपमान केला. "कुणाची बिलामत, कुणाच्या गळ्यात घालताय्?" असं म्हणून उलट त्यानच आम्हांला खाली पाहायला लावलं आम्ही इतके खाली उतरलो होतो धरा, की, त्याची जात कोणती विचारली नाही की बाप काय करतो ह्याची पूसतपास केली नाही. एकदम हे लग्न लावून द्यायलाच तयार झाले होते — म्हणत होते; 'शेण खाताना विचार केला नाही, आता ती जाणे न् तिचं नशीब!' तुला काय सागू धरा! आता शात दिसताहेत ते तुझ्या जिवावर! तेव्हा त्याच्या गावाहून परत आले न् ओसरीवर धपकन् बसूनच गेले. आजवर कुठल्याही हानीच्या वेळी मी त्याच्या डोळ्यात पाणी पाहिलं नव्हत, पण ... ढसढसा रडले ..."

"आता काय ठरवल होतं?"

"तुझी वाट पहात होते. म्हटलं दिवाकरला तार करू या. तर म्हणाले, "दिवाकर न् धरा दोन नाहीत." डोळ्यातल पाणी टिपीत धराने म्हटले;

"मग आपण का बर ते प्यायला लावीत होतात त्याना?"

"आता कस सागू? वाटल सहज सुटका होईल तिची. सावित्रीन खात्री दिली."

"आता माझ्यावर सोपवावं सारं!"

> ## सुंदर ते ध्यान
>
> **सुंदर ते ध्यान उभे विटेवरी**
> **कर कटीवरी ठेवूनिया**
> **काय वानू आता न पुरे ही वाणी**
> **देवा! सर्व प्राणी रूपे तुझी**
> **परी मानवांच्या देहात विसत**
> **देवा! तुझे प्रेत भयानक**
> **रंजली गांजली जिवंत ही मढी**
> **तोडिती आतडी आपलीच**
> **आपलेच रक्त आपलेच मांस**
> **पोट जाळायास मिळे तया**
> **डोळे खोल भुके पोट लागे पाठी**
> **लक्तरांच्या गाठी जागोजाग**
> **चिपाडी शरीरे चेहरे भकास**
> **हसायाचे त्यांस ज्ञान नाही**
> **चाले आपल्याच प्रेतावरी त्यांचा**
> **नाच क्रूरतेचा अखंडित**
> **तरी तुझे ध्यान शोभे सिंहासनी**
> **वामांगी रुक्मिणी घेवोनिया**
> **धन्य देवा! तुझी धन्य तुझी शान**
> **धन्य महिमान विश्वंभरा**
>
> ***— मा. ल. व्यवहारे***

*

सकाळी परिणामाचा अदाज घ्यायला सावित्री आली होती. तिच्यापुढे चहाचा कप ठेवून सासूबाईंनी रात्रीची हकीकत सागितली.

"मोठी गुणाची आहे सून तुझी. म्हटल्यासारखं निस्तरील ती बिनबोभाट. शहर आहे ते, इथल्या ह्या वस्तीत आपण आपल्या परीन जमेल ते करीत होतो." मोरीतून चमत्कारिक आवाज येत होते. सावित्रीने विचारले;

"कोण ग ते मोरीत?"

"धराबाई! जाग्रणान पित्त झालंय् काय की!" हातातली बशी खाली ठेवून त्या लगबगीने मोरीकडे निघाल्या. सावित्रीही मोरीशी आली. आणि ओशाळी लपविण्यासाठी तोड पुशीत असलेल्या धराकडे पहात राहिली. मग एकदम आवेगान कोड सुटल्यासारखी ओरडली;

"अग कसल आलय् पित्त! खर साग पोरी, नातवड देणार ना तू उमाबाईला?"
धरा अधिकच ओशाळली.

अशा मनःस्थितीतही सासूबाईंचा उजळलेला चेहेरा पाहताच तिला वाटल, एकाच्या आगमनाचा केवढा हा उल्हास, आणि त्या दुसऱ्या एकाच?"

*

सध्याकाळच्या गाडीने वसुधरा मायासह परत निघाली.

नातलगानी उमाबाईंना खूप दोष दिला. सून एवढी दोन वर्षांनी आली आणि पुरे दोन

दिवसही राहिली नाही. जाऊ कशी दिली ?

" पण काय करणार ? दिवाकरला रजा मिळत नाही. सुनेला खूप उशीरा दिवस राहिले आहेत. तिच्याजवळ तर पाहिजे कोणी ? म्हणून तर मायाला न्यायला आली होती ती. जा म्हटल घेऊन. खूप जुळतं त्या दोघींचं. येईल. सातव्या महिन्यात आणू या ना डोहाळजेवणासाठी !" उमाबाई लक्ष्मीजवळ, काकींजवळ म्हणाल्या.

*

घरा गाडीत बसलेली आहे. माया तिच्या मांडीवर डोकं टेकून निजलेली आहे. वहिनीच्या पाठीराखेपणाची खात्री असल्यामुळे कित्येक दिवसांनी मायाचा डोळा लागला आहे. आता वहिनी जे योजील त्यापुढे माया निश्चितपणे मान तुकवणार आहे.

तिला केल्या चुकीचा पूर्ण पश्चात्ताप झालेला आहे. तारुण्याचा खळखळाट रिकाम्या मनात भरून गेला. अन् माया भान विसरून भलतीकडेच घसरली. आता विकाराचं वादळ शमलं आहे. शांत चित्तानं अभ्यास करील. शिकवावं तेवढं शिकेल. आपण मागेच हट्टान तिला आणायला हवं होतं आपल्याकडे. कोणी आपला शब्द तसा मोडला नसता. पण पैसे पाठवले की कर्तव्य संपलं अशा समाधानात होतो आपण. चूक आपलीच आहे.

आपण लगेच परत आलो हे पाहून दिवाकरला केवढं आश्चर्य वाटेल ! कसं सांगायचं त्यांना हे ? त्याची प्रतिक्रिया काय होईल ? ती विचार करीत होती.

पण तिचं मन वारंवार त्यावरून निसटून एका सापटीत चिमटून अडकून राही. सत्रा वर्षांच्या ह्या पोरीनं हे जे केलं; त्यात तिनं दुसरा विचार केलाच नव्हता. तो मुलगा तयार झाला असता तर मामंजी त्याचं घराणं, सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक परिस्थिती व्यसनं, स्वभाव, कश्शाकश्शाचा विचार न करता तिला त्या घरात ढकलणार होते. तिनं केलेलं तिनंच भोगावं ह्या विचारसरणीपोटीं हा त्रागा ! जन्माचं प्रायश्चित्त भोगणार होती ही. सासूबाईंचं औषध वर्मी बसलं असतं तर ? हिनं तेही ओठाशी नेलं होतंच. आता मी जे करीन तेही विरोधाशिवाय पार पडेल. आपली मान माझ्या हाती सोपवून ही भोळी पोर आश्वस्त झाली आहे.

मामंजी करणार होते तेच बरोबर होतं की सासूबाई करीत होत्या ते बरोबर होतं ? की मी करणार आहे तेच ह्या परिस्थितीत बरोबर आहे ?

मी जे करणार आहे ते...ते...पाप आहे काय ? पण मग...?

तिची बोटं मायाच्या घनदाट केशकलापांत फिरत गुंतत होती--

आणि तिचं मन; ह्या प्रश्नांच्या सापटीत अडकलेलं तिचं मन त्याच्या उत्तरासह बाहेर पडण्यासाठी झटापट घेत होतं.

• • •


५ वर्षे व अधिक
मुदतीच्या ठेवीवर आतां

५ १/८

टक्के व्याज मिळवा...

घरच्यापेक्षां महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहून व्याजहि भरपूर मिळतें. सेव्हिंग्ज खात्यावरहि ३% व्याज. चेकनें पैसे काढण्याची सोय. मुदतीच्या ठेवीवर ४१/८% ते ५१/८% व्याज मिळतें. विविध बचत योजनांचे माहितीपत्रक मागवा.

दि बँक
ऑफ महाराष्ट्र लि.

644 ११७७, बुधवार पेठ, पुणे-२




## सीता

काठोकाठ भरे आता
वेदनेचा रिता घट
भागीरथी तीरावर
सीता पाहे तुझी वाट

दुरवर पसरली
जीवनाची संध्याछाया
मीलनास आतुरली
राघवाची अर्धी काया


काय राया भोगणे हे
माझ्यासाठी तुझ्या भाली
विद्ध प्रीत ओघळते
अश्रूतून माझ्या भाली

कर्तव्याच्या धारेवर
कठोरा, तू चाललास
पुसशील का शेल्याने
माझ्या पदीच्या रक्तास

येरे अयोध्येच्या राजा
होउनीया माझा राम
पाय धरीन उराशी
तेच माझे मोक्षधाम

स्पर्श तेवढाचि पुरे
नको दृढ आलिंगन
प्रजाहितदक्ष राजा
मीही तुझी प्रजाजन

— अरविन्द लेले





## तुज द्याया आशीर्वादा

[ लग्न होऊन सासरी जाताना वीर सावरकरांची कन्या त्यांना नमस्कार करावयास गेली त्यावेळी त्यांच्या मनात असेच काही आले असावे. ]

तुज द्याया आशीर्वादा, उचलेना माझा हात
आशिष मी ज्यांना दिधला, झाला गे त्यांचा घात

प्रेमाने जवळी येती, जन तेही दग्धचि होती
देशार्थ सतीचे वाण, लौकीक जिण्याची माती

त्या ध्येयमुशीतुनि बनली, कविता जो कन्या झाली
अतनू ती असुनी तिजला, क्रांतीच जाळुनी गेली

जीवनी युद्ध वनवास, पांडवा परी मज झाले
परि शांतिपर्व विरहीत, अपुरे हे भारत घडले

शांतिदूत म्हणवुनि घेत, धर्मराज जरि तो होता
पृथ्वी दग्ध झाली असती, रक्तबिंदु त्याचा पडता

त्या रक्तबिंदुपरि मजला, शब्द हेच माझे गमती
होईल दग्ध तव दैव, माथी जरि तुझिया पडती

तुज द्याया आशीर्वादा, उचले मी जेव्हा हात
ही वत्सलता हृदयीची, अडवून करी आक्रांत

— सौ. सुशिला जोशी



# सवाई

प. त्रिं. सहस्रबुद्धे

**त्यानं अलगद खिशातून पाकीट काढलं. त्यातून पांढरी शुभ्र सिगारेट काढली. नाजुकपणाने हातांत धरून तोंडाशी नेण्याच्या पवित्र्यात बसत तो म्हणाला......" माचिस ! "**

मला मोठा अभिमान वाटे की निदान या बाबतीत तरी आपण समाजातल्या व्यक्तींना मोलाचा धडा देत आहोत. बाब क्षुल्लक असेल. तिचं मूल्यमापन केलं तर फारसं मोलाचं काही निष्पन्न होणार नसेल. ती ऐकल्यावर कदाचित काही नाकं मुरडतील, काही उपेक्षेनंसुद्धा पाहतील. पण मला मात्र वाटे की असेल; तसंही असेल, ती बाब लहान असेल क्षुल्लक असेल; समाजाच्या प्रगतीला किंवा अधोगतीला कारण होण्याचं सामर्थ्यही तिच्यात नसेल. पण म्हणून काय झालं, समाजाला शहाणं करणं, त्याला चांगल्या सवयी लावणं, वाईट सवयी काढून टाकण्याचा यत्न करणं माझं काम नाहीं का? मग या बाबतीत मी जर थोडकं का होईना पण काही चांगलं करण्याचा विडा उचलला तर चांगलंच नाही का? ह्याप्रमाणं वागून चुकणाऱ्या व्यक्तींना सुधारण्याचा प्रयत्न चालू ठेवला—सतत चालू ठेवला—तर योग्यच नाही का? अन् काही वेळा प्रयत्न सफल झाल्याचं आढळल्यावर कृतीतून व्यक्त होणाऱ्या माझ्या, समाज सुधारण्याच्या निष्ठेबद्दल, अभिमान वाटायला लागला तर कौतुकास्पद नाही का? ...म्हणूनच अभिमान वाटे की आपल्या हातून लहान बाबतीत पण मोठं कार्य होत आहे—

धूम्रवलयांची आवड मला लागली अन् मी सिगारेट आगपेटी बरोबर बाळगू लागलो. रस्त्यात, घरी किंवा आगगाडीत—जेव्हा जेव्हा लहर येईल तेव्हा तेव्हा खिशातली पांढरीशुभ्र सिगारेट काढून अलगद ओठांच्या मिठीत ठेवू लागलो. दुसऱ्या खिशातली आगपेटी काढून ऐटबाज पद्धतीनं काडी ओढून ती शिलगावू लागलो अन् तिच्या उग्र मुखातून अती हळुवार पणानं तरंगत तरंगत वर सरकणाऱ्या धूम्रवलयांच्या विविध आकारांकडे एकाग्रतेनं बघत जगाला – संसाराला ... सुखदुःखांना विसरू लागलो...

सिगारेट ओढल्याचं ठरवल्यावर व सहजतेनं ओढू लागल्यावर मी मनाशी खूणगाठ बांधली की धूम्रपान करायचं झालं तर ते स्वतःच्या सुखासाठी–आनंदासाठी. दुसऱ्यांना त्रास व्हावा म्हणून नव्हे. भरगर्दीतही इतरांच्या गैरसोयीकडे दुर्लक्ष करून धुराचे भपकारे सोडणारे महाभाग मी रोज पहात होतो. मौल्यवान सिगारेट विकत घेणं ज्यांना सहज परवडत असे ती पेटवण्यासाठी लागणारी आगपेटी मात्र गरीब दुबळ्यांकडून मागून घ्यायला लाजत नसत हे बघत होतो;

माझ्या दृष्टीनं या बाबतीत ते चुकत होते. त्या चुका आपल्या हातून होणार नाहीत याची दक्षता घ्यायच मी ठरवल. आणि सिगारेट अन् आगपेटी बाळगू लागलो.

एकदा गाडीत बसल्यावर मी नेहमीप्रमाणं सिगारेटच पाकीट काढलं. सिगारेट हातात घेतली अन आगपेटी ऐटीत बाहेर काढली. उघडली अन ध्यानात आलं की तीत एकही काडी नाही ! इतक्यात गाडी चालू झाली होती.

माझ्या परीक्षेचीच ही वेळ होती. सिगारेट ओढायची तर आपल्या जवळच्याच आगपेटीतल्या काडीन असा तर मी निश्चय केला होता. बसल्या ठिकाणी सिगारेट ओढणं कुणाला त्रासाच झाल नसत. कारण मी खिडकीजवळ होतो. डब्यात गर्दीही कमी होती. आता निवातपणानं धूम्रवलयाच्या रंगदार सगतीत सुखदुःखाना विसरू या कल्पनेनं मी सिगारेटही बाहेर काढली होती. पण ती पेटवायला काडीच नव्हती. अन् काडी असल्याशिवाय सिगारेटचा काय उपयोग ? ती काही चावून खायची वस्तू नाही; किंवा चघळायची लिमलेटची गोळी नाही. पण हातात धरलेली सिगारेट न पेटविता तशीच परत पाकिटात घालून ठेवणं मला फारच अपमानास्पद वाटणार होतं. जाता येता आपण पडलो तर त्यामुळे लागतही. पण आपल्याला खरं दुःख होत पडताना कुणी पाह्यल की काय याचं ! सिगारेट ऐटीत काढून काडी नाही म्हणून परत ठेवण — दुसरे पाहात असता ठेवणं — केवढ अपमानास्पद ! छे ! काही तरी मार्ग काढला पाहिजे ......

मी समोर पाह्यल. वर्तमानपत्र वाचणाराही दोन बोटात पेटलेली सिगारेट धरून, मधून मधून झुरके देत होता. इतर सर्व करतात त्याप्रमाणे 'प्लीज' म्हणायच अन् त्याच्याजवळची सिगारेट घेऊन आपली पेटवायची. मलाही सहज तस करता आल असत. पण माझा निश्चय जागा झाला. मीच जर तो मोडला तर दुसऱ्याना धडे देण्याच काम मी कसं करणार ? ...... खिन्न मनानं हातांतली सिगारेट तशीच चाळवीत ठेवली. सतापान रिकामी आगपेटी फेकून दिली अन् जणू काहीच झालच नाही अशा आविर्भावानं खिडकीबाहेरच्या सरकणाऱ्या देखाव्याकडे पाहात राहिलों.

सिगारेटची तलफ मला किती वेळ स्वस्थ बसू देईल ? केलेला निश्चय मला आगपेटीची भीक मागू देईना अन् सिगारेट ओढण्यासाठी मनाची चाललेली तडफड तर कमी होईना...

इतक्यात गाडी थाबली. जणू त्याच स्टेशनावर मला उतरायच होत अशा थाटात मी चटकन् उठलो अन् खाली उतरलो.

आणि स्टेशनवरच्या स्टॉलवर जाऊन आगपेटी विकत घेऊन सिगारेट पेटवली. अन् अपूर्व समाधानान धूम्रलहरीच सफाईदार हळुवार नर्तन पाहू लागलो.

पहिल्या वेळी जितका मनस्ताप झाला तितका नतर झाला नाही. तशीच वेळ पुन्हा आल्यावर मी कमी हळहळलो. पुढच्या स्टेशनावर उतरलो नाही. प्रवास सपल्यावर निवातपणान धूम्रपान केलं. गर्दीच्या ठिकाणी कितीही वेळ गेला तरी धूम्रपान न करण्याची सवय मला लावून घेतली. आणि या दोन्ही बाबतीत बरीच तपश्चर्या झाल्यावर मला वाटू लागल, आपण या बाबतीत दुसऱ्यानाही शहाण करायला नको का ? जी चागली गोष्ट आपण करतो ती दुसऱ्याना शिकवण आपलं कर्तव्य नाही का ?

एकदा मी धूम्रवलयाच सुकुमार नृत्य पाहात असताना चटकन् एकान मला म्हटल, 'मॅच बॉक्स प्लीज'. मी डोळचापुढ तरगणाऱ्या स्वप्नमालिका पाहता पाहता जमिनीवर आदळलो. समोर उची कापडाचे कपडे घातलेला एक जण मौल्यवान् सिगारेटशी चाळा करीत होता अन् आगपेटी मिळताच सिगारेट पेटवायच्या तयारीत असतानाच म्हणत होता, 'मॅच बॉक्स प्लीज !'

मी क्षणभर रोखून पाहिलं. मन सतापान, तप्त झाल. त्याच्या श्रीमतीच्या प्रदर्शनाचा हेवा वाटण्याच मला कारण नव्हत. पण उची कपडे घालणारा, मौल्यवान सिगारेटच पाकीट जवळ बाळगणारा हा इसम काडीची भीक मागायला लाजू नये याच नवल वाटल. चीड आली. त्याला धडा शिकवायलाच पाहिजे म्हणून मी सताप आवरीत पण निग्रहीपणानं म्हटल " माफ करा ... "

माझ्या म्हणण्याचा आशय उघड होता. आगपेटी त्याला देण्याची मला इच्छा नव्हती. वास्तविक त्याला हे सहज समजायला हव होत. पण जणू मी अनवधानान काही तरी बरळलो अस समजून तो अधिक निर्लज्जपणानं म्हणाला, " आगपेटी आहे की तुमच्याजवळ '—

माझा राग आता मात्र अनावर झाला. निर्लज्जपणाची ती कमाल होती याची जाणीव होऊन मी तीव्र स्वरात त्याला म्हटलं, " महाशय, माझी आगपेटी ही माझ्यासाठी आहे ... आपल्यासारख्यासाठी नाही ... "

क्षणभर तो स्तिमित झाल्यासारखा वाटला. असं उत्तर त्यानं बहुधा पहिल्यानच ऐकल असाव. दिवसभर सिगारेट ओढणारा तो असूनही स्वतःच्या आगपेटीची त्याला गरजच लागत नसे. नेहमीच उसनवारीवर जगणाऱ्याला उसन मिळाल नाहीतर खत वाटणारच. तशी त्यालाही वाटली पण क्षणभरच—

नव्या उत्साहान तो इकडे तिकडे पाहू लागला. त्याचे डोळे शोधकतेनं चहूकडे फिरू लागले. जागा जाईल म्हणून उठण तर शक्य नव्हतं. अन् आगपेटी तर मिळवायची अशा विचारानी त्याची हालचाल चालू झाली. अखेरीस दूर कुठेतरी बसलेल्या एका प्रवाशाला त्यान खुणेन आपली गरज सागितली. आगपेटी मिळवली अन् अपूर्व ऐटीनं त्यान धुराचे भपकारे माझ्या दिशेन सोडायला प्रारभ केला.

त्याचा विजय झाला होता ! माझ्या नाकावर टिच्चून त्यान फुकटेपणाचं दर्शन यशस्वी केल होतं त्याची कल्पना मी त्यामुळं खचून जाईन ! — पण मला त्याच काहीच वाटल नाही. मी जे ठरवल होतं ते माझ्यापुरत व्यवस्थित केल होत. नकार देऊन त्याला धडा दिला होता. अर्थात माझा शहाणपणा इतराजवळ नसल्यान, माझा समाजसुधारणेचा हेतू इतराना समजत नसल्यानं त्याच्यासारख्या फुकटयाचं फावत होतं. मी जणू काही झालच नाही अशा भावनेनं खिडकीबाहेर पाहात राहिलो. पुढल्या स्टेशनावर तो केव्हा उतरला याकडेही मी लक्ष दिल नाही मनात मात्र समाधान मानीत होतो की मनाचा कणखरपणा हलू दिला नाही आपण.

हा कणखरपणा सतत ठेवण मात्र मला जमत नसे. समजा, एखादा गरीब माणूस हातातल्या अर्धवट विडीकडे लक्ष वेधीत जर 'माचिस' म्हणून म्हणाला तर मी लगेच खिशातली आगपेटी काढून देत असे. अशा वेळी मनात येई—याला विडी ओढण्याची तलफ आली आहे. त्याच्या हातातली विडीदेखील

विझवून ठेवलेली आहे. कदाचित कुठेतरी पडलेल थोटूक त्यान उचलल असेल. विड्या विकत घ्यायला त्याच्याजवळ पैसे नाहीत तर तो काड्या कसा विकत घेईल ? ...

वागणुकीतला हा लवचिकपणा इतरानाही जाणवायचा. ठराविक गाडीन ठराविक डब्यात बसणारा मी. आगपेटी न देण्याची माझी सवय हळू हळू पुष्कळाना माहीत झाली. मौल्यवान सिगारेट हातात धरणारे पण आगपेटीसाठी भीक मागणारे असले की मी उद्दामपणान काडीला नकार देई, पण गरिबाना त्याची तलफ भागवायला चटकन मदत करी. वागणुकीतला हा लवचिकपणा पुष्कळाना माहीत झाला होता. त्यामुळे दुसऱ्याच्या काड्यावर आपली तलफ भागवणारे माझ्यापासून दूर जाऊ लागले. पेटीची याचना कमी होऊ लागली. मी मात्र मनाशी समजू लागलो की वा ! आपण पुष्कळाना शहाणं करून सोडल की. भिकेवर चैन करणं या सगळ्याना पटायला लागल की ! ...

पण समाज काही आगगाडीच्या ठराविक डब्यातच सामावलेला नाही. त्याबाहेर चहूकडे पसरलेला आहे. त्या सर्वांनाच शहाण करायला हवं. भिकेवर चैन करण्यापासून परावृत्त करायला हवं. एका डब्यातील लोकांना जर आपण शहाणं करू शकतो तर दुसऱ्या डब्यांतल्या प्रवाशाना शहाणं करणं कठीण आहे का ?...छे छे...त्यात काय कठीण आहे ?

माझा आत्मविश्वास बळावला. त्याला अहंकाराचाही थोडा कैफ चढला. अन् जग जिंकायला निघालेल्या सेनापतीच्या आत्मविश्वासानं मी पाऊल टाकायच ठरवलं. एकाच डब्यात ठराविक माणसांच्या समवेत बसण्याच मी बद केल...

रोज निराळ्या डब्यात बसायच. निराळ्या व्यक्तीच्या देखत आगपेटीसाठी अनाठायी भीक मागणाऱ्यांना स्पष्ट नकार दाखवण्याचं धैर्य दाखवायच अन् समाजात वाढत चाललेल्या या अनिष्ट सवयीच्या पाठीवर अधिकाधिक आवेगानं प्रहार करायचे अस मी ठरवलं अन् त्या प्रमाणं वागूही लागलो—

आगपेटी द्यायच बद केल्यावर प्रथम जे अनुभव आले त्याचीच पुनरावृत्ती होऊ लागली. दुसऱ्याच्या खिशातली पेटी ही आपलीच आहे अशा हक्काच्या भावनेनं काडी मागणारे भेटू लागले. ती न मिळताच जणू हक्काची वस्तू नाकारली गेल्याचा राग डोळ्यात उसळवून माझ्याकडे बघू लागले. अत्यत आदवीन, लाचारीन किंवा लोचटपणानं 'माचिस प्लीज' म्हणणारे ती न मिळताच गळा दाबू की प्राण घेऊ अशा भावनेन पाहू लागले...मी त्याच्या रागाकडे, सतप्त मुद्रेकडे किंवा व्याकूळ द्वेषभावनेकडे दुर्लक्ष करीत आपलं कर्तव्य बजावू लागलो.

नव्या नव्या प्रवाशांना मी पटी नाकारीत होतो. उची सिगारेट ओढणारानं स्वत:ची आगपेटी जवळ बाळगण किती अगत्याच आहे तस केलं नाही तर उचबळणारी तल्लफ थोपवून धरावी लागते. दुसऱ्याकडून काडी मिळेलच असा भरवसा बाळगून चालायच नाही. असे अनेक लहान मोठे धडे देत देत मी दिवस मागे टाकीत, अहंकाराच्या रोखान पुढ जात होतो.

पृथ्वी जिंकल्यावर एखाद्या शूराला अभिमानाचं भरतं याव तसा मला अहकाराचा कैफ चढू लागला होता. वर्षानुवर्षे आपण चिकाटीन असंच लोकाना स्वावलबी बनण्यास शिकवल तर खूप मोठ कार्य केल्यासारखं होणार आहे याचा मला विश्वास वाटू लागला. धूम्रपान करणाऱ्याना आगपेटी सहज दिसावी म्हणून मी ती बाहेरच्या खिशात किंचित वर काढून ठेवू लागलो. इतरानी पेटी मागावी, आपण नकार द्यावा व त्याच्या व्याकुळलेल्या, चिडलेल्या किंवा हताश झालेल्या चेहऱ्याकडे पाहाण्याचं समाधान उपभोगाव याची मला ओढच लागू लागली. असे प्रसग दिवसातून बरेच आले तर दिवस चागला गेल्याचं समाधान वाटू लागलं. अन् एक प्रकारच्या तृप्ततेची जाणीव मला उत्तेजित करू लागली.

मला वाटल मीच खरा समाजसुधारक, समाजातल्या एका वाईट सवयीला गळफास लावण्यास सरसावलेला— दुसऱ्याच्या जिवावर वाढणाऱ्या फुकट्या मनोवृत्तीला पायबद घालणारा— समाजाला उद्धाराच्या दिशेन, लहानशा बाबतीत का होईना, पण निश्चित नेणारा—

अशा भावनेनं मी वावरू लागलो,— पाहू लागलो...

अन् पत्त्याचा बगला कोसळावा; भरधाव जाणाऱ्या मोटारीची चाकं उखळून पडावी, घोंघावत जाणाऱ्या विमानाचे पंख तुटून पडावे ...तसच एकाएकी झाल...

त्या दिवशी मी खिडकीशी बसलो. नेहमीप्रमाणे सिगारेट काढली अन् आगपेटीतली काडी सफाईन ओढून ती शिलगावली. खिडकीतून घुसणाऱ्या वाऱ्याच्या झोतावरोबर धूम्रतरग आवेगान इतस्ततः फेकले जाऊ लागले. माझ्यासमोरच एक लठ्ठ माणूस बसला होता. सबध तोड वाढलेल्या दाढीन कळकट दिसत होतं. डोक्याच टक्कल. अंगातला खादीचा शर्ट. त्याची सोन्याची बटण मनगटावरच चमचमणार घड्याळ. ओंगळपणा अन् श्रीमती याच मूर्तिमत चित्रच समोर ठेवल होत जणू. तो माझ्याकडे सारखा पाहात होता. दुमडणाऱ्या ओठांतून बाहेर पडणाऱ्या धुराशी माझे डोळे चाळा करीत होते. तो मात्र माझ्याकडे— धूम्रपानाकडे स्थिरतेनं पाहात होता.

मला अशा दृष्टीची आता सवय झाली होती. आगपेटी मागणारे नेहमीच आसपास पाहून बसतात. फुकट वर्तमानपत्र वाचणारा ज्याप्रमाणं वृत्तपत्र वाचणारा शोधून त्याच्याजवळ बसण्यासाठी धडपडतो, त्याचप्रमाणे दुसऱ्याच्या आगपेटीवर स्वतःच्या सिगारेट्स पेटवणारे शोध घेऊन बसतात. ते नच जमल तर बसल्या बसल्या शेजारच्या माणसाच्या हालचालीतून पेटीचं अस्तित्व शोधून काढीत असतात.

समोरच्या माणसाची स्थिर दृष्टी कशाचा शोध घेत असावी. हे ध्यानात यायला म्हणूनच मला वेळ लागला नाही. त्याच्या खिशात सिगारेटची पेटी होती. आगपेटी नसावी. मी तर सिगारेट पेटवून चैनीत बसलो होतो. साहजिकच त्यालाही धूम्रपान करण्याची लहर आली असावी. पण मी आगपेटी देईन की नाही याचा त्याचे डोळे शोध घेत असावेत... हो... त्याचाच ते शोध काढीत होते...

त्यानं पेटी मागितल्यावर काय उत्तर द्यायच ते मी मनाशी ठरवू लागलो. शब्दन् शब्द जुळवला अन् वाट पाहू लागलो...... इतक्यात—

त्यान अलगद खिशातून पाकीट काढल. त्यातून पाढरीशुभ्र सिगारेट काढली. नाजुकपणानं बोटात धरून तोडाशी नेण्याच्या पवित्र्यात बसत तो म्हणाला...

" माचिस... "

मी लक्ष दिलं नाही. ऐकलंच नाही अशा

भावनेनं बाहेर पाहात राहिलो.

त्याच्या राकट बोटांचा स्पर्श माझ्या मनगटाला झाला. मी त्याच्याकडे पाहात— संपलेली सिगारेट फेकून देत— तोंडात साठलेला धूर मोकळ्यावर सोडून दिला...

" माचिस... "

" माचिस् ? " त्याच्या एका शब्दामागील सर्व अर्थ एकाएकी अन् सबध ध्यानात आल्यासारख्या खबीरपणानं मी म्हटलं, " माचिस हवी आहे तुम्हाला ?... "

" होय... " हातातल्या सिगारेटला हलवीत तो म्हणाला.

" एवढी उंची सिगारेट तुम्ही ओढता, मग आगपेटी जवळ बाळगायला काय झाल ? शर्टला बटण सोन्याची. मनगटावर घड्याळ, हातात उंची सिगारेट, एवढा थाट असणाऱ्यान सहा पैशाची आगपेटी ठेवू नये अन् दुसऱ्याच्या आगपेटीवर जगायचा यत्न करावा ?... "

" एकच काडी हवी आहे साहेब. " काहीशा खालच्या स्वरातच तो म्हणाला. मी ताण ताण दोन चार वाक्य बोलून गेलो पण त्याच्या शांतपणावर कसलाच निराळा तरंग उमटला नाही. काही ऐकलच नाही अशा आविर्भावानं तो पाहू लागला.

" महाशय, सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रत्येकाला एक एक काडी द्यायची म्हटली तरी आगपेटी खलास होते, समजल ? आगपेटी विकत घ्या अन् एकच काय पण दहा काड्या मग पेटवा..."

" साहेब, पण–"

" माफ करा. मला तुम्हांला पेटी द्यायची नाही. तुमच्यासारख्या ऐतखाऊ लोकांना धडा द्यायचं मी ककण बाधलं आहे. तुमच्याजवळ आगपेटी नसेल तर सिगारेट ओढू नका. नाही धूम्रपान केल म्हणून काय प्राण का जाणार आहे ? "

" बराच वेळ झाला. तलफ फार आली म्हणून म्हटल काडी द्या ... आगपेटी पण आहे तुमच्याजवळ –

" हो आहे ... " खिशातली आगपेटी बाहेर काढून त्याला दाखवीत मी म्हटल, " पाहिलीत ही ? आगपेटी माझ्याजवळ आहे. अगदी भरलेली आहे. पण तुमच्यासारख्या फुकट्यांना त्यातली एकही काडी मिळायची नाही, समजलात ? "

आता तो एकाएकी थांबला. त्याच्या

## अन्तर्नाद

कोळूनिया प्यालो सारे
सन्त, पंडित महन्त
परी नाही गवसला
माझा मला भगवन्त !

रात्रं-दिन धुण्डाळले
सूर्य तारका तेजात
—तारा ढळता पाहिला
नाही तियेही शाश्वत !

करूनिया आलो सारे
देशाटन... तीर्थाटन
सारा सोन्याचा मुलामा
भक्तिचे ना अधिष्ठान !

—आलो परतुनी पुन:
कोठुनि ही येत साद
हृदयीच्या हृदयात
तुझाच का अन्तर्नाद !

— रामकुमार

तोंडावरची याचनेची छटा हळू हळू ओसरू लागली. कपाळावर आडव्या रेघांचं जाळ विणल जाऊ लागलं. माझं बोलण जिव्हारी लागल म्हणून की काय, त्यान अधिक एकाग्रतेनं किंचित् ओठ दाबून माझ्याकडे बघायला सुरुवात केली ! खिशातल एखाद शस्त्र काढून हा आपल्यावर वार तर करणार नाहीना याची शंका मनाला चाटून गेली ...

त्यान खरच निश्चयीपणान नेहरू शर्टच्या मल्या मोठ्या खिशात हात घातला, मी चमकलो. आता खरच अपल्यावर आघात करणार काय ?...

अधिक तीव्रतेन–भीतीला दाबून ठेवीत मी त्याच्या हाताकडे पाहातच राहिलो...

खिशातल्या खिशात मूठ वळली गेल्यासारखी दिसली. मुठीत काहीतरी घट्ट धरल्यासारखी ती हालवली गेली.

क्षणाचा अवकाश. तो काहीतरी बाहेर काढणार अन् आपल्यावर आघात करणार ...

जीव डोळ्यात आणून मी बघतच राहिलो ...

पण त्यानं तस काहीच केल नाही. हात बाहेर काढला. जागच्या जागी तो उभा राहिला अन् दूरवरच्या प्रवाशाकडे खुणेनं आगपेटी मागू लागला. दुर्दैवान मात केली. त्या प्रवाशाजवळच्या आगपेटीतील काड्या संपल्या होत्या. त्यानं ती ताडकन् खाली टाकीत नाइलाज झाल्याचं सुचवल ...

मला एकदम हुपारी वाटू लागली. या फुकट्याची चागलीच जिरली अशा मुद्रेन, मनातल्या मनात हसत, अन् काहीशा विजयाच्या उन्मादान मी समोर बसलेल्या प्रवाशाकडे पाहिल.

अखेरीस आपली फत्ते झाली. टणक वाटलेला हा देखील अखेरीस नमला. त्यालाही अखेरीस धडा मिळाला ...

या सुखदायी विचारात मी रमून गेलो. अन् आता हा काय करतो याच निरीक्षण करू लागलो. तो पुन्हा आगपेटी मागणार. धूम्रपानाची लहर अनावर झाल्यानं त्याला स्वस्थ बसवणार नाही. अन् जवळपास तर पेटी मिळण्याची शक्यता नाही. अर्थात माझ्याचजवळ त्याला याचना करावी लागेल. आतापर्यंत दुसऱ्याच्या आगपेटीवर आपल धूम्रपान चालू ठेवणाऱ्यांना धडा दिला तसा यालाही देऊ. त्यान आगपेटी मागितली रे मागितली की त्याला असं बोलू की बेट्याला पुन्हा काडी मागायचा धीर होणार नाही. तसं झाल तर कोणते शब्द वापरायचे, कोणत्या अपमानास्पद वाक्यानी त्याला खजिल करायच याचा मी विचार करीत असतानाच–

त्याचा हात पुन्हा खिशाकडे वळला. अधिक निश्चयान तो स्थिर झाला. चहूकडे नजर टाकून शेवटी माझ्यावर ती स्थिरावीत तो थांबला–

चटकन् त्याच्या खिशातला हात निघाला. मूठ उघडली गेली. अन् तीतून आगपेटी निघाली ! –

स्वत:ची आगपेटी बाळगणारा, पण ती दडपून ठेवून दुसऱ्याच्या पेटीवर आपल व्यसन चालू ठेवणारा तो महाभाग आहे हे उघड होताच मी स्तिमितच झालो ! त्यान सिगारेट केव्हा शिलगावली मला समजलच नाही–

माझ्या डोळ्यांपुढे पाढऱ्या शुभ्र वलयाचा पिसारा उभारला जात होता. माझ्या अभिमानाला खजिल करणारा सवाई भेटल्याबद्दल मनात मात्र गडद अंधार पसरू लागला होता!

• • •



# अभिनय

श्रीराम वा. कुलकर्णी

" अनू ऽ ऽ— अनू "

—मी एकदम जागा झालो. माझ्याच ओरडण्यानं मी जागा झालो. बहुधा मी हात आपटले असावेत. पलंगाच्या दोन्ही कडा लागल्यानं ते दुखत होते. मी ताडकन उठलो. दरदरून घाम फुटला होता. तोंडावर गार पाणी मारलं ... जरा बरं वाटलं. पहाटेचं स्वप्न खरं होतं ! माझे पाय लटपटू लागले. मी आरामखुर्चीत अंग टाकलं — आणि माझ्यासमोर घड्याळ आलं, पाच वाजून पाच मिनिटं ! फक्त पंचवीस मिनिटं ... आत्महत्येला ... ! बापरे ! मी दचकलो... एकदम लाखो चांदण्या चमकल्या डोळ्यापुढं ... त्यात दूरवर कुठंतरी पिस्तूल गरगर फिरलं आणि एकदम आवाज झाला ... ठो ऽऽ !... माझे डोळे एकदम उघडले गेले ... पाच वाजून दहा मिनिटं ... फक्त वीस मिनिटं ...!

निश्चयानं मी उठलो. स्कार्फ गुंडाळला अन् कपडे चढवले. अशा पहाटेच्या वेळीसुद्धा पाणी प्यालो. थंड वाऱ्यानं जरा हुशारी वाटली. खाली उतरून मी स्कूटर सुरू केली ...

अनुपमेच्या बंगल्यावर निघालो. ... किती वेडा मी ! तिनं आत्महत्या तर केली नाही ना ? हे पाहण्यासाठीच चाललो होतो.

गाडी तिच्या बंगलीशी थांबली. दिवाणखान्यातला दिवा लागलेला होता. दार वाजविण्यासाठी थाप मारली ... अन् ते उघडलंच गेलं ... " यावेळी दार उघडं ? " मन चुकचुकलं. आतल दार बंद होतं. प्रथमदर्शनी असलेल्या टेबलावर कागद पडले होते. शेजारच्याच घड्याळात पाच वाजून पंचवीस मिनिटं ...! वरच्या कागदावर लिहिलेलं एकच वाक्य —

" माझ्या आत्महत्येला कोणीही जबाबदार नसून मी स्वतःच आहे..." मी शहारलो. एकदम ओरडलो — " अनूऽऽ " — मधल्या दारावर थाप मारली. आतून क्षीण आवाज आला — " कोण ? "—" मी ... मी आहे ... नितिन् ! — अनूऽऽ " दार उघडलं गेलं ... पांढरा फटफटीत चेहरा ... ती खाटेवर कोसळली ... जवळच्याच टेबलावर एक पिस्तूल होतं ... !

मी तिला गदगदा हलवलं ... " अनूऽऽ अनूऽऽ" मी — ओरडतच होतो. माझ्याच डोळ्यातले दोन थेंब तिच्या गालावर पडले. तेव्हा तिचे डोळे किलकिले झाले आणि मलाही जाणीव झाली ... पाणी ... तिच्या तोंडावर पाणी शिंपडलं ... मग ती क्षीण हसली, म्हणाली " तू ?... बरं झालं ... ! "

माझ्यावरचं दडपण कमी झालं! एक कप कॉफी करून दिल्यावर तिला चांगली हुशारी वाटली. " तुला कसं कळलं ? ... " ती पुटपुटली. पण तिचा आवाज अशक्तच होता. मी म्हणालो. " हे पहा अनू, तू शांत पड. काही विचार करू नकोस ... "

"— पण तू जाऊ नकोस ... खरं ... खरंच जाऊ नकोस ..." डोळे मिटल्या मिटल्याच ती म्हणत होती. तिनं आपले क्षीण डोळे उघडले ... केवढे आर्जवी डोळे ! ...

त्याला एकदा वडिलांचं पत्र आलं होतं की, " तू एका अशा जगात वावरतो आहेस की जिथं सौंदर्याची पूजा चालते असं जग म्हणतं...... पण परवा मला कुणीतरी एक मासिक दाखविलं -- आणि मला आता निश्चित वाटू लागलंय की, पूजा या शब्दाची ती विटंबना आहे — तू अजून लहान आहेस ! पहा ... विचार कर ! "

---

" खरंच जाऊ नकोस ! खरच ... नाहीतर पुन्हा कालच्यासारखं – पण ते वाक्य अपुरच राहिलं. – मला इकड येताना ही शका चाटून गेली होतीच –

– मी बाहेरच्या खोलीत एका आराम-खुर्चीत येऊन बसलो. बरेच कागद लिहिलेले दिसत होते. फक्त सुवाच्य निश्चयपूर्ण अक्षरात लिहिलेला वरचाच कागद होता–" माझ्या आत्महत्येला ... " पुढचं काही न वाचता मी त्या कागदाचे तुकडे केले ... अप्रिय विचाराची, घातक घटनाची साखळीच जणू तोडीत होतो मी. अनुपमा माझ्या आयुष्यात कशी आली ते आठवू लागलो.

* * *

... एक ऐटबाज वळण घेऊन माझी स्कूटर स्टुडिओच्या आवारात आली. आज मी खुषीत होतो अस म्हणणच जास्त बरोबर ठरल असतं. त्यावेळी एक पटकथा मी जगदीशप्रसादना दिली होती. ते चागले दिग्दर्शक आणि जाणकार होते. त्यांनी त्याबद्दल शाबासकीही दिली होती. हो ! शाबासकीच की ! कारण, जगदीशप्रसादांसमोर मी एक " छोटा " लेखक होतो. वयान... अनुभवानं गाणी लिहिण्याचं धाडसही केलं... येथपर्यंत ठीक... पुढ सगीत दिग्दर्शकाच अन् माझं जमेना... तेव्हाही जगदीशानी मला समाळून घेतलं ! रसिकाच्या पुढ मी चमकलो...एक पटकथालेखक आणि कवी म्हणून ! पुढच्या चित्रपटाच्या वेळीही जगदीशानी मला अगत्यानं बोलावलं.... सागितल–– " हे पहा, नितिनबाबू, हे तुमचं ऑफिस ! " मी चकित झालो. दारावरच्या पाटीवर लिहिल होत. " कथा–पटकथा–काव्य-विभाग. " खाद्यावर हात ठेवून ते मला म्हणाले होते .. " कलाकार मिळविले अन् टिकवले म्हणून आम्ही मोठे, बरं बाबू ! " खरच मी त्याच्यापुढं " बच्चा " होतो याची तीव्रतेनं जाणीव झाली... त्या स्नेहामुळंच मी खुषीत होतो... आजकाल... !

...त्या दिवशी स्टुडिओत मी नेहमीप्रमाणे नवाला पोहोचलो. पायऱ्या चढलो. चपराशानं सलाम केला. शेजारच्या खोलीत तबोरा लावला जात होता तिथूनही " नमस्ते "चा एक आवाज आला. एक दोन एक्स्ट्रॉ नटचा " गुड मॉर्निंग् "चा–– स्टायलिश् उच्चार करीत सामोऱ्या आल्या. झटकन् डाव्या बाजूला वळून माझ्या ऑफिसात आलो.

खुर्चीवर बसण्यापूर्वी खिडकीचा पडदा दूर केला. इथं बसल की समोरचं निळ आकाश, आणि दूरवर दिसणारे घूसर पर्वत पहाता पहाता मी धुद होई आणि लिहू लागे...

" आत येऊ का ? "

—या आवाजान मी दचकलो. मी माझ्याच तद्रीत असल्यान कोणीतरी दुसऱ्यादा विचारत होत—

" येऊ का, प्लीज् ? "

" हो, या ना ! "

एक सुदर तरुण मुलगी सथ गतीनं, खालच्या मानेन आत आली... साध्या वेषात ........ ! या चित्र–जगतात हा ' प्रवेश ' नवीनच वाटला मला ! पण तरीही बावरलोच !

" कुणाला भेटायचंय् आपल्याला ? " कदाचित् चुकून आपल्याकडं आल्या असतील या जाणिवेन विचारल !

" नितिन्— ! आपणच ना ? " ती अडखळत म्हणाली.

" काय काम आहे ?— " खाली बसा म्हणायचा शिष्टाचार मी विसरलो याची जाणीव झाली मला. जरा गडबडून का होईना चूक दुरुस्त केली...

" बसा... बसा ! मीच नितिन् ! "

पण ती न बसताच म्हणाली,

" माझं काम होत तुमच्याकडं ! " मलाहि जरा बरं वाटलं. संभाषणाची अडखळणारी गाडी रुळावर आली होती... शातपणे खुर्चीकडं बोट दाखवून मी म्हणालो–– " ह. काय काम होत ? " खाली मान घालून तिन सागितल—

" कालच मी आपल्या कंपनीत आले.— माझं नाव सीमा सरदेसाई. जगदीशानी मला सागितलं— " सीमा नावान तुम्हाला या सृष्टीत आता वावरता येणार नाही. आधीच एक सीमा या क्षेत्रात आहे तुम्ही दुसर नाव पसंत करा. "

ती थाबली. आपली मान जरा वर करून तिनं आपल बोलणं पुढं सुरू केल.

गालावर नाजुक हास्य उमटलं... " तर

आपण, प्लीज्, नाव सुचवाल का ? "

तिचे डोळे जेव्हा जमिनीकडे लागले तेव्हा मला समजलं तिचं बोलण संपलं आणि तरी आपण तिच्याकडेच—

—आणि मग मी खिडकीतून बाहेर पहायला सुरुवात केली...निळं निळं आकाश...धूसर पर्वत...एक सुंदर उपवन...अन् त्यात ही मुलगी. तिच्या शेजारून किती तरी फुलं, वेली, चादण्या पळत होत्या. शिल्लक होती फक्त तीच ! जणू साऱ्या उपमाच कमी पडत होत्या—आणि मी एकदम म्हणालो—

" अनुपमा ! "

—ती दचकलीच ! कारण...त्या शात खोलीत तो आवाज तिला अनपेक्षित वाटला असावा.

" माफ करा हं ! नाव नाही समजल ! "

" अनुपमा ! " मी पुन: म्हणालो.

—आणि ती एकदम हसली. चद्राच्या किरणानी कमळं जशी हळू हळू विकसतात तशी—तिच्या गालावरच्या खळया, बोलके डोळे, सारेच हसले—अगदी मनापासून !

" इतकी सुंदर आहे मी ? "

काय हा प्रश्न ? किती अवखळ ! पण तो सहजस्फूर्त होता. दाटलेला सुगंध कमळातून बाहेर यावा तसा ! पण त्या प्रश्नानं जणू परकेपणाचा पडदा फाडून टाकला.

बराच वेळ शातता पसरली. मग ती म्हणाली " थँक् यू ! " पुन्हा एकदा मागे पाहून हसत ती निघून गेली.

—थोडा वेळ झाला असेल तोच जगदीश आत आले. अनुपमेसंबधीच बोलले. आजारी वडील आणि धाकटी लग्नाची बहीण...म्हणून तिन अर्ज केला होता. जाताना ते म्हणाले... " आत्ता दोन मिनिटापूर्वी भेटली; तेव्हा तिन आपलं चित्रपटसृष्टीतील नाव सागितलं. अनुपमा ! नाव छान आहे. "

त्यानतर एकदीड महिन्याची गोष्ट. सध्याकाळी मी दुसऱ्या मजल्यावरील जिना उतरत होतो. त्यावेळी अनुपमा घाईघाईन स्टुडिओच्या फाटकातून आत येत होती. तिचा चेहरा कमालीचा गभीर आणि चिंतामग्न वाटत होता. मी खाली पोहोचलो तेव्हा व्हराड्यातल्या एका खाबाला टेकून ती उभी होती. तिचे डोळे जगदीशांच्या ऑफिसाकडं लागले होते. आणि त्या दाराला कुलूप होतं. तिनं डोळे मिटले. तिचे ओठ थरथरत होते. मला वाटलं आता ती मोठ्यानं रडणारच. मी भरभर पायऱ्या उतरलो... तिच्या गालावरून अश्रू वाहात होते...मी गडबडलो. काय कराव नी काय बोलावं ते सुचेना ! व्हरांड्यातच एका बाजूला मी बाहेर पहात उभा राहिलो. तिला माझी चाहूल लागली की काय न कळे पण ..तिन गाल अन् डोळे पुसले होते, ती माझ्या शेजारी येऊन उभी राहिली. तिलाही काय बोलाव ते समजलं नसावं...शेवटी तिनच सुरुवात केली—

" साहेब केव्हा गेले ? " ती जगदीशांना साहेब म्हणत असे.

" ते साडेपाचलाच आपल्या गाडीतन गेले. "

" केव्हा येणार आहेत ? "

" मला वाटत, काही सामान आणायला नी कुणाला तरी भेटायला ते मुबईला गेलेत. दोन तीन दिवसातच येतील. "

" अं...मग... "

" काही अडचण होती का ? " तिच्या केविलवाण्या नजरेकड पाहून मी एकदम विचारलं.

" नाही...हो...पण "

" मी आपणाला मदत करू शकेन; काय काम होत ? "

मग तिला पुन्हा रडायला आलं. हुंदके देतच तिन सांगितलं होत...तिच्या वडिलाचा आजार आज जास्त झाला होता. तिला पैशाची नड होती. ती स्टुडिओकडे याचसाठी आली होती. तिला वाटलं होतं जगदीश भेटतील. काही पैसे मिळतील.

" मग असं करा...आपण जाऊ या डॉक्टराकडे. "

" मी तिला स्कूटरवर बसायला सागितल ...डॉक्टरांना घेऊन मीच ने-आण केली.

पण दुसऱ्याच दिवशी सकाळी ती माझ्याकड पुन्हा आली...तिचे वडील गेले होते...! ...तेव्हाही मीच मदत केली. प्रसग सपला. एक ताटातूट झाली आणि दोन नवीन जीव ऊब शोधू लागले.

मी प्रत्येक रविवारी सायकाळी स्वैर मनानं भटकायला बाहेर पडतो. तसा आजही निघालो. पण आजच्या रविवारचा रंग काही औरच होता. नेहमीप्रमाणे मी बाहेर पडलो. अगदी बेफिकीरपणे; गती वाढवीत वाढवीत! वाढत्या गतीची माझी हौस खूपच !...पुष्कळ दिवसापूर्वी मी कविताही केली होती... ' वेगवेड्या यौवनाची आगळी प्रस्तावना! '

पिवळसर डोगराच्या अगाखाद्यावरून वळणं घेत काळा रस्ता धावत होता. डाव्या बाजूला छोटचा पायवाटा नाजूक वळणांनी झाडाझुडपांतून कुठल्याशा खेड्यात उतरत होत्या. उजव्या बाजूला चढता कडा नजरेला आव्हान देत होता. आणि सर्वांना जिवंतपणा आणणारे कोवळे किरण हळू हळू गुलाबी होत पश्चिमेकडे चालले होते. एका उच शिखरावरून त्या शेवटच्या किरणानं धूसर जगाकडं पाहून घेतलं अन् तो लुप्त झाला. चढ सपला नी गाडी माथ्यावर आली— त्याचवेळी पाठीमागून करडा हॉर्न वाजला— ती सुद्धा स्कूटरच होती अस उजव्या आरशात दिसलं. मी उजवा हात आडवा केला, मैदानात आलो; आणि पाय टेकवले. '

—केवढं समाधान वाटलं मला ! त्या निळ्या डोगराच्या आड ताबूस सूर्यानं दडी घेतलेली पाहिली — आकाशातल्या मेघाच्या खवल्यावर त्याची पदचिन्हं अजून कायम होती — सारं पाहून तृप्त झालेले डोळे मिटले. अतरात साद मिळाला. समाधानानं हसलो नी डोळे उघडले—

समोर अनुपमा उभी होती !

जवळच तिची स्कूटर होती.

माझे डोळे दिपले — कसलासा झगझगीत प्रकाश माझ्या डोळ्यावर पडला होता ! हूं! समोर अनुपमेच्या हातात कॅमेरा होता !

" बिचारा सूर्य ! " ती पुढ येत म्हणाली.

" का ? "

" आपला भक्त त्याला पहायला मिळाला नाही ! " आम्ही दोघेही हसलो.

" तुम्ही कशा आलात ? "

" तुम्हाला कितीतरी शोधते आहे. मला, मला तुमचे खूप खूप आभार मानायचेत ! "

" कशाबद्दल ? "

" तुम्हाला माहितच आहे; जगदीशकाका किती खूष आहेत माझ्यावर ! " तिचे वडील गेल्यापासून ती जगदीशाना " जगदीशकाका " म्हणू लागली होती. ते म्हणतात, ' आमचा नवा चेहरा दोन तीन वर्षात इतक काम करील स वाटल नव्हतं. ' टीकाकारानी तर मला उचलूनच धरलय ! पण केवढी चूक ! "

" चूक ? "

"होय. त्या सर्व यशाचं श्रेय तुम्हाला आहे. पण. . . तुम्ही आपले आपल्याच लह-रीत !"

"छे ! छे ! एकाच स्टुडिओतले लोक आपण.. त्यात आभार कसले !...

"तुम्ही मला एक सुदर नाव दिलत, शब्द दिलेत . काव्य दिलत. मी हे नाव मोठं करणार आहे. मोठ–खूप मोठं !" ती एका दमात सार काही बोलत होती. तिच माझ्याकड लक्षही नव्हतं. तिला अडवीत मी मधेच म्हणालो...

"आज स्तुती-डे आहे का ?"

"छे ! छे ! अगदी खरखर बोलतेय "...

–मग माझा हात धरून जवळ जवळ ओढीतच तिन एका शिलाखडावर आणल. ती बसली नी शेजारी हात आपटीत म्हणाली, 'बसा ना ! '–मी खाली बसलो.

"तुम्ही बोलत का नाही ?"

"मी ऐकतोय् !"

"अहो पण मी तरी कुठ बोलते आहे !

आमच्या समिश्र हसण्याच्या ध्वनीची चाहूल चद्राला लागली असावी; म्हणून त्यानं पूर्वेच्या डोंगरातून हळूच भुवया ताणून पाहिलं–आणि मग तो पूर्ण वर आला.

"सारख चद्राकड काय बघताय ?"

"मलतच !" मी म्हणालो, "आता हा चद्र इथ असताना कोण बघेल त्याच्याकड ?" मी एकदम म्हणालो.

"मग तिकड काय बघताय ?"

"छे ! माझ्या चंद्राकड कोण लपून बघ-तंय ते मी पहात होतो."

–ती मनमोकळेपणाने हसली. तिच्या डोळ्यात एक वेगळीच चमक येऊन गेली.

मी उठलो अन् ती उठली.

–स्कूटर्स उताराला लागल्या होत्या !!

एकाच दिशेनं अंतरावरून धावत होत्या !!

* * *

–आजसुद्धा रविवारच आहे. पण मी तो नाही ! मी असाच एका झाडाखालच्या हिर-वळीवर पडलो आहे. दूर ! जिथ मला अनुपमा भेटणार नाही ! गेले कितीतरी रविवार मी असाच दूर जातोय्. - त्या दिवशी ज्या वेगात आमच्या स्कूटर्स घाट उतरल्या त्याच वेगात आम्ही 'आपण' पासून 'अरे' पर्यंतचा घाटही उतरलो. पण मला तेव्हा "लाल कदील" दिसला नव्हता ! आणि आज–? आज मी ठरवलय हा रस्ताच बदलला पाहिजे ! कारण–

–मला एकदा वडिलाच पत्र आल होत–

"एका अशा जगात तू वावरतोस की जिथं सौंदर्याची पूजा चालते अस जग म्हणत. –पण परवा मला कुणीतरी एक मासिक दाखवल–आणि मला निश्चित, वाटतय् 'पूजा' या शब्दाची विटंबना आहे ही !

"तू अजून लहान आहेस ! पहा–तुझ्या सदसद्विवेकबुद्धीवर माझा पूर्ण विश्वास आहे .." विश्वासाच्या आड थरथरणार बाबाचं मन हेच सागत होत, जणू तू ज्या जगात वावरतोस–चित्रपटांचं जग–वाईट अनीतीचं जग आहे..."

चित्रपटविषयक मासिकात माझा "उदो उदो" वाढला तसतस माझ्या भोवतालच गूढपणाच वलयही वाढतच चालल. वस्तुत: माझ्या आणि अनुपमेसबधाच्या फार पुढच्या अवस्था या मासिकातून ध्वनिक्षेपित होऊ लागल्या होत्या. दुःख एवढच होतं की तिच्याशी नातं असणारा एकटा मीच नव्हतो. अनेकजण होते–अनेकजण !!

या धूसर जगात सिनेरसिक, एक्स्ट्रॉ नटचा, मासिक, थिएटर्स मध्येच पुढंपुढं करीत. "नितिन आणि अनुपमा !" पण...ते सारं खोटं आहे !

म्हणूनच मी असा दूर येऊन विचार करीत बसलो आहे. दोनतीन वेळा ती माझ्या-कडे आलीही पण ... तिचं स्वागत आणि निरोप एकाच वाक्यात केला ... "बस्स ! पुरे हा अभिनयाचा धदा !"

... आता अधार वाढतो आहे. मनातल्या अधारात माझा "मी" गमावून बसलो आहे. आत्ता निघालच पाहिजे. ... स्कूटर स्टार्ट करतानाच मी जवळ जवळ निर्णयक बाबीसारखा पुटपुटलो ... "हं ! तो काळ आता इतिहासजमा केला पाहिजे ! ज्याला अनुपमेनं नाव दिल 'प्रीती' ते तिचं वर्तन आता विसरल पाहिजे ... आणि ती पुन्हा आली तर ... ? तर ... ? सारे सबध तोडून टाकायचे !" अशा विचारानच माझा पाय जोरात दाबला गेला ... स्कूटर सुरू झाली...

–माझ्या मनाविरुद्ध स्कूटरचा वेग कमी झाला. नव्या चित्रपटाची जाहिरात लागली होती.—

"प्री ति सा फ ल्य"

अन् एका पोस्टरवर–अन् कुणाच्या तरी बाहूत—

सारे पोस्टर्स–गाणी–तिचे सेटवरील टेक्–रीटेक, आणि हसण, बोलणं, खिदळण–सारी एखाद्या चित्रपटासारखी सर्रकन सरली. जणू प्रत्येक चित्र विचित्रपणे किंचाळत होतं, चिडवीत होत ... "अभिनयाच्या जाळ्यात नितिन् फसला ... !" – मला वाटलं मी आता पडतोच आहे. पण सावकाशपणे मी मनाचा नी स्कूटरचा तोल सभाळला ...

खोलीत आल्यावर प्रथम बाथरूममधे जाऊन डोक्यावर पाणी मारलं नी चूळ भरली. ... मग मला आठवलं, मी कित्येक दिवसात काव्य केल नाही नी स्टुडिओतही गेलो नाही ... आत्तासुद्धा असाच सध्या-काळच्या अधारात मी पडलो होतो ...

"येऊ का ?"

हं ! अनूच होती ती ! मी काही बोललो नाही.

"तब्येत ठीक नाही ?" ... थोडा वेळ थावून पुन्हा तिनं विचारल "दिवा नाहीस तो लावला ?"

जणू सारा क्रोध, चीड उपरोधात एकत्र झाले–मी म्हणालो–"लावलेत तेवढेच पुरे!"

"थांब ! मी ... लावते !"

"नको ऽऽ" मी कडाडलो. दिव्याच्या प्रकाशात तिचा निष्पाप चेहरा एकदम धाब-रल्यासारखा दिसला. पण मला हे सार संपवायच होत .. "नको ऽऽ नको ऽऽ !" मी पुन्हा ओरडलो.

मग शांतपणे ती म्हणाली "खरंच नितिन् ! अलिकडे झालय् काय तुला ?"

"पुरे ! पुरे हा अभिनय !"

"अभिनय ? कसला ?"

"हा सुद्धा त्यातलाच भाग !"

"काय ! काय बोलतो आहेस तू हे ?" ती जवळ येत आर्जवान म्हणत होती ... हे सुद्धा नक्कीच नाटक ! वडिलाचे शब्द माझ्यापुढून पुटपुटून गेले ... "अभिनयाच जग ..." पलगावरून उठून बसत मी ओर-डलो–

"जा ! जा तू इथनं !"

– पण ती गेली नाही ! एका कोपऱ्या तल्या खुर्चीत ती बसली. ती रडत होती ?... छे, अभिनयच असणार तो ! !

रडण्यात आणि कारुण्यातच अभिनयाच-

कस लागत असतो ! ... मी गच्चीत येऊन बसलो.

ती पुन्हा आली. तिन कपात कॉफी आणली होती...मी दृष्टी दुसरीकडे लावली...तरीही ती बोलतच होती .. "माहित आहे तुला नितिन् ? जगदीशकाका गेले आठ दिवस दिल्लीला गेले आहेत..." मी तिच्या बोलण्याकडे लक्षच देत नव्हतो.

"ह ! म्हणजे माझा मूर्खपणा, मी आले! तू केलेल्या उपकारांची जाणीव ठेवली हा मूर्खपणा ! "

"पुन्हा अभिनय ! "

"कितीतरी अशा गोष्टी मी केल्या, केवळ तुझ्यासाठी, तुला सांगितल्याही नाहीत."

"का ? "

"आत्तासुद्धा सागितल्या असत्या, पण मला स्वत:वरून दिवे ओवाळून घेण्याची सवय नाही ... तुझ्याच कथा असतील तर मी चित्रपटात राहीन अशी मी अट घातली हे ठाऊक आहे तुला ? खरच. कस सागू नितिन् तुला ? मला तू समजावूनच घेत नाहीस. मला काय करायचाय अभिनय तुझ्यासमोर करून ? "

मी एक जांमई दिली.

ती उमी राहिली. तिचाही आवाज थोडा चढला होता. पण त्यात कसला तरी निश्चय होता – कदाचित अभिनयच असेल तो !

"गेले कित्येक दिवस मी पहाते आहे ... तू पूर्वीसारखा बोलत नाहीस ... "अभिनय ! अभिनय ! खोटं नाटक !! " असं का म्हणतोस ?" तिनं आपल्या दोन्ही हातांनी तोंड झाकून घेतलं ... नी दाटलेले डोळे पुसले ... कंठ साफ केला ...

माझं मला आश्चर्य वाटलं ... कोणता निश्चय सचारला माझ्यात कोण जाणे...पण ... वडिलाचं पत्र, मित्राचे उपदेश चित्रपटसृष्टीतील अनेक वावड्या माझ्या शब्दाना धार देत होत्या.

"अखेर तू एक नटी आहेस हे मी विसरलो ! " "पण तिनं माझे शब्द ऐकले नाहीत. ती गर्रकन् मागे वळली ... झप्झप् पावल टाकीत निघून गेली ...

... तरीही मला झोप नीट लागलीच नाही... ! आणि पहाटे स्वप्न पडलं. स्वप्नात वर्तमानपत्रवाल्या मुलान आरोळी ठोकली. जणू अतर्मनानं सगती लावली ... "ज्यात अभिनय नाही ... ती आत्महत्या ? " ... आणि मी इथ – तिच्या बंगलीत – आलो होतो. सारं काही आठवलं ... मला सारखं वाईट वाटत होत, आपलं चुकल ...

— तोच आतल्या खोलीतून कसलासा आवाज आला. मी झटकन् उठलो नी दरवाज्यात उभा राहिलो. तिच्या एका हातात पिस्तुल नी दुसऱ्या हातात पाकीट होत ... मी शहारलो ! ओरडणारच होतो पण तिन ते पिस्तूल कपाटात ठेवून दिलं. तिचं माझ्याकड लक्षच नव्हतं. तिन कपाटातून एक डायरीही काढली.

"खरच तू आत्महत्या करणार होतीस सीमा ? "

"करणार होते ... पण आतां नाही ! निदान माझ्या मरणाला तरी तुला अभिनय म्हणता आलं नसत ! नटीलादेखिल मरण्याच नाटक करता येत नाही ! पण आता मला जगायच आहे. खूप जगणार आहे !

"का ? "

"मला दोन्ही सारखच होत ! ... तुझी प्रीती आणि स्वर्ग. मला तुझं प्रेम मिळाल—"

"ते कस ? "

ती माझ्या हातात पाकीट देत म्हणाली.

"नाहीतर तू कसा आलास इथं ? कोणी ओढून आणलं तुला – "

... मी जगदीशाच पत्र वाचू लागलो ...

..."पोरी, तुझे वडील गेले नी मी तुझा काका झालो .. मी आता विचार करतोय, तुझ आणि नितिनच लग्न कराव !

—कारण, अगदी साध ! पाहून न पहाणं ज्याला जमतं त्याला म्हातारा म्हणतात. मी असाच आहे. अगदी ... पहिल्या दिवसापासून माझ लक्ष तुमच्यावर आहे.

उतावळी होऊ नकोस. मी दिल्लीहून परत आलो की प्रथम तुम्हाला चतुर्भुज करणार ..."

माझे डोळे भरून आले. पत्र मिटलं ... तिन उघडलेल्या डायरीच पान माझ्यापुढं घरल ... तिचे डोळे ओले होते.

"आज बाबाची तब्येत जास्तच होती. नितिननी मदत केली. डॉक्टर येऊन गेले ... पहाटेच्या सुमाराला ... ते खोल आवाजात म्हणत होते "... धाकटीच लग्न झालं ... पण ... तुझ कस होणार ग ? तुझं ... तुझं लग्न झाल असत म्हणजे — " मला हुदके आवरेनात ... पण बाबाना सुखाचा मृत्यू पाहिजे होता ... धीर धरला नी म्हणाले ... "मी सुखी होईन ... ते मघा आले होते .. नितिन् ... त्याच्याशी ... माझ लग्न ठरल आहे". "कोणते ? " ते पुटपुटले. "मघाशी डॉक्टराना घेऊन आले होते ... पैसे दिले ज्यानी ते ... मग त्याच्या डोळ्यात अश्रू आले ... "सुखी व्हा ! " – हे दोनच शब्द ...

... पण हे सारं नितिनला कस सागू ? "

— मी डायरीही मिटली.

— माझ्या अश्रूंच्या नदीला पापण्याचे बाध अपुरे पडले ! मी अनुपमेकडे पाहिलं – तीही रडत होती ... ती आवेगानं पुढं आली – आणि – आम्हीच परपस्पराचे अश्रू पुसले !

• • •


भारत सरकारकडून 'रजिस्टर्ड' केलेलें

# पांढरे डाग

अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले व नित्य मिळतात.
औषधाची किंमत ६ रुपये. माहिती मागवा. मोफत पाठवू.
नकली वैद्यापासून सावध राहावे.

**असबाचे औषध** किंमत ५ रुपये

वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद-भवन ( माणू )
मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

गोवा साहित्य-संमेलनाचे ‘ वृत्तान्त ’ अनेक ठिकाणी येऊन गेले. काही म्हणा, पण ‘ आग्यामोहोळ ’च्या लेखकाच्या या रसास्वादाची माधुरी काही औरच !



# गोवा साहित्य संमेलन



## अेक रसास्वाद

डॉ. रंगनाथ देशपांडे

आम्हा डॉक्टरमंडळींना व्यवसाय सोडून आठदहा दिवस बाहेरगावी जाणे फार अवघड जाते. पण यंदा मी साहित्य संमेलनासाठी मडगाव गोव्याला जाण्याचे निश्चित केले होते. बिगर साहित्यिकांनी उगाच संमेलनास भाऊगर्दी करू नये ही दवंडी मला लागू नव्हती, मान्य नव्हती. यंदाच्या मडगाव सम्मेलनाचे स्वरूप पुष्कळसे वैशिष्टयपूर्ण आणि आगळे होते. भव्य होते, प्रचंड होते आणि तितकेच नाजूकही होते.

‘साहित्याचे व्यासपीठ हा राजकारणाचा आखाडा होऊ नये ’ या विधानाला माझी बिलकूल हरकत नाही. पण राजकारणाचा बुद्धिबळी खेळ खेळणारे धूर्त पुढारी जर जरासंधाच्या हाडापासून शकुनीमामांनी तयार केलेल्या फाशांनी दान टाकू लागले तर त्या फाशांना उलथे पालथे करण्याची भीमताकत जर कुणात असेल, त्यांना कानपिचक्या देण्याची शहामत कुणाची असेल तर ती फक्त साहित्यिकांची आणि साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठाचीच असू शकते असे माझे स्पष्ट मत आहे. जीवनातून राजकारण आता तरी बाजूला काढता येणार नाही. आणि वाङमय हे तर विविध समस्यांचे व्याकरण आणि अन्वयार्थ (भावदर्शी आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून) लावण्याचे एकमेव साधन आहे.

### जागा मिळेल का हो ...?

दिनांक ६ मे १९६४ ला संध्याकाळी सात वाजता राजकवी यशवंत टॅक्सी घेऊन माझ्याकडे आले. आमची फर्स्टक्लासची तिकिटे रिझर्व केलेली होती त्यामुळे आम्हांला कशाचीच काळजी नव्हती. पण स्टेशनमध्ये पाऊल टाकताच क्षणी तिथे Angry young men चे जे काही एकंदर दर्शन घडले त्यावरून आमच्या प्रवासातील आरामाच्या सर्व कल्पना एकदम ढासळल्या. दोन तीन हजारांच्या जनसमुदायातून रेटारेटी करीत कसातरी आम्ही आमचा डबा गाठला. कवी यशवंत यांची तब्येत हल्ली वरीसशी नादुरुस्त असते. प्रवासाचे एकंदर स्वरूप ध्यानात येताक्षणीच त्यांनी एकदम हाय घेतली आणि आल्या पावलीच परत जाण्याचा त्यांनी माझ्यामागे लकडा लावला. पुष्कळ अंशी त्यांचा हिशोब बरोबर होता; पण मी थोडासा जास्त दैववादी आशावादी असल्यामुळे त्यांना थोडावेळ कनात काढण्याची हुटकणी दिली. प्लॅटफॉर्मवरील रेल्वे अधिकाऱ्याला मी थोडयाश्या चढया सुरात आमच्या जागेची सोय करण्यास सांगितले. पण त्याने एकदम ‘ आपल्याकानी सातबाळ्या–खंडोबाच्या आरोळ्या ’ या आवेशात सपशेल शरणागती देऊन ‘ रेल्वेची व्यवस्था संपूर्णपणे ढासळली आहे. मी काहीही करू शकत नाहीं. आपण आपल्या इच्छेस येईल तसे करावे ’ अशी मोठ्या केविलवाणेपणाने मला समज दिली. मग मी आणि कविराज डब्यामध्ये शिरलो–नव्हे घुसलो. ट्रंका, होल्डॉल्स् आणि बऱ्याचशा नटून थटून आलेल्या स्त्रिया यांच्या अडसरानी वाट बंद झालेली होती. अंग चोरीत आणि औडक चौडक दामाडूच्या पद्धतीने मार्ग काटण्याचा आमचा प्रयत्न बराचसा यशस्वी होत असल्याचा दिसू लागला. सहा जणांच्या डब्यामध्ये एकंदर वीस माणसे होती.

**ही मंडळी थर्ड क्लासची ! गर्दी फर्स्टक्लासमध्ये !**



**जिथे काकासाहेब गप्प तिथे आम्ही काय बोलणार !**

काही उभी, काही आडवी, काही वाकडी तिकडी.

काकासाहेब गाडगीळ गंभीरपणाने एका कोपऱ्यात स्थानापन्न झाले होते. त्यांच्या पायथ्याला अनंतराव लिमये नेपोलियनच्या अभिनिवेशात चुना-तंबाकूची गोळी चढवून बसले होते. जज्ज गोडबोले दुसऱ्या एका कोपऱ्यात आपल्या नेहमीच्या न्यायालयीन पवित्र्यात संकुचितपणाने आणि सौजन्यशील दृष्टीने मुरून बसले होते. प्रो. शं. दा. पेंडसे याची हिरण्मयी स्थितप्रज्ञावस्था या कोलाहलात विशेष उठून दिसत होती. यशवंतराव आणि मी हातांत रंगाची बादली आणि कुंचला घेऊन घरास रंग देण्यास आलेला रंगारी मुकादम आणि त्याच्या हाताखालच्या गड्याप्रमाणे खालून वरपर्यंत सर्व डबा न्याहाळीत कुठेतरी कसे तरी चरफडत आणि आतल्या आत दातओठ चावीत उभे होतो. डब्यातील आम्ही साऱीजणे उच्च संस्कृतीने पछाडलेलो असल्यामुळे जागेसाठी कायदेशीरपणाने वर्दळीवर येणे शक्य नव्हते. त्यातून प्रसंग बराचसा स्त्रीवर्गाशी आणि म्हणूनच फार अवघड, नाजुक !

या साऱ्या स्त्रिया मुंबईच्या नोकरदारणी होत्या आणि त्यांचेजवळ तिसऱ्या वर्गाची तिकिटे होती. जिथे काकासाहेब गाडगीळ स्तब्ध होते तिथे आम्ही काय बोलणार ?

## पुढाऱ्याच्या मार्गातील दगड

इतक्यात आवई आली की, रेल्वे अधिकाऱ्याने संमेलनाकरता खास सोडल्या जाणाऱ्या गाड्या स्थगित केल्या आहेत. रेल्वे अधिकाऱ्यांच्या या बेजबाबदार वर्तनाचा जाब 'काकासाहेबां'ना विचारण्यासाठी आमच्या डब्यासमोर गर्दी उसळली. या वेळची या सुशिक्षित संमेलन प्रतिनिधींची वागणूक आणि तत्त्वज्ञान जितके अजब होते तितकेच पोरकट आणि गर्हणीय होते. वास्तविक काकासाहेबांनी रेल्वेच्या स्पेशल गाड्यांची सोय करण्याकरता गेल्या महिनाभर अत्यंत परिश्रम घेतलेले होते. मध्यवर्ती सरकारच्या रेल्वेमंत्र्याबरोबर वेळोवेळी पत्रव्यवहार, तारा करून त्यांच्याकडून निश्चित आश्वासनाची हमी मिळविली होती. तो सारा पत्रव्यवहार त्यांच्या खिशात होताच आणि ते आवर्जून प्रत्येकाला समजावून सांगत होते की या उदकझारीमध्ये कोणीतरी शुक्राचार्य दडून बसल्यामुळे उदकाची धार ऐनवेळी बंद पडली आहे.

हा शुक्राचार्य कोण याच्याशी कोणालाच यावेळी कर्तव्य नव्हते. दर्भाने डोळा फोडण्याची ती वेळ नव्हती. राजकारणाच्या जगातील तो एक किस्सा होता. तरीसुद्धा काकासाहेबांनी कलेक्टर, स्टेशन मास्तर, डी. एस्. पी. यांच्याशी विचारविनिमय करून ही कोंडी फोडण्याचा शेवटचा प्रयत्न केला, त्यात त्यांना यशहि आले. खास गाड्या सोडण्याचे जाहीर झाले.

काकासाहेबांची प्रकृती यावेळी बरीचशी नरम होती. अशा स्थितीत लोकांनी 'तुम्ही खाली उतरा आणि आमच्याबरोबर धावपळ करा' असा पोरकट हट्ट घेण्यात काय हशील होते ? अर्थातच काकांनी हा काळहट्ट पुरविला नाही. वयोमानाप्रमाणे ते त्यांना अशक्य होते. पण हे समजून घेण्याचा साधासुधा शिष्टाचार आणि सुसंस्कृतपणा दाखविण्याच्या मनःस्थितीत जनता नव्हती. इतकेच नव्हे तर काकासाहेबांच्या रोखाने दगडही आले. थोडक्यात निभावले ! एक दगड काकांच्या खांद्यावरून खाली घरंगळला... आणि काकासाहेबांनी हे असले 'दगड' किती तरी पचवले आहेत. त्यांनी या 'बिटनिक्स'-ना तशी जाणीवही दिली—त्यावर एका शहाण्याचे असे उत्तर आले की 'हा दगड काकासाहेबांनी आधीच खिशात घालून आणला होता !' माणूस किती क्षुद्र होऊ शकतो याची त्यावेळी मला कल्पना आली.

मी फार बेचैन झालो होतो. या असल्या प्रवासात मी डॉक्टर आहे हे विसरण्याची फार खबरदारी घेत असतो. पण यावेळी डॉक्टरी बॅग बरोबर घेण्याची अवदसा मला आठवली होती. तिचा इतक्या तावडतोब उपयोग करण्याची वेळ आलेली पाहून माझ्या काळजात धस्स झाले—पण परमेश्वराने खैर केली.

## पुरुषाच्या मार्गातील धोंड

वाटाघाटीनंतर स्पेशल गाड्या सुटण्याचे आश्वासन मिळाले. रुळावरून लोक बाजूला झाले—गाडी सुरू झाली. यशवंतरावांनी मोका साधून लटपटत्या पायांनी एकदम वर उड्डाण घेतले आणि जी काही डाव्या कुशीवर ताणून दिली—शं. दा. पेंडश्यांनी तोच मार्ग पत्करला. पेंडश्यांची बैठक आध्यात्मिक होती, यशवंतरावांची काव्यकारिणी होती तर काकासाहेबांची धीरगंभीर होती. गोडबोल्यांना आणि मला मुळी बैठकच नव्हती. आम्ही दोघे बसल्या जागेवर उरीपोटी पाय घेऊन (स्वतःचेच) निरनिराळी आसने करण्यात दंग झालो. स्वतःची कानशिले पकडून मी दोनतीन वेळा नमाजही पढलो. साष्टांग नमस्कार घालणे शक्य नव्हते. आसनांची ही उलथापालथ सहच होण्यासाठी मी गणपती—अथर्वशीर्षाची कितीतरी पारायणे केली.

संध्या, पुरुषसूक्त, वैश्वदेव, यांची चुकतमाकत उजळणी केली. शेवटी ठेवयात त्रिसुपर्ण सुद्धा म्हटल. रामनामाचा जप उगाळला, पण म्हणावा असा कशाचाच उपयोग झाला नाही. पावलातून वांब निघू लागले. पोटऱ्यांत, मांडीत आणि कमरेत पेटक्यांनी घुमरू उठवला. हवेतच मंडूक पद्धतीने पाय मारू लागलो. डब्याच्या मधल्या पटांगणात स्त्रीवर्गाच्या चिपा एकमेकांच्या अटीने, काटकोन, त्रिकोन, चौकोन आणि वेटोळी घालून पण मोठ्या आरामात आटुरूपणाने पहुडल्या होत्या—खाली पाय टेकण्याची सोय नव्हती. फट् म्हणता विनयभंग व्हायचा. हवेमधे पायवाऱ्याच्या फेकी साधण्यात मला जज्ज गोडबोल्यांनी मोठ्या आपुलकीने मदत केली. विधायक दृष्टिकोनातून जमते, जुळते आणि नमते घेण्यात नानासाहेब गोडबोल्यांचे कौशल्य प्रशंसनीय आहे.

वसल्या जाग्यावरून डब्लू. सी गाठणे हे एक फार मोठे दिव्य होते. ‘स्त्री ही पुरुषाच्या मार्गातील धोंड आहे’ यावर सुमारे तीस वर्षापूर्वी अति उच्च तात्त्विक आणि सात्त्विक पातळीवरून पुण्याच्या फडावर साहित्यिक स्वरूपाचा एक परिसंवाद घेतला गेला होता, त्या परिसंवादाची फलश्रुती काय झाली होती हे आता मला आठवत नाही, पण आज मात्र डब्यातील इतस्ततः फेकल्या गलेल्या आम्हा विद्वानाचे तथाकथित परिसंवादांबाबत एकदम अस्तिपक्षी मत झाले.

## रमी, रमणी आणि रसिक

प्रवासाचा दुसरा दिवस मजेत गेला. धान्याचे पोते हसडतात तद्वत डब्यातील आम्ही सारीजणे हलके हलके हसडलो गेलो होतो. दुपारचा रमीचा डाव तर फारच रंगला. मिसेस गोडबोल्यांनी मुंबईच्या स्त्रियांना चांगलेच लुबाडले. त्या मुलींना पुणेकरांकडून अशाप्रकारे लुबाडून घेण्यात आनंदच वाटला. त्यांच्यातील एक पुरंध्री मात्र सारखी धुसफुसत होती. धुसपुसण्याचे कारण असे सापडले की,या साऱ्या मुली थर्डक्लासच्या तिकिटाने फर्स्टक्लासचा प्रवास करीत होत्या आणि वर भाव खात होत्या. डब्यातील आम्ही वतनदार मंडळी त्यांच्याशी खेळीमेळीने वागत होतो. आणि ती बिचारी मात्र सांदीला पडली होती !

लोंढ्याच्या पुढचा प्रवास म्हणजे तर चर्मचक्षूंना अक्षरशः मेजवानी. निसर्गाची सर्व प्रकारची रूपे पहावयास मिळावी. रांगडे स्वरूप, नागरी स्वरूप, स्वर्गीय स्वरूप—त्यातील भव्यता, रौद्रता, भयानकता, उदात्तता, अतीव रमणीयता सारी सारी स्वरूपे एकमेकांच्या हातात हात घालून आमच्या भोवती, देहभान विसरून टिपरीचा गोफ विणीत होती. हिरव्या रंगाच्या निरनिराळ्या छटा असलेले शालू, पैठण्या, सोनेरी बुट्टयाचे आणि रुपेरी कलाबतूचे भरतकाम, विणकाम केलेल्या —परिधान करून या निसर्गसुंदरी अंगप्रत्यंगाने आमच्या भोवती फेर धरीत आहेत. बेहोशीने गर्बा नाचत आहेत, की आम्हीच त्यांच्या-भोवती भोवंडून भलरी घालीत आहोत, गिरक्या घेत आहोत, याचा आम्हांला क्षणाक्षणाला संभ्रम पडत होता—दूधसागर धबधब्याने तर कमाल केली, धमाल उडविली. त्याने चक्क आमच्याशी आटयापाटयाचा डाव मांडला होता—आणि आटयापाटयातच त्याने आपली खोखोची खुमखुमी जिरवून घेतली. त्याला दृष्टिपथात पकडण्यासाठी आम्हीसुद्धा आमच्या डब्यात देहभान विसरून आटयापाटयाचा खेळू लागलो. खिडकीपासल्या गड्यांना खो देऊ लागलो. दूधसागरची निरनिराळ्या ठिकाणाहून. निरनिराळ्या कोनातून दिसणारी लहान-



...... फट् म्हणता विनयभंग व्हायचा !

मोठी, तरणीताठी, देखणी आणि कलंदर दृश्ये पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले—आम्ही रात्रीची तडफड विसरलो, लोंढा स्टेशनवर एका खानावळवाने आमच्या उडविलेल्या फज्जाला विसरलो. हवेतला उकाडा निस्तरलो—सारा शिणवटा लय पावला. मी तर कल्पनासृष्टीत केव्हाच प्रवेश केला होता.

दुग्धधवलवस्त्र परिधान करून स्वर्गातून खाली पृथ्वीतलावर झेप घेत असलेल्या एखाद्या देवांगनेप्रमाणे भासणाऱ्या त्या धबधब्याखाली मी जाऊन उभा राहिलो होतो.—

## सम्मेलनाचे महाद्वारातून

दहा हजार प्रतिधिनींनी सभामंडप फुलून गेला होता. मंडप कसला. स्वर्गीय इंद्रसभाच होती. ती. पुण्याच्या गोखले कॉन्ट्रक्टरनी या मयसभेची फारच आकर्षक मांडणी केली होती. मंडपाच्या महाद्वारावरील सजावटीत सांगलीच्या कलामंडळाने आपली सारी रसिकता ओतली होती. प्रसंगाला अनुरूप आणि उचित असे निसर्गाचे नयनरम्य देखावे, आणि निरनिराळ्या सुप्रसिद्ध व्यक्तींची चित्रे मोठ्या आकर्षक पद्धतीनें लावून ठेवली होती. शेक्सपिअरचे छायाचित्र लावण्यात जितके अवधान राखले होते, तितकीच निरनिराळ्या नमुन्यांची सौंदर्यदर्शने घडविणारी रंगचित्रे लावण्यात औचित्य साधले होते. हा सारा सौंदर्यपट म्हणजे रसिकांच्या सौंदर्यशोधाला एक प्रकारचे आव्हानच होते. मंडपाच्या या महाद्वाराला ‘हरी नारायण आपटे महाद्वार’ असे सार्थ नाव दिलेले होते. व्यासपीठाच्या खाली नवलपुष्पांच्या पाकळ्या अशा काही कलात्मक आणि भव्य स्वरूपात चित्रित केल्या होत्या की, पहाणाराला जणू वाटावे, हे व्यासपीठ नसून शेषशायी भगवानाच्या नाभिस्थानातून वर उमटलेली ब्रह्मयाची एक बैठकच आहे. मंडपातील खुर्च्यांची मांडणीही अशा काही चतुराईने केली होती की'

आमच्या पुणेकर भगिनीही मदतीसाठी पुढे सरसावल्या.




गोव्यात मराठी पाणी !

प्रत्येकाला व्यासपीठ सहज दिसावे. ठिकठिकाणी गार पाण्याचे रांजण, टिपे आणि भांडी व्यवस्थितपणे मांडून ठेविली होती. १४।१५ वर्षांच्या स्वयंसेविका हास्योत्फुल्ल वदनाने खूण करताक्षणीच पाण्याचे प्याले आणून देत असत, त्यावेळी मन अतिशय आदरयुक्त आनंदाने उचंबळून येई. सकाळी तीन चार तास आणि दुपारी पाचसहा तास असा तीनही दिवस भरगच्च कार्यक्रम चालत असे, पण ते कोणालाही यत्किंचित् कंटाळवाणे झाले नाही. गेली पंधरा-वीस संमेलने मी पाहिली. अनुभव असा की, वक्त्यांची भाषणे सुरू झाल्यानंतर थोड्याच वेळात मंडप निम्मा-अर्धा मोकळा व्हावयाचा पण मडगावला मात्र तीनही दिवस कार्यक्रमांच्या शेवटच्या क्षणापर्यंत एकाही माणसाने आपली जागा सोडलेली नव्हती.

मंडपाच्या डाव्या बाजूला भोजनाची व्यवस्था होती. तीस भोजनगृहे; आणि प्रत्येक भोजनगृहात अदमासे ऐंशी-पंचाऐंशी माणसांच्या भोजनाची व्यवस्था. स्वच्छता, टापटीप आणि वाढण्याची ठेप अतिशय तत्परतेने केलेली होती, वाखाणण्यासारखीच होती. स्वयंसेवकांच्या वागण्यात आतिथ्यशील अनुनय, आणि विनयशील नम्रता पावलोपावली अनुभवास येत होती. पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या सुविद्य पत्नी सुधाताई या तर माहेरपणासच आलेल्या. त्यांनी कंबर बांधून मंडळीना आग्रहाने वाढप केले, याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच. आमच्या पुणेकर भगिनीही त्यांच्या मदतीला पुढे सरसावल्या होत्या. गोवा हा महाराष्ट्राचाच एक अविभाज्य भाग आहे हे सिद्ध करण्यास याच्यासारखे दुसरे कोणते दृश्य असू शकेल ? जेवणातील पदार्थ खास कोकणी पद्धतीचे. आमसुलाचे सार [ कोकम कोला ]. सोल्याची कढी आणि अननस, फणस व कैरी यांचा अत्यंत मधुर असा रस्सा. ही कोकणी ठावातील वैशिष्टचे तीनही दिवस. आम्ही या अमृतपानाचे आकंठ सेवन करून तृप्त झालो. रोज आग्रहाने वाढल्या जाणाऱ्या लाडू-जिलब्यांची याच्यापुढे मातब्बरी वाटली नाही.

प्रतिनिधीनिवासाची रहाण्याची सोय निरनिराळ्या गावात निरनिराळ्या ठिकाणी मोठमोठ्या हवेल्यांतून तर केली होतीच, पण मंडपाच्या भोवती प्रतिनिधींना राहण्यासाठी जी काही अतिथिगृहे बांधली होती त्यांची व्यवस्था आणि टापटीप कटाक्षाने राखण्यात मडगावकरांनी फारच काळजी घेतली होती. रुचकर पाण्याचा पुरवठा चोवीस तास अखंडपणे चालू असलेला पाहून, पानशेतच्या पुराने जर्जर झालेले आम्ही पुणेकर आनंदाने भांबावून गेलो होतो.

मंडपाच्या उजव्या बाजूला निरनिराळे बुक-स्टॉल्स्, हॉटेल्स, चहापानगृहे, फळाफुलांची दुकाने व्यवस्थित रीतीने मांडलेली होती. सभेचे काम चालू असताना मधूनच उठून या हॉटेल्समधील खाद्यपेयांचा समाचार घेण्यात काही एक आगळाच आनंद होता.

व्यवस्थापकांनी सबंध गोवा-प्रांत हिंडण्यासाठी निरनिराळ्या ट्रिप्स आखलेल्या होत्या. त्याकरिता ऐपआरामी बसेसची खास सोय केलेली होती. त्याशिवाय छोटयाशा टॅक्सीगाड्याही मुबलक होत्या. बारा तेरा रुपयात गोमंतकातील देवादिकांची सर्व मंदिरे [ मंगेश, शांतादुर्गा, म्हारडोळची म्हाळसा, रामनाथ, तसेच पणजीच्या परिसरातील सेंट झेवियर इ. ख्रिस्तांची चर्चेस ] पाहून येता येत होती. जेथे सबंध गोमांतक भूमी नयनमनोहर आणि अतिशय रम्य निसर्गाने नटलेली, तेथे ठिकठिकाणचे सृष्टिसौंदर्य कोठवर वर्णन करावे ? तरीपण प्रत्येक ठिकाणच्या निसर्गसौंदर्याचा घाटताठ आणि थाटमाट काहीशा वेगळेपणाने आणि आगळ्या डौलाने खुलून दिसत होता. विशेषतः म्हारडोळच्या मंदिराच्या परिसरातील वृक्षवेली समूहाने आणि निरनिराळ्या प्रकारच्या फलपुष्पसंभाराने लवथवलेली पाहून आम्ही तर अक्षरशः देहभान विसरून गेलो होतो. विसाव्यासाठी आम्ही बसलो होतो त्या बागेत लेकुरवाळ्या केळींनी आपला नेटका संसार उभारला होता. सुपारीच्या सरळसोट वृक्षांनी तो तोलून धरला होता, नारळीने पेलून धरला होता, सूचिपर्णांनी सांधला होता आणि या सर्वांच्या भोवती आम्रवृक्षांनी एक प्रकारचे संरक्षणात्मक कडे धरलेले होते. या ठिकाणांहून आम्हांला उठावेसेच वाटेना. येथे आम्ही पोटभर अननस खाल्ले, फणसाच्या गऱ्यांनी मुखशुद्धी केली, आणि शेवटी अमृतसलिलाचे आकंठ पान केले.

या सर्व मंदिराच्या विस्तीर्ण आवारामध्ये असलेली स्वच्छता, टापटीप, रमणीयता अत्यंत विलोभनीय होती. गाभाऱ्यामधील निरनिराळ्या आकाराच्या लहानमोठ्या समयांच्या दीप्तिप्रकाशामध्ये या देवमूर्ती विलक्षण प्रभावितपणें भाविकांचे मन आकर्षून घेत होत्या, त्यांना प्रक्षाळीत होत्या. रामनाथाच्या देवालयात नाटच-गृहाची मांडणी

साधलेली होती. नाटके, ललिते, दशावतार ही सारी मंदिरातच करण्याची आपली प्रथा पूर्वापार नाही का ? सेंट झेवियरचे प्रार्थनामंदिर तर प्रत्यक्ष संतांच्या वास्तव्याने पुनीत झालेले. तेथे रमणीयता, भव्यता आणि कलात्मकता यांच्या प्रचीतीबरोबरच जीवनातील आध्यात्मिकतेचा, उदात्ततेचा, भव्यतेचा साक्षात्कार होत होता. गोव्यातील या मंदिरांचे एक वैशिष्टच मला जाणवले ते हे की आपल्या महाराष्ट्रीय मंदिरांतून जे एक प्रकारचे औदासीन्य आणि भकासपणा ठायी ठायी अनुभवास येतो त्याचा येथे पूर्णांशाने अभाव होता.

## माधुर्यी मधुरता शृंगारी सुरेखता

निसर्ग आणि माणूस यांमध्ये येथे सौंदर्याची तर नुसती चढाओढ लागून राहिली होती. ही दोन्ही रूपे एकमेकाला पूरक अशीच आहेत. साधारणपणे मी सारे जग हिंडून आलेलो आहे. ठिकठिकाणची सौंदर्यस्थळे आणि सौंदर्यकुळे जवळून न्याहाळलेली आहेत. पण गोमंतकमधील स्त्री-सौंदर्याचा साक्षात्कार आगळाच आहे. बाल्य, तारुण्य, प्रौढता आणि वृद्धत्व या सर्व अवस्थांतून सौंदर्य ओसंडून वाहात असलेले प्रत्ययास आले. धारदार नाक, डाळिंबाच्या दाण्यांसारखी दंतपंक्ती, हरिणशावकासारखे टकटकीत डोळे, वेशभूषा, कमनीय कंबूकंठ, लांबसडक आणि भरघोस केशभूषा आणि सोज्वळ. आणि या सर्वांवर आवरणात्मक असलेला केशरमिश्रित केतकी वर्ण यांनी नटलेल्या येथील स्त्रीसौंदर्याला पाहताक्षणी आदराने अंतःकरण उचंबळून येते आणि त्याला मानाचा मुजरा देण्यासाठी मान खाली झुकते. या स्त्री-सौंदर्यामध्ये मांगल्याचा, शुचितेचा आणि अपरंपार चैतन्याचा साक्षात्कार सहीसही होतो. गोमंतकातील या स्त्री-सौंदर्याची मुळात बैठकच भक्तिभावाने परिप्लुत झालेली असून त्यातील ऋजुतेची मुळे त्यागवादी स्वरूपाची आहेत. मधु-मधुर भाविकतेच्या विलेपनाने त्यातील सौंदर्याचा साक्षात्कार प्राप्त होत असताना, माणसाचे मन ब्रह्मानंदाच्या पातळीपर्यंत जाऊन पोहोचते. पुरुषवर्गाला मात्र सौंदर्याची ही देणगी देताना परमेश्वराने बराचसा चेंगटपणा केलेला आहे. या उलट, काश्मिरातील स्त्री-सौंदर्यावर एकतन्हेचे दैन्यावस्थेचे मळभ पसरलेले असल्यामुळे त्याच्यावर भोगवादाचा भडक कुंचला फिरविल्याशिवाय त्याच्या आत दडलेला मांगल्याचा साक्षात्कार प्रतीत होत नाही. मला तर तेथील स्त्रियांच्यापेक्षा पुरुषच जास्त सौंदर्यवान् असल्याचे अनुभवास आले.

प्राध्यापक व. दि. कुलकर्णी व त्यांच्या सुविद्य पत्नी आणि कवी यशवंत या रसिक जनांच्या संगतीत मी ही सारी सौंदर्यस्थळे संमेलन सुरू होण्यापूर्वीच्या हिंडून आलो. अतीव आनंदाने भारावलेल्या मनःस्थितीत कवी कुसुमाग्रजांच्या सारथ्याने आणि काकासाहेब गाडगीळ, दत्तोपंत पोतदार यांच्या वेत्रवल्लीच्या इशाऱ्याने दौडत चाललेल्या या साहित्य-संमेलनाच्या रथामध्ये बसून तीन दिवस दौडत राहण्यामध्ये किती आनंद साठविलेला होता याची कल्पना संमेलनाला न येणाऱ्या हतभाग्यांना वर्णन करून सांगणे केवळ माझ्या शक्तीबाहेरचे आहे. कुसुमाग्रजांची स्वप्नाळू जगातील ताठर वृत्ती, क्रांतिवादी भूमिकेवरून आजपर्यंत त्यांनी केलेली काव्यरसाची सेवा आणि तपश्चर्या, त्यांचा अस्सल कलावादी आणि त्रिगुणात्मकतेने नटलेला मानवी ( मानुषी ) पिंड, याची तडाखेबंद प्रचीती या निमित्ताने महाराष्ट्रीय जनतेच्या प्रत्ययास आली. त्यांच्या काव्यमय प्रति-

मी जिंकलो ! मी जिंकलो !



अध्यक्षांनी उठलेली राळ अशी दाबली !

भेचे निरनिराळे पैलू आणि अलंकार सामान्य जनतेला आजपर्यंत सुप्तावस्थेतच दडून राहिलेले होते. गोमंतकीयांनी या संमेलनाच्या निमित्ताने हे अचूकपणे हेरले आणि त्यांचा उदंड सत्कार करून आपली रसात्मक गुणग्राहकता जगाच्या निदर्शनास आणून दिली याबद्दल आपण महाराष्ट्रीयांनी त्यांचे सदैव ऋणीच राहिले पाहिजे. परंपरा मोडून त्यांनी केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात केवळ काव्यप्रपंचाचा मर्यादित ऊहापोह न करता एका विशाल हृदयाच्या आणि मानवतावादी कलावंताची भूमिका घेऊन काही गोवेकरांच्या जीवनाचे रणांगण केलेल्या समस्यांचे, धीरगंभीरपणाने आणि अत्यंत तळमळीने विचार मांडले ते खरोखरी त्यांच्या गाढ प्रज्ञेचे आणि अस्सल कलावादी पिंडाचे द्योतक होय. त्यांनी जीवनाकडे आणि वास्तवतेकडे पाहण्याची अस्सल कलावंताची भूमिका काय असेल किंवा कशी असावी, तिला निरनिराळे कितीतरी दृष्टिकोन असू शकतात याबद्दल जे भाष्य केले ते तर फारच मार्मिक होते.

## स्वयंवर मोडले !

अश्लील वाङ्मय–विरोधकांनी गेले वर्षभर जी एक प्रचंड फळी उभारून एक अतिशय निकडीचे समाजकार्य चालू ठेवले त्याची बैठक किती अज्ञानमूलक आहे याची त्यांनी मोठ्या सहृदयतेने पण अत्यंत स्पष्टपणाने जी छेड घेतली ती पूर्णांशाने आव्हानात्मक आणि निःसंशय निर्णयात्मक होती. अश्लीलता–निवारक कमिटीचा तीव्र निषेध करण्याच्या इराद्याने मुंबईहून प्रा. माधव मनोहर ग. वा. बेहेऱ्यांच्या नूपुरनिनादात आणि डोकीत सब्बाहात तुरा खोवून वाजत गाजत आले होते, तर उलटपक्षी प्रा. क्षीरसागर आणि न्यायमूर्ती गोडबोले सदरहू कमिटीचे अभिनंदन करून घेण्याच्या ईर्षेने आपल्या भालदार चोपदारांसमवेत डेरेदाखल झाले होते. पण अध्यक्षीय भाषणाचा अन्वयार्थ असंदिग्धपणे लागल्यानंतर कोणत्या पक्षाचे पितळ उघडे पडणार हे स्पष्टपणे दिसून आले. डी. के. बेडेकरांसारख्या मातब्बर आणि समतोल बुद्धीने विचार करणाऱ्या विद्वानांना या वादातील धाणेरडी

## गोवा साहित्य-संमेलन

# मते आणि मतभेद

### नाटक : मत्स्यगंधा

प्रा. वसंत कानेटकराचे ' सगीत मत्स्यगंधा ' हे नवे नाटक या संमेलनानिमित्ताने सादर करण्यात आले. या नाटकाबद्दल अनेक अपेक्षा होत्या पण या अपेक्षेच्या गळाला एकही समाधानाचा मासा लागला नाही. या नाटकात नवीन काहीच नव्हते. भीष्माची भाषणबाजी मात्र भरपूर होती. कुणाचाही अभिनय श्रेष्ठ नव्हता की दिग्दर्शक जाणवत नव्हता. नाही म्हणायला नेपथ्य मात्र उत्कृष्ट होते. मत्स्यगधा, पराशर, भीष्म आणि अबा यासवबीचे महाभारतातील कथानक विस्कळित स्वरूपात सादर केले गेले. आणि सगीताने तर वैताग यावा इतकी दिंड्या व साक्याची भरपूर प्रमाणात त्यात पेरणी केली होती.

### परिसंवाद

**नाट्य** : शेक्सपिअरच्या चतुर्थ शतसावत्सरिक महोत्सवानिमित्त मराठी नाटकाचा विकास व प्रगतीची दिशा या विषयावर परिसंवाद झाला.अध्यक्ष म्हणून जाहीर झालेले आचार्य अत्रे न आल्यामुळे प्रा. अनंत काणेकरानी ती सूत्रे हाती घेतली. या परिसवादात गगाधर गाडगीळ, माधव मनोहर, ज्ञानेश्वर नाडकर्णी व भीमराव कुलकर्णी यानी भाग घेतला. मराठी नाटक अजूनही परकीय नाटककाराचा हात धरून चालत आहे असाच सूर त्यातील बहुतेकाचा होता. मराठी नाटकाचा नाटकपणा सगीताच्या अतिरेकाने घालविला असा एक विचार ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी मांडला आणि अभिजात नाटककार जन्माला आले पाहिजेत व शेक्सपिअरसारख्याची रूपातरेच आज मराठी रगभूमीवर हवी आहेत असे सागितले. प्रा० काणेकरानी यावर, ' यापुढे मराठी आईबापाना अभिजात नाटककार जन्माला घालण्याची नोटीस द्यावी लागेल ' असे म्हटले आणि हशा पिकवला. सगीताने नाटक मेले या नाडकर्ण्यांच्या आक्षेपाला कुसुमाग्रजानी आपल्या समारोपाच्या भाषणात थोडेसे उत्तर दिले व सगीत हे मराठी नाटकाचे एक अभिमानास्पद वैशिष्ट्य आहे व ते तसेच टिकले पाहिजे असे सागितले. या परिसवादात मराठी नाटकावर चर्चा अशी फारशी झालीच नाही आणि त्यामुळे तो ऐकून जाणाराना आपला वेळ सत्कारणी लागला असे वाटले नाही.

**कादंबरी** : दुसरा परिसवाद ' मराठी कादबरीची वाटचाल ' हा होता. वा. ल. कुलकर्णी यांनी त्याचे सूत्रचालन केले. प्रा. रा. भि. जोशी यानी मराठी कादबरीचा विकास निश्चितपणे झाला याचे विवेचन करताना हरिभाऊंच्या कादबऱ्याचा मोठेपणा मान्य केला. पण त्याचबरोबर आगरकराच्या सुधारणावादाने भारावून गेलेल्या त्या काळच्या गरजा हरिभाऊनी आपल्या कादबऱ्यांतून भागविल्याने त्याच्या कादबऱ्या प्रचारी झाल्या असे म्हटले. त्यानतर वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर व त्यानंतरच्या विभावरी शिरूरकर व पेंडसे यानी गाठलेले मराठी कादबरीचे निरनिराळे टप्पे वर्णन करून हरिभाऊंनंतर मराठी कादबरी प्रचारातून बाहेर पडली व त्यामुळे तिचा निश्चित विकास झाला असे सागितले.

प्रा. व. दि. कुलकर्णी यानी विषयाच्या दृष्टीने कादबरीचा विकास झाला तरी अनुभवाची प्रामाणिकता, जीवनाचा रोखठोक अनुभव याचा तीत अभाव असल्याचे सागितले ! लघुकथा लिहिणारी प्रज्ञा आज कादबरी लिहीत आहे, जीवनाच्या विशाल जाणिवेच्या दृष्टीने ती लगडी आहे असा निष्कर्ष काढला.


## गोवा साहित्य संमेलन – एक रसास्वाद –– (पृष्ठ ३९ वरून चालू)

फडकी गोव्याच्या वेशीवर तरी न धुतली जावीत असे कळकळीने वाटू लागले. बेडेकरानी एक सबब रात्र सबधित व्यक्तीशी सदरहू वादावावत अतिशय उच्च आणि मूलग्राही पातळीवरून चर्चा करण्यात घालविली. बेडेकरांच्या या कष्टास अखेर यश आले. प्रा. माधव मनोहर यानी निषेधाचा ठराव परत घेतला. प्रा. क्षीरसागर मात्र या समझोत्यास तयार दिसले नाहीत. त्यानी एकंदरीतच आपले अग काढून घेऊन सवता सुभा स्थापन केला. सातारा समेलनातील या विषयाचा मूलभूत ठराव जमेस धरून पुढील कार्याबद्दल सर्व अधिकार अध्यक्षाना सूपूर्त करावेत आणि अशा रीतीने अप्रासगिक उरणारी राळ दाबून टाकून समेलनाचे गांभीर्य अढळ राखले जावे अशा अर्थाचा अध्यक्षानी स्वतःच ठराव माडला आणि मोठ्या चतुराईने या द्वंद्वावर पडदा टाकला. दोन्ही बाजूचे रथी महारथी आपल्या जागी खूष होऊन " स्वयवर मोडले आमचा जय झाला " असे म्हणत म्हणत मंडपातून बाहेर पडले. जय कोणाचा झाला हे काकासाहेबानी पूर्णपणे ओळखले होते. या वाग्युद्धांत खरे पाहू गेले असता दोन्हीही बाजूचा पराभव झालेला होता. खरा जय बेडेकराचा झाला होता. काकासाहेब हे फारच आशावादी ! त्याच्या नेहमीच्या चतुराईने त्यानी कोणत्याहि प्रकारचा आग्रह धरला नाही. " पहाता येईल पुढे " या वृत्तीने त्यांनी पड घेऊन अध्यक्षांचा जो बोज राखला, तो खरोखरीच प्रशसनीय होता–

### साहित्यिक आणि राजकारण

समेलनाचे एकदर स्वरूप राजकीयच होते. गोव्याचे अविलबेकरून महाराष्ट्रात विलीनीकरण, मराठी आणि कोंकणी भाषावाद

**प्रल्हाद वडेर**



प्रा. कृ. व. निकुंब यांनी 'मराठी कादंबरी विकसित झाली आहे, ती मानवी जीवनाचा शोध घेऊ लागली आहे, ती व्यापक आहे; मात्र ती आणखी समृद्ध झाली पाहिजे' असे प्रतिपादिले. श्री. मा. कुलकर्णी यांनी केलेली विधाने तर परस्परछेदक होती. त्यामुळे त्यांना नक्की काय म्हणावयाचे ते शेवटपर्यंत कळले नाहीं. श्री. नारायण देसाई यांनी मराठी कादंबरी मध्यमवर्गीय जाणीवेने पछाडलेली व जीवनाची एकच बाजू दाखविणारी आहे असा आरोप केला.

परिसंवादाचा समारोप करतांना प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणाले की हरिभाऊंनंतर त्यांच्या तोलाची कादंबरी निर्माण झाली तरी कादंबरीकार निर्माण झाला नाही. कादंबरीचा विकास फारसा झाला नसला तरी विस्तार निश्चित झाला आहे.

या दोन्हीही परिसंवादांत श्रोत्यांची संख्या नाटकाइतकी नसली तरी बरीच होती. या परिसंवादांनी रसिकांच्या अपेक्षा मात्र पुऱ्या केल्या असे वाटले नाही. कोणाही वक्त्याने काही नवा विचार मांडला नाही.

**काव्य आणि गायन**

कविसंमेलनाने संमेलनाचे उत्सवी स्वरूप पुन्हा एकदा जाणवून दिले. अध्यक्ष होते महाराष्ट्रकवि यशवंत. प्रथितयशांना दोन आणि नवोदितांना एक कविता म्हणण्याची अध्यक्षांनी परवानगी दिली होती. पण काहींनी आपल्या दीर्घ कविता आपल्या बासनातून काढल्या आणि रसिकांच्या सहनशक्तीचा अंत पाहिला. इतर कवी दोन कविता म्हणतात तर आपणही दोन म्हणणार असा काहींनी लोचट हट्ट धरला. मात्र नेहमीप्रमाणे हमखास रंग भरला तो सोपानदेव चौधरी, पाडगावकर, शरद मुठे व संजीवनी मराठे यांनी. बाकीचे कवी फिके पडले. असा हा काव्यरसाचा ओघ आवरता आवरेना. अखेर कंटाळून अध्यक्षांनी तो चार तासांनी बंद केला.

त्याच त्याच कविता म्हणणाऱ्या कवींना अशा कविता म्हणायला बंदी का करू नये आणि त्यांच्या कविता ( विशेषतः नव्या आणि स्थानिक कवींच्या) आधी सेन्सॉर का करू नयेत हे दोन विचार या सहनशक्तीचा अंत पाहणाऱ्या कविसंमेलनाने दिले. हीच त्याची फलश्रुती.

संमेलनाच्या उरलेल्या दोन रात्री कुमार गंधर्वांचे गायन व गोमंतकीय लोकगीताच्या व नृत्याच्या कार्यक्रमाने गांजल्या ( किंवा गाजल्याही ! ) सुरवातीला कुमारांनी कौशिक राग सव्वा तास गायला. नंतर मीराबाईचे एक भजन म्हणून त्यांनी मध्यंतर केले. कौशिक अजिबात रंगला नाही. पण मालवती व सोहनी भटियार मात्र बरेच रंगले. शेवटी आपण भावगीत गाणार आहोत हे त्यांनी जाहीर केले होते. त्याच्यासाठी रसिक ताटकळत होते. पण त्यांनी गायलेल्या राजा बढे यांच्या "प्रेम केले काय हा झाला गुन्हा" या भावगीताने पदरी पूर्ण निराशा घातली!

गोमंतकीय लोकगीते व लोकनृत्ये याविषयीच्याही अपेक्षा अशाच साफ कोसळल्या. • • •

आणि सीमाप्रांताची कटकटीची डोकेदुखी हे तीन मुख्य महत्त्वाचे ठराव प्रचंड बहुमताने पास झाले. या तीनही ठरावांत गोवेकरांच्या स्वातंत्र्योत्तर काळातील जीवनमरणाशी प्रत्यक्षपणे संबंध असलेले जळजळीत प्रश्न निगडित होते. निकराला आलेल्या या तीनही राजकीय प्रश्नांबाबत दिल्लीश्वर, म्हैसूरकर आणि महाराष्ट्रीय जनता यांच्या भूमिका काय आहेत, त्यांच्यामागे कुणाचा द्वेष कुणावर आहे हे सारे काही उघडउघड रीतीने बोलले जात होते. हा गोवेकरांच्या जीवनमरणाचा, संस्कृतीचा आणि महाराष्ट्रीय इभ्रतीचा प्रश्न अटीतटीला लागलेला आहे. अर्थातच मराठी साहित्य संमेलनाच्या या व्यासपीठावर याशिवाय दुसरे काय चर्चिले जाणार ? पूर्वीच्या संमेलनाचे दाखले काय आहेत ? संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळचे औरंगाबादचे संमेलन काय सांगते ? साहित्य-संमेलनात राजकीय स्वरूपाच्या चर्चा होऊ नयेत हे म्हणण्यास आता कसला अर्थ उरला आहे ? खबरदारी एवढीच घेतली जावी की हे प्रश्न सोडवीत असताना त्यांची बैठक साहित्यिक आणि भाषिक आहे की नाही याची वारंवार तपासणी होत रहावी.

संमेलनाच्या तीनही दिवसांच्या' सर्व कार्यक्रमांवर मुख्यत्वेकरून काकासाहेब गाडगीळांची छाया पसरलेली होती. काकासाहेबांनी आणि भीष्माचार्य दत्तोपंत पोतदार या दोघांनी हे संमेलन यशस्वी रीतीने गाजविले. संमेलन उधळून लावण्याचे कोकणीवाद्यांचे सारे प्रयत्न अयशस्वी झाले याचे सर्वस्वी श्रेय दयानंद बांदोडकर या देवमाणसाच्या जळजळीत व्यक्तिमत्त्वाला आणि उदंड लोकप्रियतेला आहे. कुसुमा-

या विलोभनीय स्मृती आमचे मनी
अखंड जागत राहतील !



गोव्यासाठी आम्ही वाटेल तो
त्याग करायला तयार आहोत !

## आणि हाही एक रसास्वाद !

ग्रजाच्या सौजन्याचा शरद केणी या एका विरोधी पक्षाच्या तरुणाने दुरुपयोग करून घेऊन बांदोडकरांवर व्यक्तिगत शितोडे उडविले. अर्थातच तावडतोब त्या तरुण माणसाची व्यासपीठावरून हकालपट्टी करण्यात आली. या वेळी सौ. मथाईद या विलीनवादी महाश्वेतेने अत्यंत मौलिक असे प्रसंगावधान दाखविले. एकाद्या विद्युल्लतेप्रमाणे तडाडकन पुढे जाऊन तिने सदरहू तरुणाचा हात पकडून त्यास बाजूला केले आणि दुसऱ्या हाताच्या पंजाने माईकचे तोंड झाकून टाकले ! हे दृश्य इतके नाटयपूर्ण होते की या प्रसंगी एखादा परदेशीय बहाद्दर वृत्तपत्रीय फोटोग्राफर म्हणून हजर असता तर त्याने सदरहू क्षण आपल्या कॅमेऱ्यांत अचूकपणे टिपून घेऊन अक्षरशः हजारो रुपये मिळविले असते ! आदल्या दिवसाचा नियोजित आणि यावेळचा प्रतिष्ठितपणे उडवलेला गोंधळ यामुळे न जाणो प्रेक्षकांची आणि श्रोत्यांची मने कदाचित वावरून जाण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे सभेच्या मोराल- (Morale) वर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे हे काकासाहेब गाडगीळांनी बरोबर हेरले. त्यांनी तत्काल पुढे होऊन अत्यंत प्रखरपणे सध्या सरकार राबवीत असलेल्या निरर्गल राजनीतीवर कोरडे ओढले आणि सभेचे ' मोराल ' उचलून धरले. यावद्दल काकासाहेबांचा गोवेकर आणि सारा महाराष्ट्र ऋणी राहतील. अध्यक्ष कुसुमाग्रजांना संमेलनपूर्तीची जी यशस्विता लाभली त्यामधील सिंहाचा वाटा काकासाहेबांचा आहे. ' मराठ्या 'चे विनायक भावे यांनी केलेल्या भाषणाने श्रोत्यांची अंतःकरणे भारावून गेली. त्यांनी प्रेक्षकांपुढे सही सही मार्क अॅन्टनी उभा केला. स्वागताध्यक्ष आणि उद्घाटक पाटसकर यांची भाषणे अत्यंत अभ्यासनियुक्त अशीच होती. सीमाप्रांतावरील ठरावाच्या वेळी बा. रं. सुंठणकर आणि शं. दा. पेंडसे या दोघांची भाषणे अत्यंत तेजस्वी आणि ओजस्वी झाली. नाटकावरील परिसंवाद मात्र विस्कळीत स्वरूपाचा झाला. कादंबरीवरील परिसंवाद वेळेच्या अभावी त्रुटित स्वरूपाचा झाला. बहुतेक सर्व वक्त्यांनी मराठी कादंबरीच्या विकासावरील सर्व टप्प्यांचे धावते समालोचन केले. मराठी कादंबरीतील सुप्तप्रवाह आणि त्यातील बदलत्या प्रेरणा यांचा प्रामुख्याने आणि विस्ताराने जसा खल व्हावयास पाहिजे होता तितका तो झाला नाही. चर्चेचा भर बहुतांशी तंत्रावरच होता. अगदी अलिकडे प्रसिद्ध झालेल्या पण फसलेल्या कादंबऱ्यांचा आढावा घेतला गेला. बहुतेक वक्त्यांचा निष्कर्ष असा होता की, या अलिकडील नवीन कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीची क्षितिजे, कक्षा, डायमेन्शन्स आणि विषयातील विविधता विस्तृत झालेली आहेत. त्यांचे स्वरूप प्रयोगशील आहे. या संदर्भात ' काळी रात्र, ' ' काळी घागर, ' ' रथचक्र, ' ' लिलीचे फूल, ' ' सावित्री ' आणि ' आग्यामोहोळ ' यांचा प्रामुख्याने उल्लेख केला गेला.

कवितासंमेलनाच्या मांगोळीवर तर शंभराच्या वर कवि लोक उभे ठाकले होते. या कविसंमेलनात सोपानदेवांच्या खड्या आवाजात म्हटलेल्या कवितांनी सर्वांची अंतःकरणे काबीज केली. सौ. पद्मा गोळे यांच्या काव्यरचनेत दिवसेंदिवस उत्कटतेची भर पडत असल्याचे प्रत्ययास आले; बाकीचा सारा बेंडबाजा आणि पिपाण्या !

रात्रीच्या करमणुकीच्या कार्यक्रमास मी जाऊ शकलो नाही. असे म्हणतात की, कुमार गंधर्वांच्या गायनात तितकासा रंग भरला नव्हता आणि कानिटकरांच्या ' मत्स्यगंधे 'नेहि " तितकेसे " कुणाला आकर्षून घेतले नाही.

गोवेकरांनी उत्स्फूर्तपणे जे काही आमचे राजेशाही आदरातिथ्य करून आमची अंतःकरणे जिंकली आणि हा अपूर्व सोहळा यशस्वी रीतीने पार पाडला या विलोभनीय स्मृती आमच्या मनामध्ये अखंडपणाने वावरत राहतील; यावद्दल आम्ही त्यांना मोठ्या आदराने आणि आनंदाने ग्वाही देऊन ठेवतो. आणि परमेश्वर त्यांच्या राजकीय आकांक्षा व ईप्सिते पूर्ण करो अशी इच्छा प्रदर्शित करतो. आम्ही त्यांच्याकरतां रक्त सांडलेले आहेच आणि वेळ आली तर पुन्हा वाटेल तो त्याग करण्यासाठी आम्ही सदैव तयार राहू असे त्यांना आश्वासन देतो.

● ● ●

समीक्षा

## वावटळीतील

# केळफूल....पारगावकरांची कथा...

" केळफूल " हा पारगावकराचा तिसरा कथासंग्रह पुन्हा पुन्हा गोंजारावेसे वाटणारे " लैंगिक जीवनातील सुखद असमाधान–" हा यातील बऱ्याच कथांचा स्थायीभाव ("काजळ", "विस्तार", "भिंत", 'बोथटलेली धार" "मधुगंध") काव्यात्मकतेने ओथंबलेली " मधुगंध " ही यातील सर्वात उजवी कथा होय. " बोथटलेली धार " मधील कारुण्याला त्यातील शृंगारिकतेमुळे बोथटपणा आला आहे. किंवा संयत भावुकताच त्यांना कदाचित त्यात अभिप्रेत असेल. बाल्य व शैशवातील निरागसता ' काजळ ' व ' विस्तार ' मध्ये पारगावकरानी अतिशय चांगली रंगविली आहे. " फाटक्या ओल्याचिंब लुगड्याला ओणव्यानं घसरे देताना–" तिच्या धनुष्याकृती शरीराला शंकरनं पहिल्या प्रथम आपल्या आधाशी नजरेची दोरी लावली होती. "( बिळखा )', झाडावर एखादा सरडा चढावा त्याप्रमाणे माझ्या सर्वांगावर काटा सरसरला " ( काळ लोंबे या घडी ) " कोणीतरी कोणाच्यातरी फाडकन थोबाडीत द्यावी आणि मार खाल्लेल्या व्यक्तीच्या कानात सुंई ऽऽ असा आवाज घुमत रहावा तसं स्वैपाकघरातील वातावरण झालं." (बिळखा) हे त्यांच्या लेखनातील उपमासौंदर्याचे सुंदर नमुने. ज्यांना अशा उपमा आवडत नाहीत त्यांना अन्यथा वाचनात अडचण ! " राजा " ही ह्या कथासंग्रहातील सुंदर व्यक्तिरेखा. कथेतील सारा " आशय " तिच्या शीर्षकातून व्यक्त करण्याचा अट्टाहास (" काळ लोंबे हचा घडी ") पारगावकर मध्येच व्यक्त करतात. कथासंग्राहाला जिचे नाव दिले आहे ती " केळफूल " ही कथा मात्र अगदीच सामान्य वाटते.

" वैशाखातील वावटळ " (की वादळ ? ) ही पारगावकरांची तिसरी कादंबरी.

" जानकी " ही या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा. ती ठसठशीत आणि सजीव करण्यात पारगावकरांनी बरेच यश संपादन केले आहे. विश्वनाथ, सिंधू, भाऊ, शांतावैनी व वामन ही अवतीभवती रेंगाळणारी आणखी काही महत्त्वाची पात्रे. कथेच्या दृष्टीने " जानकी " नंतर येणारे महत्त्वाचे पात्र म्हणजे वामनच होय. पण ' जानकी ' ही जरी कादंबरीची नायिका असली तरी " वामन "ला कादंबरीचा " नायक " म्हणता येणे कठीण आहे. पुरुषपात्रांत वाचकांच्या लक्षात राहणारे पात्र म्हणजे भाऊचे. आजारी माणसाच्या दुबळ्या अगतिकेतून निर्माण झालेला तामसीपणा जळजळीत शब्दातून पारगावकर साकार करतात आणि वाचकांच्या मनात तिरस्कार आणि सहानुभूती अशा दोन परस्परभावनांचे वलय उठते. निवेदनातील सरळपणा हा या कादंबरीचा विशेष गुण, त्यामुळे वाचकाला कुठेही अडखळल्यासारखे होत नाही. कादंबरी हातात घेतल्यावर तिच्या संथ प्रवाहाबरोबर वाचक अलगदपणे तरंगत जातो. शेवटच्या किंवा तिसऱ्या भागातील वामन व ' जानकी 'मधील हलकेफुलके संवाद रसिकतेने रंगविले आहेत. पापपुण्याची माफक प्रमाणात बेरीज-वजाबाकी करून जगणारा सिंधूचा ' व्यवहारी ' नवरा विश्वनाथ हे तिसरे महत्त्वाचे पुरुष–पात्र आणि सर्वात गुंतागुंतीचे देखील. त्याची प्रेमळ पण काहीशी लंपट व संधिसाधू वृत्ती हे त्याच्या स्वभावाचे वैशिष्टच.

विश्वनाथ व जानकी यांतील सुप्त व चोरटे प्रेम रंगविताना कलावंतास साजेलशा संयमाने त्यांनी ते रंगविले आहे. विश्वनाथविषयी वाटणारी ओढ व त्यामुळेच निर्माण झालेली भीती दाखविताना घेतलेला स्वप्नाचा आधारदेखील सांकेतिक असला तरी योग्य वाटतो.

कादंबरीतील संवाद, वातावरण, व निवेदन या गोष्टींबाबत पेंडशांची आठवण यावी. अर्थात् यामुळे कादंबरीला कसलेच वैगुण्य येत नाही.

**प्रभाकर**

---

**केळफूल**
लेखक : वि. शं. पारगांवकर
मूल्य तीन रुपये
ज्ञानराज प्रकाशन पुणें

**वैशाखातील वावटळ**
लेखक : वि. शं. पारगांवकर
मूल्य चार रुपये
इनामदार बंधू प्रकाशन, पुणे

**रागिणी**
लेखक : मनोहर लाटे
मूल्य चार रुपये
मंगल प्रकाशन

**काळा समुद्र**
लेखक : वामन इंगळे
मूल्य तीन रुपये
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

**स्वर्ग दोन बोटे**
लेखक : सुभाष भेंडे
मूल्य तीन रुपये
जे विनायक–प्रकाशन मुंबई

**पंडित नेहरू–जीवनप्रसंग**
लेखक : हरिश्चंद्र निपुणगे
रंजन परमार
मूल्य एक रुपया पन्नास न. पै.
पुष्पक प्रकाशन, पुणें

## ★ रागिणी

मनोहर लाटे यांचा हा पहिलाच कथा-संग्रह. या संग्रहात एकूण पंधरा कथा संकलित केल्या आहेत. गणिताच्या भाषेत बोलायचे झाले तर कथालेखक कथालेखनाच्या परीक्षेत पास होतो. कारण दिलासा देणाऱ्या पाच कथा यात आहेत. ' नायगरा ' ' रिबन, ' ' सीम, ' ' आणखी एक मुलगी प्रेमात पडली ' आणि ' ऐस कुठेही सुखी चिरंतन ! ' या कथा पकड घेणाऱ्या आहेत. साधीसुधी भाषा, ठसठशीत व्यक्तिचित्रे, आणि वाढत जाणारी रंगत ही या कथांची वैशिष्टये.

' रिबन ' ही या संग्रहातील चांगली कथा आहे. उत्कृष्ट कथानक, कारुण्याची छटा, सुखी शेवट या सर्वांचा परिणाम चांगलाच प्रभावी आहे. यातली व्यक्तिचित्रें दीर्घकाळ स्मरणात राहतील. रात्रभर जागून मुलीच्या फ्रॉकसाठी रिबन नसलेल्या टाईपरायटरवर अनेक कागद टाइप करणारा म्हातारा लेखक जॉर्ज मनाला चटका लावतो. अशा या काही कथा सोडल्या तर बाकीच्या कथा मामुली वाटतात. या कथांचे विषय इतके जुने आहेत की त्याचा केव्हाच चोथा झाला आहे.

आणखी एक गोष्ट खटकते ती ही की, या संग्रहातील चार कथा परदेशी वातावरणात का रंगवल्या आहेत ? की त्या अनुवादित आहेत ? जर तसे असेल तर मात्र......!

—प्रकाश साठे

## ★ काळा समुद्र

समलिंगी आकर्षणासारखा विषय या कादंबरीसाठी निवडलेला आहे. तात्यासाहेब पटवर्धन या लौकिक अर्थानं यशस्वी माणसाच्या अनैसर्गिक वासनेच्या काळचा समुद्रात गटांगळचा खाऊन मृत्यूच्या मार्गाला निघालेल्या कथानायकानं सांगितलेली ही हकिकत कृत्रिम आहे. कादंबरीला पूर्ण आशय नाही. मांडणीच्या दृष्टीनंही विस्कळित आहे. नायकानं आत्महत्या करण्याचं प्रयोजन कांहीच कळत नाही. एवढी शंभर पाने वाचून लेखकाला नेमकं काय सांगायचं आहे हे न कळवणारी ही कादंबरी आहे.


वास्तविक पहाता अशा वृत्तीच्या माणसावर फार चांगलं लिहितां आलं असतं आणि मराठी कादंबऱ्यांत एक वेगळी कादंबरी म्हणून या कादंबरीला मान मिळाला असता. ती संधी श्री. इंगळे यांनी गमावल्याची जाणीव करून देणारी ही कादंबरी आहे. एवढंच शेवटी मनात शिल्लक राहातं.

## ★ स्वर्ग दोन बोटे

तेरा विनोदी किस्से या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. बहुतेक कथातून कॉलेज जीवनातील आतापर्यंत अनेकांनी हाताळलेले तेच तेच विनोदी प्रसंग आढळतात. नाही म्हणावयास ' अंतू भटजी ' आणि ' पुरुषांचे महिला-मंडळ ' हे दोन लेख त्यांच्या वेगळेपणामुळे नजरेत भरतात. घटकाभर करमणुकीच्या दृष्टीने चाळावयास हरकत नाही असा हा विनोदी लेख व कथासंग्रह आहे. काही ठोकळ प्रसंगांतून विनोदी लेख तयार करण्याचा पायंडा मराठीत पडलेला आहे. हा लेखकही त्याला अपवाद दिसत नाही. एक गोष्ट मात्र खरी की समर्थपणे, डोळसपणे पाहून लिहायचं ठरवलं तर सुभाष भेंडे अधिक चांगलं लिहू शकतील असं वाटावयास लावणारा हा संग्रह आहे. —गजानन क्षीरसागर

## ★ पं. नेहरु—जीवनप्रसंग

साने गुरुजींच्या ' बापूजींच्या गोड गोष्टी ' किंवा मंगळवेढेकरांच्या ' विनोबाच्या कथा ' या पुस्तकांच्या धर्तीवर लिहिलेले श्री. निपुणगे व परमार यांचे हे पुस्तक. पंडित नेहरू व बालगोपाल यांचे संबंध जगप्रसिद्धच आहेत. विशेषतः मुलांसाठीच लिहिलेले हे त्यांच्या आवडत्या पुढाऱ्याच्या जीवनप्रसंगांचे पुस्तक त्यांना खासच आवडेल. कथानिवेदन साधे, सरळ आणि रंजक आहे. प्रत्येक कथाप्रसंगातून पंडितजींच्या ठिकाणी असलेला एकेक विशेष गुण हेतूपूर्वक चितारला आहे. नेहरूंची अनेक गुणचित्रे रेखाटण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. बालगोपाल त्यांचे उत्साहाने स्वागत करतील आणि म्हणतील " नेहरू चचा झिंदाबाद ! " —शीलभद्र




बाबा, हे येण्यापूर्वी तुम्ही म्हणत होता की, हे बोंडल्यानं दूध पितात.
मग चहासाठी कपाऐवजी बोडलं का नाही दिलेत त्यांना ?

# बायकांच्या नोकऱ्या आणि पुरुष

## जर्मनीतील एक संशोधन

आजकाल बऱ्याच तरुणांना आपल्या बायकोने नोकरी करावीशी वाटते, तर काही जण मुळी नोकरी करणारीच बायको निवडतात. हल्लीच्या महागाईच्या युगात जर स्वतःचे चोचले पुरवावयाचे असले तर त्यासाठी अधिक पाठबळ हे हवेच व ते बायकोने नोकरी केल्याने काहीश्या प्रमाणात साधतेही ! पण खरोखरच बायकांनी नोकरी करावी काय ? हा मात्र पूर्ण विचार करण्याजोगा प्रश्न आहे.

परंतु बायकांनी नोकरी करण्याच्या विचाराचे पक्के विरोधक कोण असतील तर ते रोजगारी कामगार हे होत असे नुकतेच जर्मनीत समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या पाहणीनुसार आढळून आले आहे. त्यामुळे सहाजिकपणेच बायकांनी नोकरी करणे मध्यमवर्गीयांना व कमी पगार मिळविणाऱ्यांना आवडते या कल्पनेला चांगलाच धक्का बसला आहे.

समाजातील अनेक थरांतील लोकांना प्रश्न विचारून समाजशास्त्रज्ञांनी वरील मत सारांशरूपाने काढले आहे. "तुझ्या नवऱ्याला तू नोकरी केलेली आवडते का ?" असा प्रश्न एका ३१ वर्षे वयाच्या केस कापण्याच्या दुकानातील बाईला विचारण्यात आला असता "त्याची याला काहीच हरकत नाही." असे तिने उत्तर दिले. पण दारातून आत येणाऱ्या तिच्या नवऱ्याचे कानी हे शब्द पडताच आपला त्याला विरोध आहे असे त्याने अगदी स्पष्टपणे सांगितले !

दुसऱ्या एका कामगाराला असाच प्रश्न विचारला असता तो म्हणाला, "मला तर बुवा बायकोने काम केलेले आवडत नाही. पण खर्चाची तोंडमिळवणी होत नाही म्हणून मनाविरुद्ध तिला कामास परवानगी द्यावी लागते." याउलट काही स्त्रियांनी असे सांगितले की, त्यांना मुळी घरी बसून घरकामे करण्यात चैनच वाटत नाही." सारांश काय तर बऱ्याचशा रोजगारीवर काम करणाऱ्यांचे, बायकोने नोकरी करू नये असे मत पडले. तथापि नाइलाजाने त्यांना बायकोला नोकरी करण्यास परवानगी द्यावी लागली आहे असे समाजशास्त्रज्ञ श्रीमती एलिझाबेथ डफेल यांना आढळून आले आहे.

त्यामानाने मध्यमवर्गीयांचे इतके कडवे मत नाही. बायकोने आपल्याच ऑफिसात काम केल्यास अगर नवऱ्याला त्याच्या धंद्यात मदत केल्यास त्यास मात्र या नवरोबांची काहीच अडचण नाही. हीच गोष्ट व्यवसाय करणाऱ्या लोकांची ! त्यांची पण बायकांना नोकरी करण्यास पूर्णपणे मुभा असल्याचे आढळून आले आहे.

### सुशिक्षितांची परवानगी

तथापि सर्वसाधारणपणे ज्या स्त्रियांनी मॅट्रिक वा कॉलेजचे शिक्षण केले आहे त्यांना नोकरी करण्यात वावगे काहीच वाटत नाही;



व त्यांचे सुशिक्षित नवरे पण त्यांना परवानगी देतात. मात्र ज्यांचे शिक्षण कमी आहे असे पुरुष नेहमीच बायकोने नोकरी करण्याच्या विरुद्ध आढळतात. पूर्वपार रूढी मोडण्याचे धैर्य त्यांच्यांत नसते.

त्या मानाने डॉक्टरकीसारख्या उच्च वातावरणात व व्यवसायात मात्र नवराबायकोची एकमेकांना मदत असते. दोघेही नवराबायको डॉक्टर असले तर ते एकमेकांना मदत करतात. एक डॉक्टरीण म्हणते की, मी घरात बसलेले माझ्या नवऱ्याला आवडत नाही, तर त्याचे दवाखान्यात त्याचेशेजारी बसले तर त्याला आनंद होतो.

आपल्या बायकोने नोकरी करणे म्हणजे आपली सांपत्तिक स्थिती चांगली नाही हे जाहीर करणे होय असे अनेकांना वाटते. त्यामुळे आपले सत्य स्वरूप समाजापुढे उघडे पडू नये म्हणून इच्छा असूनही ते आपल्या बायकोस नोकरीस परवानगी देत नाहीत. या उलट एखाद्या श्रीमंताच्या बायकोने नोकरी केल्यास तो मग आपल्या बायकोस नोकरी करावयास लावतो असे जनता म्हणत नाही. तसेच त्याच्या अधिकाराकडे पाहून सहाजिकपणेच त्याच्या बायकोला कमी काम करून पण जास्त पगार मिळतो. आणि मजुराच्या बायकोच्या बाबतीत मात्र उलट गोष्ट घडते.

### तरुणांना वाटणारी भीती

बायकांनी नोकरी करू नये असे म्हणणाऱ्या बऱ्याच जणांना असे वाटते की, नोकरी करताना बायकोचे इतर अनेकांशी संबंध येतील व त्यांच्या सांपत्तिक परिस्थितीशी ती आपल्या नवऱ्याची तुलना करू लागेल व परिणामांती तिला आपल्या नवऱ्याबद्दल कमीपणा वाटेल. क्वचितप्रसंगी ती वरिष्ठाच्या मागे लागण्याची शक्यतापण आहे. परंतु तरुणवर्ग ही भीती सहसा प्रगट करून दाखवत नसला तरी केवळ याच कारणास्तव बरेच तरुण बायकोला नोकरी करू देण्यास नाखूष असतात.

आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे नोकरी करणाऱ्या बायकोचे गृहकृत्यात फारसे लक्ष रहात नाही. त्यांच्या मुलांची आबाळ होते. मुलांचे चारित्र्य हे गृहजीवनातून निर्माण होत असते असे समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. परंतु नवराबायको दोघेही नोकरी करीत असल्यास मुलावर त्याचा परिणाम होतो. त्यांना आईचा सहवास व पाहिजे तसे शिक्षण लहानपणी मिळत नाही.

परंतु याउलट बायकोने नोकरी करण्याचे अनेक फायदेपण आहेत. नवऱ्याची सांपत्तिक स्थिती ठीक नसली तर तो आपल्या मुलांना शिकवू शकत नाही. मग मुलगा शेवटी हलक्या कामावर चिकटतो. मुलीसाठी तो जास्त हुंडा देऊ न शकल्याने त्याची मुलगी गरिबाघरी पडते. पण या उलट स्त्री पैसा कमवू लागली तर मुलाला शिक्षण मिळू शकते, मुलीची चांगल्या जोडीदाराशी गाठ घालू शकते. साहजिकपणेच त्यांची पुढची पिढी त्यांच्याहून हुशार व आर्थिकदृष्टचा चांगली होते.

—रमेश के. सहस्रबुद्धे

*सुप्याहून रतनलाल भंडारी लिहितात :*

" जूनच्या अंकापासून आपण रा. म. शास्त्री यांची शिररच्या पुस्तकावरील लेखमाला सुरू करून, एका चांगल्या जगप्रसिद्ध पुस्तकाची मराठी वाचकाला ओळख करून देण्याचा अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे. निव्वळ मराठीच नव्हे तर माझ्यासारख्या इंग्रजी थोडेफार जाणणाऱ्या, खेड्यात राहणाऱ्या व शिररचे उत्तम परंतु महागडे पुस्तक घेण्याची ताकत नसणारांची तृष्णा भागविली आहे."

*नगरहून भ. ग. पाठक लिहितात :*

" श्री. रा. म. शास्त्री यांचा "नाझी . . ." वरचा लेख एका दमात वाचला आणि संपला तेव्हा उगीचच चुटपुट वाटली आणि पुढील भाग आत्ताच दिला असता तर काय बिघडले असते, असे वाटले. तेव्हा पुढील अंकाची आतुरतेने वाट पहात आहे."




THE RISE AND FALL
OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRER
यांच्या पुस्तकावर आधारित प्रस्तुत लेखमालेचे
हे आमच्या वाचकांनी केलेले स्वागत !
प्रस्तुत लेखमालेचा हा दुसरा हप्ता . . .

**: १ :**

पराभूत जर्मनीच्या राज्यकर्त्यांनी देशातील जनतेची, असत्ये सांगून, जी फसवणूक केली, जो मूर्खपणा केला, भ्याडपणा केला, या सर्वांविरुद्ध आपण लढा उभारला आहे अशी हिटलरची भावना होती. या लढ्यातील पहिली साडेचार वर्षे हिटलरने जो अनुभव घेतला त्याचा इतिहास सांगण्यासाठी हिटलरने लॅन्ड्सबर्ग किल्ल्याच्या कोठडीत ग्रंथलेखनाला प्रारंभ केला. "माझा लढा" (Mein Kampf) या नावाने हे पुस्तक १९२५ मध्ये प्रथम प्रकाशित झाले. या वेळेस फक्त नऊ महिने कारावास भोगून हिटलर तुरुंगाबाहेर आलेला होता. १९२४ डिसेंबरमध्येच त्याची मुक्तता करण्यात आली होती.

१९२५ साली या पुस्तकाच्या फक्त ९४७३ प्रती खपल्या व जसजसा नाझीवादाचा भस्मासुर विराट रूप घेऊ लागला, तसतसा पुस्तकाचा खप वाढत वाढत १९३२ साली या पुस्तकाच्या ९०३५१ प्रती संपल्याची नोंद, या पुस्तकाच्या प्रकाशकाचे जे दप्तर हिटलरच्या पराभवानंतर दोस्तांच्या हाती पडले त्यात केलेली आढळली.

हे पुस्तक कुणाही मुत्सद्याने जरा लक्षपूर्वक वाचले असते तर कदाचित् जग युद्धाच्या खाईत ढकलले गेले नसते. परंतु हे पुस्तक कुणी फारसे गंभीरपणे वाचलेच नाही. म्हणून शिरर लिहितो...

" For whatever accusations can be made against Adolf Hitler, no one can accuse him of not putting down in writing exactly the kind of Germany, he intended to make, if he ever came to power and the kind of world he meant to create by Armed German Conquest. "

[ हिटलरच्या विरुद्ध इतर कसलेही आरोप करता आले, तरी दुटप्पीपणाचा आरोप त्याच्याविरुद्ध करता येणार नाही. जर आपण अधिकारावर आलो तर जो जर्मनी निर्माण करण्याचे हिटलरने ठरवले होते, त्याचे हुबेहुब चित्र त्याने या पुस्तकात रंगविले आहे. इतकेच नव्हे तर शस्त्राच्या बळावर हा जर्मनी, जगाची कशा प्रकारची रचना करू इच्छित आहे, हे देखील त्याने स्पष्ट केलेले आहे. ]

म्हणजे 'माझा लढा' हे पुस्तक नाझीवादाची आचारसंहिताच होती. असे असूनही कुणाही मुत्सद्याला त्याची दखल घ्यावीशी वाटली नाही.

### नाझीवादाची आचारसंहिता

या पुस्तकाचा धावता आढावा घेतल्याखेरीज नाझीवादाची पुढची वाटचाल समजणे कठीण जाईल. या पुस्तकात सर्वप्रथम त्याने जी एक गोष्ट स्पष्ट केली आहे, ती म्हणजे त्याला केवळ नव्या राष्ट्रवादाने भारलेला सुसंघटित वैभवसंपन्न जर्मनी नको होता, तर या जर्मनीत सर्व जर्मन वंशाच्या लोकांचे एकत्रीकरण हवे होते. याचा अर्थ जे जे भूभाग हे मूलतः जर्मनवंशीयांचे होते, ते ते या विशाल जर्मनीत सामील

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री



करण्यास तो कटिबद्ध झालेला होता. या नव्या जर्मन वंशाच्या शुद्धतेला अतिशय महत्त्व रहाणार होते. एकवेळ अन्नाची भेसळ परवडली, परंतु रक्ताची भेसळ 'राष्ट्र' मारते असा हिटलरचा सिद्धांत होता. म्हणूनच जे जर्मन वंशाचे नाहीत, जे जर्मन जीवनाशी एकरूप नाहीत ज्यांना जर्मन राष्ट्रवादाचे सोयरसुतक नाही, ज्यांना जर्मनीतील स्त्रिया या केवळ उपभोगाच्या बाहुल्या वाटतात अशा उपऱ्यांना, या जर्मनीत स्थान देण्यास हिटलरची तयारी नव्हती.

फ्रान्स हा जर्मनीचा हाडवैरी असून जर्मनीत नाझीवाद स्थिरावताच, या जन्मजात शत्रूचा कायमचा बंदोबस्त करण्याचा आपला मानस त्याने पुस्तकात स्पष्ट केलेला आहे. तो सांगतो :

" In the first place there must be a reckoning with France, the mortal enemy of the German people. "

फ्रान्सचा एकदा निकाल लावला की जर्मनांनी आपल्या वाढत्या शुद्ध रक्ताच्या वंशासाठी अधिक भूभाग मिळवला पाहिजे व हा भूभाग...पूर्वेकडूनच हिसकवणे भाग आहे, ही गोष्ट हिटलरने स्पष्टपणे नमूद केली आहे. तो सांगतो : Germany must expand in the East...largly at the expense of Russia." म्हणजे प्रथम पश्चिमेकडील फरान्सची चामडी लोळवून मग पूर्वेच्या बाजूच्या रशियाच्या साम्राज्याचा लचका तोडण्याचे कार्य आपण करणार आहोत याचाही इशारा हिटलरने १९२५ सालात दिलेला होता.



**ज्यांना जगावयाचे आहे, त्याना झगडा करावा लागेल !**

पूर्वेकडील कोणते प्रांत जर्मन वंशाचे आहेत, याचा तपशील हिटलरने दिलेला आहे. ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, सुडेटनलँड हा भाग, पोलंडचा डॅंझिग बंदर अंगभूत असलेला पश्चिम भाग . हे सर्व भूभाग जर्मन वंशाचे म्हणून आणि शुद्ध जर्मन वंश जगायला सर्वांत लायक असल्यामुळे रशियाची भूमी हिसकण्याचा–पराक्रमाच्या जोरावर हिसकण्याचा, त्यांचा अधिकार कुणी नाकारू शकत नाही म्हणून तो भागही जर्मनीला जोडण्याचा मनोदय त्याने आपल्या या पुस्तकात जाहीर केलेला आहे. असे असतानाही चॅन्सेलरपदावर येताच हिटलरने या सर्व गोष्टी प्रत्यक्षात उतरविण्यास सुरुवात करताच, गाफील युरोपखंडाला मोठा धक्का बसला.

हिटलरचे जीवनविषयक तत्त्वज्ञान फार सोपे होते. सिंह हा जसा पशूंचा स्वाभाविक राजा, त्याप्रमाणे जो वंश पुरुषसिंह असेल त्याने इतरांवर राज्य केले पाहिजे, असे त्याने सांगून ठेवले होते. ' जीवो जीवस्य जीवनम् ' हा न्याय त्याला एकदम मंजूर होता तो सांगतो :—

" Those who want to live, let them fight, and those who do not want to fight, in this world of eternal struggle, do not deserve to live. Even if this were hard that is how it is ! "

[ ज्यांना जगावयाचे आहे, त्यांना झगडा करावा लागेल. ज्यांची या अनादि संघर्षमय जगात झगडा करण्याची तयारी नसेल, त्यांची जगण्याची लायकीच नाही. हे सर्व भयंकर वाटेल, परंतु जग हे असेच आहे. ]

हिटलरच्या या लिहिण्यावरून त्याला, आपण जो ' बळी तो कान पिळी 'चा न्याय सांगत आहोत, तो काहीसा ऐकणाऱ्याला भयंकर वाटेल याची जाणीव होती असे दिसते. परंतु या जगाचे व्यवहार याच न्यायाने घडत असल्यामुळे, याच न्यायाने जर्मनीला जगावे लागेल, ही गोष्ट काहीशी अप्रियता सहन करूनही त्याने स्पष्टपणे मांडलेली आहे.

जगातले लढाऊ वंश कसे नष्ट होतात हे सांगताना तो सांगतो, की केवळ लढाया हरून असे वंश नाहीसे होत नाहीत पण जर त्यांच्या रक्तात भेसळ झाली की वंशाची शुद्धता जाऊन ती जमात निकालात निघते.

[ Men do not perish as a result of lost wars, but by the loss of that force of resistance which is continued in pure blood. ]

या संबंधात हिटलरने एक मार्मिक कोपरखळी मारलेली आहे. ' केवळ कुत्री, घोडी, आणि मांजरे यांच्याच वंशाच्या शुद्धतेची काळजी घेण्याचे सोडून जर्मन लोकांनी जर स्वतःच्याच वांशिक शुद्धतेकडे लक्ष दिले, तर जर्मनीचा भविष्यकाल उज्ज्वलच राहील.'

देशाला बहुमतानुवर्ती राज्यसत्ता ही नाशाकडे नेते, अशी त्याची समजूत होती. लोकशाहीत होणारा खेळखंडोबा त्याला विषासमान वाटत असे. राज्य हे एकाच कर्त्या माणसाने चालवावे, त्याला सल्ला देण्यासाठी इतर माणसे असावीत, परंतु सर्व निर्णय हे त्या कर्तृत्ववान पुरुषाचेच असले पाहिजेत, असे तो मानीत असे.

लँड्सबर्गच्या कारावासातून बाहेर पडणाऱ्या हिटलरला हे सर्व प्रत्यक्षात उतरवावयाचे होते. जो वंश राजकीय दृष्ट्या पूर्वी कधीच एकरूप झालेला नव्हता, त्याच्यात एकत्वाची भावना निर्माण करावयाची, त्याच्या वांशिक शुद्धतेची काळजी घ्यावयाची, म्हणजे हा जर्मन वंश सर्वांत बलवान होईल, आणि अशा बलवान वंशाचा जर्मन देश एकदा सिद्ध झाला, की त्याच्याकडे वाकड्या नजरेने पहाण्यास कुणाची माय व्यायली आहे ! याच वंशाकडे मग जगाचे जेतेपण चालत येणार. . . अशा सर्व मनोराज्यात हिटलर गर्क होता.

तिसऱ्या राईशचे साम्राज्य उभे करण्याचे स्वप्न हिटलर पहात होता. परंतु ही पहिली दोन गत साम्राज्ये कोणती ? पहिले राईश साम्राज्य म्हणजे सुप्रसिद्ध रोमन साम्राज्य होय व दुसरे, बिस्मार्कने १८७१ मध्ये फ्रान्सचा पराभव करून निर्माण केलेले प्रशियाचे साम्राज्य होय. या दोन्ही साम्राज्यांनी जर्मन वंशाला तेज आणले असे हिटलर म्हणत असे. व आता तिसरे साम्राज्य निर्माण करण्याकरता परमेश्वराने आपल्याला या देशात जन्म दिला आहे अशी त्याची ठाम समजूत होती.

हिटलरचे युद्धविषयक तत्त्वज्ञान आणि नीत्शेचे युद्धविषयक तत्त्वज्ञान यात अजिवात फरक नाही नीत्शेने लोकशाही व लोकसभा याच्यावर कठोर प्रहार केलेले आहेत. युद्धाची स्तुतिस्तोत्रे आणि सर्वश्रेष्ठ पुरुषाचे गुणगान, हा तर त्याच्या तत्त्वज्ञानाचा मुख्य कणाच होय. उदारतेपेक्षा युद्धाने आणि धैर्याने मोठया गोष्टी साध्य होतात असे नित्शे सागतो. [ War and courage have done more great things than charity. ]

### नित्शे आणि वॅगनर

नित्शेचे तत्त्वज्ञान कसेही असो, तो एक मोठा विचारवंत होता यात शका नाही. अशा या जर्मन वंशाच्या विचारवताबद्दल हिटलरला विलक्षण प्रेम वाटावे यातही नवल नाही. दोघाच्या मनाच्या तारा चागल्याच जुळल्या होत्या. ज्या दुसऱ्या एका व्यक्तीशी हिटलर एकरूप झाला होता ती म्हणजे सुप्रसिद्ध सगीतकार रिचर्ड वॅगनर ही होय. वॅगनर हा अत्यत ज्यूद्वेष्टा होता व लोकशाही रचनेवर त्याची मुळीच श्रद्धा नव्हती. परतु हिटलरला त्याची मोहिनी पडली ती त्याच्या राजकीय मतासाठी नव्हे तर त्याने जर्मन पुराणातील जर्मन वशाच्या दिग्विजयाच्या ज्या सगीतिका (Operas) लिहिल्या त्यामुळे ! वॅगनरविषयी हिटलरच्या मनात यामुळे अतोनात प्रेम निर्माण झाले. हिटलरचे हे वॅगनरविषयक प्रेम अखेरपर्यंत कायम होते, इतकेच नव्हे, तर वॅगनरचा मुलगा सिगफ्रिड वॅगनर हा वॉनफ्रिड (Wahnfried) येथे राहात असे, त्या टिकाणी हिटलर अनेक वेळा जात येत असे. या ठिकाणी होणाऱ्या वार्षिक जत्रेत हिटलर अनेक वेळा सहभागी झालेला होता.

२५ जानेवारी १९४२ ला म्हणजे रशियात जर्मन फौजाचा नुकताच मोठा पराभव झालेला असताना छावणीत हिटलर आपल्या सहकाऱ्याशी बोलत असताना विषय वॅगनरवर आला. हिटलर बोलता बोलता म्हणाला ..

" The ten days of the Bayreuth season were always one of the blessed seasons of my existence. On the day following the end of Festival, I was gripped by a great sadness–as when one strips the Christmas tree of its ornaments. "

[ प्रत्येक ब्रायरूथ ऋतूतील उत्सवाचे दहा दिवस हे माझ्या जीवनातील सर्वांत सुखदायक ऋतुच होते. ज्या दिवशी हा उत्सव सपत असे त्याच्या दुसऱ्या दिवशी, माझ्या मनावर विलक्षण खिन्नता पसरत असे. लहानपणी नाताळ सपल्यावर नाताळचे झाडावरील अलकार उतरवताना जे दुःख होते तसे हे दुःख असे. ]

या उत्सवात वॅगनरच्या सगीतिका गाजत असत. जर्मण पुराणावरील आधारलेल्या सगीतिकाचे यश आणि आपल्या रगभूमीवरील 'कीचकवधा'सारख्या नाटकाचे एके काळचे यश, हे सारखेच होते. बहुशः देशाची पुराणे ही त्या देशाच्या जीवनाची आणि संस्कृतीची तार अचूक छेडणारी असतात. राष्ट्र जन्माला येते ते पुराणे घेऊनच येते. त्या देशात राहणाऱ्याच्या ज्या समान निष्ठा असतात त्याचेच तत्त्वज्ञान या पुराणात असते. अर्थात् राष्ट्राचे भवितव्य त्याची पुराणेच अनेक वेळा ठरवीत असतात. पोथ्यापुराणाची हेटाळणी करणे, हे काहीजण समजतात तसे पुरोगामित्वाचे लक्षण अजिबात नाही. उलट ज्याना देशाची नाडी अचूक सापडावी अशी इच्छा असते, ते या पुराणाच्या आधारानेच जनतेची मते जिंकू शकतात. वॅग्नरचे यश हे या सूत्रात होते.

### हिटलर : जर्मन पुनरुत्थानाचे प्रतीक

हिटलरचे भविष्य सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ एकाच व्यक्तीने पाहिलेले होते. ही व्यक्ती मूळ इग्लिश. परतु जर्मनीत स्थायिक झालेली होती. याचे नाव होते एडमड चेबर्लिन " Foundations of the nineteenth century " हा सुमारे बाराशे पृष्ठाचा ग्रथ या विचारवताने १८९९ मध्ये प्रसिद्ध केला. हा ग्रथ प्रसिद्ध होताच कैसर वुइल्यमने त्याला आपल्या राजवाड्यात Postdam येथे बोलावून घेतले. दोघाचा स्नेह जुळला; पुढे महायुद्धात पराभव होऊन कैसर पळून गेल्यानतर चेबर्लिनचे दिवस फिरले. वॅगनरच्या एका सगीतिकेला तो एकदा हजर होता, व तिथेच हिटलरची व त्याची १९२३ मध्ये पहिली गाठभेट झाली. महायुद्धाने चेबर्लेन हादरलेला होता व अर्धांगवायूने लुळा झालेला होता. तशाही अवस्थेत या भेटीच्या दुसऱ्याच दिवशी त्याने हिटलरला लिहिलेले पत्र उपलब्ध झालेले आहे. त्यात तो लिहितो–

" You have mighty things to do With one stroke you have transformed the state of my soul. That in the hour of her deepest need, Germany gives birth to a Hitler proves her vitality – May God protect you ! "

[ फार मोठ्या अपेक्षा तुझ्याकडून आहेत. माझ्या अतःकरणाची स्थिती एकदम एका तडाक्यात तू पालटून टाकलीस. जेव्हा जर्मन देशाला अत्यत गरज असते तेव्हा एकादा हिटलर या देशात जन्म घेतो. यावरून हे जिवत राष्ट्र आहे याचा प्रत्यय येतो. परमेश्वर तुझे रक्षण करो ! ]

कल्पना करा, १९२३ साली जेव्हा हिटलरला फारसे अनुयायीही नव्हते तेव्हा लिहिलेले हे पत्र आहे. यावरून हिटलरच्या व्यक्तित्वात केवढी मोहिनी असली पाहिजे याची कल्पना येते. जेव्हा १९२४ साली उठाव फसल्यामुळे हिटलर लॅंड्सबर्गच्या कारावासात गेला, तेव्हा याच गलितगात्र तत्त्वज्ञानी चेबर्लेनने वृत्तपत्रात हिटलरविषयी लिहिले... " नियतीने कैसर वुइल्यमला जर्मनीचे पुनरुत्थान करण्यासाठी पाठविले होते. तो प्रयत्न फसला याबद्दल खेदाचे आता कारण नाही. तेच कार्य करण्यासाठी अ‍ॅडॉल्फ हिटलरचा जन्म आहे. "

११ जानेवारी १९२७ ला हा हिटलरभक्त मरण पावला. त्याच्या दफनाला हिटलर हजर होता.

नित्शे, वॅगनर, चेबरलेन, हेगेल या सर्वांच्या विचारछायेत हिटलरचे विचारमथन चालू असे. हेगेलच्या म्हणण्याप्रमाणे, जे थोर पुरुष इतिहासाला वळण देतात, त्याच्यात व्यवहारी राजकीय पुढारीपण आणि तत्त्वज्ञानी पुरुष याचे एक रसायन असावे लागते.

लॅंड्सबर्ग तुरुगात आपल्या पुस्तकाची प्रकरणे लिहिली जात असताना, जर्मनीच्या उद्धारासाठीच आपला जन्म आहे, या श्रद्धेबरोबरच जो युगपुरुष शतकानुशतकात एखादाच होतो असे हेगेल म्हणतो, ती भूमिका आपल्याकडेच आली आहे, असाही हिटलरचा पक्का ग्रह होत गेला..

नाताळ सुरू होण्यास फक्त आठवडा असताना १९२४ साली हिटलर लँड्सवर्ग कारावासातून बाहेर पडला. तेव्हा बाहेर अशी परिस्थिती होती की सामान्य वकुबाच्या नेत्याने हातपायच गाळले असते. नाझी पक्ष बेकायदा ठरला होता. पक्षाचे वृत्तपत्र बद पडले होते. जुने सहकारी पक्ष सोडून निघाले होते...काही गळले होते. हिटलरवर तर भाषाबदीच घातलेली होती. आणि सर्वांत महत्त्वाचा आघात कुठला असेल तर हिटलरची ऑस्ट्रियात हकालपट्टी होणार अशी अफवा होती.

याउलट वायमार प्रजासत्ताक चागलेच सावरले होते. हिटलर कारावासात असताना डॉ. शाक्त या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने चलन रोखून ठेवण्यात यश मिळवले होते. खडणीत सूट मिळून जर्मनीच्या माने-भोवतीचा फास बराच ढिला झाला होता. अमेरिकेतून भाडवल जर्मनीत वाहू लागले होते. दोस्ताशी मिळते घेण्याचे स्ट्रेसमनचे धोरण यशस्वी ठरणार अशी चिन्हे दिसू लागली होती. फ्रेंचानी -हूर प्रातातून काढता पाय घेतला होता. जर्मनीला लीग ऑफ नेशन्समध्ये प्रवेश देण्याच्या दृष्टीने लोकार्नो कराराची वाटाघाट सुरू झाली होती. सहा वर्षांत प्रथमच जर्मनांना स्थिर जीवनाचा अनुभव येऊ लागला होता. हिटलरची सुटका होण्यापूर्वी दोनच आठवडे, ज्या सार्वत्रिक निवडणुकाचे निकाल जाहीर झाले त्यात ज्याना हिटलर नोव्हेंबरचे हरामखोर (November Criminals) म्हणत असे, त्या सोशल डेमोक्रॅट्स पक्षाचे मतात तीस टक्क्याहून अधिक वाढ झालेली होती. नाझीवाद शय्येवर ठेवला आहे व सरणाची वाट पहात आहे, असाच सार्वत्रिक भ्रम निर्माण झालेला होता. जर्मनीच्या विपत्कालात जोरावलेला हा नवा घुमारा, आता जर्मनीच्या सुखकालात वठल्यासारखा झाला होता. निदान असे सगळ्या जनतेला व परदेशीय वृत्तपत्रकाराना तरी वाटू लागले खास !

– परंतु ॲडॉल्फ हिटलर खचलेला नव्हता. राजकारणात वाट पहावी लागते हे त्याला ठाऊक होते. ' केला जरी पोत बळेचि खाले, ज्वाळा परी ती वरती उफाळे ' या सूत्राप्रमाणे हिटलर अधिकाधिक अतर्मुख होऊन आपल्या सर्व चुका टाळून, नव्या चढाईला सिद्ध होण्याच्या दृष्टीने तयारीला लागला.

' माझा लढा ' या पुस्तकाचा पहिला खड सपवून, त्याने दुसऱ्या खडाला सुरुवात केली. हिटलरचे तत्त्वज्ञान जे काही होते, त्याची पाळेमुळे जर्मन जीवनात आणि इतिहासात खोलवर गेलेली होती. वंशश्रेष्ठता, साम्राज्यस्वप्न, शत्रू कोण, मित्र कोण याचे इतिहाससिद्ध दिग्दर्शन, या गोष्टी विचारात घेऊनच हे तत्त्वज्ञान उभे राहिले होते. या सर्वांना जर्मन जीवनात खोलवर जागा होती. नित्शे आणि हेगेल, बिस्मार्क आणि कैसर, वॅगनर आणि लुडेन्डॉर्फ या सर्वांचा आशीर्वाद या तत्त्वज्ञानाला लाभलेला होता. किंबहुना हिटलर जे करू इच्छित होता ते म्हणजे जर्मन इतिहासाचेच पुनर्लेखन होते. म्हणूनच शिरर लिहितो—

" His philosophy had roots deep in German life. The blue print may seem preposterous but it too possessed a certain logic It held forth a vision. It offered a continuation of German history. It pointed the way towards a glorious German life. "

[ त्याच्या तत्त्वज्ञानाची पाळेमुळे जर्मन जीवनात खोलवर गेलेली होती. त्याने दिलेला आराखडा काहीसा धक्का देणारा होता. परतु त्यालाही काही तर्कशुद्धता होती. त्यामुळे राष्ट्रापुढे एक मोठे स्वप्न उभे राहिले. जर्मन इतिहासाचीच ती पुढची पाने ठरणार होती. वैभवशाली जर्मन जीवनाकडे जाण्याचा एक मार्ग त्याने दाखवला. होता.... ]

## : २ :

## समृद्धीचा फसवा पूर

१९२५ ते १९२९ ही पाच वर्षे हिटलर व त्याची नाझी सघटना यांना अजिबात अनुकूल नव्हती. या कालात वायमार प्रजासत्ताकाला आर्थिक स्थैर्य मिळवण्यात यश मिळाले होते. परतु हिटलरच्या हे ध्यानात आलेले होते, की ही स्थिती फार काळ टिकणारी नाही. या सुबत्तेचे मुख्य कारण म्हणजे अमेरिकेच्या तिजोरीतून जर्मनीत वाहणारा कर्जाऊ पैसा हे होते. हे कर्ज जर्मनी परत करू शकेल की नाही याचा विचार धनको अमेरिका करीत नव्हती व ऋणको जर्मनीला असा विचार करण्यास सवडच नव्हती.

कारखान्याना कर्ज भरपूर मिळत होते. उत्पादन वाढत होते; त्यामुळे बेकारी सपत आली होती.

नाझी इतिहासाचा लेखक शिरर हा याच काळात जर्मनीत दाखल झाला. यावेळी जर्मनी कसा दिसला याचे वर्णन तो करतो—

" Life seemed more free, more modern, more exciting than any place I had ever seen. In contemporary writing, painting, architecture, in music and drama there were new currents and fine talents. The old Prussian spirit seemed to be dead and buried. Most Germans one met, politicians writers, editors, artists, professors, businessmen, labour leaders strike you as being democratic and liberal....One scarcely heard of Hitler or the Nazis except as butts of jokes usually in connection with the Beer Hall Putsch... "

[ येथील जीवन हे अधिक स्वतत्र, अधिक आधुनिक आणि इतरत्र असलेल्या कुठल्याही जीवनापेक्षा अधिक उत्साहजनक असे वाटले. चालू साहित्यात, चित्रकलेत, शिल्पकलेत, सगीतात आणि नाटकात नवीन नवीन प्रवाह व प्रतिमा दृगोचर होत होत्या. ती जुनी प्रशियन प्रवृत्ती मृतवत होऊन गाडली गेली होती. आपल्याला भेटणारे राजकारणी लोक, लेखक, सपादक, कलावत, प्राध्यापक, व्यापारी, मजूरनेते, ही सर्व मडळी उदारमतवादी व लोकशाहीची उपासक अशी भासत होती. हिटलरचे किंवा त्याच्या नाझी अनुयायाचे नाव तर क्वचितच निघे आणि निघालेच तर बिअर हॉलच्या उठावाची टिंगल उडवतानाच फक्त निघे... ]

२० मे १९२८ ला जी निवडणूक झाली तीत नाझी उमेदवार किती निवडून यावेत ? ४९१ समासदाच्या राइशस्टॅगमध्ये नाझी सभासद फक्त बारा होते. सोशल डेमोक्रॅट्स हा सर्वांत मोठा पक्ष झाला होता. व त्याचे १५३ सभासद निवडून आले होते.

काळवेळ ओळखून कसे वागावे याचे उपजत ज्ञान पुढाऱ्याना असावे

लागते. हिटलरला ते होते. तुरुगातून सुटल्याबरोबर बव्हेरियाचे पंतप्रधान डॉ. हेल्ड याची त्याने गाठ घेतली आणि काय बोलणे केले कुणास ठाऊक, परतु बव्हेरियात नाझी पक्षावरील बदी उठली व त्याचे वृत्तपत्रही सुरू झाले. पंतप्रधान हेल्ड यानी सागितले... 'The wild beast is checked. We can afford to loosen the chain.' आता काळजी नको. हे नाझी जगली जनावर आता कबजात आले आहे. साखळी थोडी सैल झाली तरी फिकिर नाही.' डॉ. हेल्ड यानी भलत्या भ्रमात पडून ही गोष्ट केली व हीच फार मोठी चूक ठरली.

### चढाईचा नवा पवित्रा

हिटलरने आता एक नवा पवित्रा आखला होता. घटनेच्या चौकटीत राहून नाझीपक्षाची एक राजकीय पक्ष म्हणून आता वाढ करावयाची. २६-२-१९२५ ला त्याने पक्षाचे 'Voelkischer Beobachter' हे पत्र पुन: सुरू केले. एकार्ट व रिटर हे दोघे निधन पावलेले होते, गोअरिंग परागंदा होता, लुडेन्डोर्फ व रोएम् हे हिटलरशी सबध ठेवण्यास नाखूष होते ड्रेक्सलेरने तर हिटलरला सागितले की 'खड्डयात गेली तुझी सघटना आणि पक्ष.' परतु तरीही हिटलर खचला नाही. त्याने पक्षाची पहिली सभा घेतली तिला सुमारे चार हजार नाझी स्वयसेवक हजर होते आणि हिटलरने त्याची निराशा मुळीच केली नाही. त्याने दोन तास भाषण केले व टाळ्याचा पाऊस पडत गेला. भाषणाच्या अखेरीस हिटलर म्हणाला–

" I alone lead the movement and no one can impose conditions on me, so long as I personally bear the responsibility."

[ मी एकटा यापुढे आपल्या चळवळीचे नेतृत्व करणार आहे मी व्यक्तिश: एकटाच ही जबाबदारी सभाळणार असल्यामुळे यापुढे माझ्यावर कुणी कसल्याही अटी लादू शकणार नाही...... ]

म्हणजे हिटलर हा काहीसा परिस्थितीमुळे पक्षाचा सर्वाधिपती झाला. सर्व सहकारी आता सोडून गेले अथवा पक्षापासून दूर राहिले. अशा अवस्थेत चळवळीचे नेतृत्व ज्या एकाच माणसाने सांभाळले, तो त्या चळवळीचा सर्वश्रेष्ठ नेता ठरला तर त्यात आश्चर्य ते कोणते ?

कार्ल लुडेक या आपल्या तुरुगातील एका सहकाऱ्याला याच सुमारास हिटलरने जे पत्र लिहिले त्यात हिटलरने स्पष्ट लिहिले होते–

" Instead of working to achieve power by armed coup, we shall have to hold our noses and enter the Reichstag, against the Catholic and Marxist deputies. If outvoting them takes longer than outshooting them, at least the result will be guaranteed by their own constiution. Any lawful process is slow ... sooner or later, we shall have a majority and after that Germany. "

[ सशस्त्र उठावाने सत्ता काबीज करण्याचा मार्ग सोडून आपल्याला आता नाके मुठीत धरून राईशस्टॅगमध्येच शिरले पाहिजे. कॅथॉलिक व मार्क्सवादी सभासदाच्या विरोधातून आपला शिरकाव तेथे करून घ्यावा लागेल. त्याना गोळ्या घालून नेस्तनाबूत करण्यासाठी जो काळ लागेल, त्यापेक्षा त्याच्यावर बहुमत मिळवायला कितीतरी अधिक काळ लागेल ही गोष्ट खरी; परंतु निदान हा निकाल लागेल तो कायमचा लागेल. त्यांच्याच घटनेचे त्याला पाठबळ असेल. प्रत्येक घटनात्मक कार्य हे सथपणेच करावे लागते. परतु आज ना उद्या आपल्याला बहुमत हे मिळणारच आणि एकदा बहुमत मिळाले की जर्मनी आपलाच. ]

एवढया सर्व विचारानी हिटलरने पाऊल उचलले खरे, परंतु त्याने पहिलेच जे भाषण केले त्यात तो श्रोत्याच्या प्रतिसादाने काहीसा वाहावत गेला. त्याने आपल्या भाषणात एक वाक्य उच्चारले...

" या आपल्या लढयाची परिणती दोनच गोष्टीत होऊ शकेल. एक आमचे शत्रू आपल्या प्रेतावरून जातील किंवा आपण तरी त्याच्या प्रेतावरून जाऊ ! ! "

हिटलरची ही भाषा आक्षेपार्ह ठरली. बव्हेरियन सरकारने ताबडतोब हिटलरवर भाषणबदी बजावली इतर राज्य सरकारानी असेच हुकूम काढले. केवळ आपल्या वक्तृत्वावर आतापर्यंत पक्ष सावरलल्या या नेत्याला हा मोठाच शह होता... कारण शब्दाशिवाय तूर्त तरी लोकाना देण्यासारखे त्याच्याजवळ काय होते ? सर्वांना वाटले. सपला, हिटलरचा अवतारच सपला. आता कसली भाषणे करतो ?

### नाझी संघटनेची उभारणी

परतु पुन लोकाचा हिशोब सपशेल चुकला. हिटलर हा मत्रमुग्ध करणारा नुसता वक्ता नव्हता, तो चतुर संघटक होता. त्याच्यावर भाषणबदी जारी होताच एका दृष्टीने हा त्याला वरच ठरला. कारण आतापर्यंत सघटनेकडे लक्ष द्यायला त्याला वेळच होत नसे. आता भाषणे बद झाल्यामुळे हिटलर फक्त सघटनेकडेच वळला. त्याने आपल्या सघटनेची रचना अशी केली की जर्मन राज्याच्या पोटात हे एक दुसरे नाझी राज्यच उभे राहावे. राईशस्टॅगचे जे मतदारसघ होते तेच देशाचे विभाग मानून सघटनेची याच विभागाप्रमाणे आखणी त्याने केली.

पक्षाचे मुख्यत: दोन विभाग कल्पिण्यात आले. एक विभाग हा राज्ययत्र खिळखिळे करून निवडणुका जिकायच्या तत्रावर भर देणारा व दुसरा हा रचनात्मक कार्यासाठी होता. या दुसऱ्या विभागात कृषी, न्याय, अर्थ, कामगार ही सर्व सरकारी खाती होती, इतकेच नव्हे तर परराष्ट्रखातेही होते. या रचनात्मक बाजूचा मुख्य भर याच गोष्टीवर होता की जर्मनीचा कबजा होताच, सर्व नाझी यत्रणा जय्यत तयार असावी.

S. A. स्वयसेवक सघटना ही मुख्यत: नाझी पक्षाच्या सभाची व्यवस्था व प्रतिपक्षाच्या सभाची वासलात लावण्यासाठी काम करू लागली. याच सघटनेतून हिटलर अधिकारावर येताच सैन्याधिकारी उपलब्ध व्हावे असाही दृष्टिकोन असल्याने या सघटनेची सर्व रचना लष्करी पद्धतीने करण्यात आली होती.

या व्यतिरिक्त काही कडव्या अनुयायाची S. S. (स्टॉर्म ट्रुपर्स) ही सघटना प्रथम हिटलरच्या व्यक्तिगत संरक्षणासाठी उभी झाली. १९२९ सालापर्यंत तिचे हेच स्वरूप होते. परतु यावर्षी हिटलरला या सघटनेचा पुरेपूर उपयोग समजणारा चेला सापडला. याचे नाव हेनरिच् हिमलर ! ज्यावेळी हिमलरने या सघटनेची सूत्रे हाती

**प्रचारतंत्र-विशारद डॉ. गोबेल्स**



**लोकशाहीचे शस्त्र चर्चा—हुकुमशाहीचे अस्त्र प्रचार**

घेतली तेव्हा त्यांची संख्या फक्त २०० होती. जेव्हा पुढे युरोपवर जर्मनीने कबजा केला तेव्हा या संघटनेने एवढी जरब निर्माण केली की तिच्या नुसत्या उल्लेखाने माणसे चळचळा कापू लागत. हिमलरचे हे कर्तृत्व होते.

या सर्व संघटनेच्या अग्रभागी हिटलरने स्वतःचे स्थान नक्की केले होते. त्याने एक राईश डायरेक्टोरेट निर्माण करून आपल्या प्रमुख सहकाऱ्यांचा सल्ला या डायरेक्टोरेटमार्फत मिळविण्याची सोय केली होती. या डायरेक्टोरेटचे सभासद हे निरनिराळ्या खात्यांचे पदाधिकारी असत. म्हणजे ही रचना काहीशी मंत्रिमंडळासारखीच असे, पण त्याचे सूत्र लोकशाहीशी निगडित नसून हिटलरच्या महत्त्वाकांक्षेची ही सगळी पूरक व्यवस्था फक्त होती.

हिटलरने हा प्रपंच अत्यंत डोळसपणे मांडला होता. कारण १९३६ साली अधिकारावर आल्यावर हिटलरने एका भाषणात यासंबंधी सांगितले, ते सर्वच राजकीय पक्षांना विचारणीय आहे. तो म्हणाला—

" We recognized that it is not enough to overthrow the old state, but that the new state must previously have been built up and be practically ready at one's hand. "

[ आमच्या हे लक्षात होते की फक्त जुने राज्य उलथवून काम भागत नाही, तर नवे राज्य हे सुरुवातीपासून बांधीत यावे लागते. म्हणजे वेळ येताच हे नवे राज्य केव्हाही हुकुमी हाताशी असते. ]

संघटनेला आर्थिक मदत देणाऱ्यांचा एक मोठा वर्ग हिटलरने निर्माण केला होता. नियमाने वार्षिक दक्षणा देणाऱ्यांची संख्या १९२५ साली फक्त २७००० होती. ती १९२६ मध्ये ४९०००; १९२७ मध्ये ७२०००, १९२८ मध्ये १०८००० व १९२९ १,७८००० अशा श्रेणीने वाढतच गेली.

परंतु राजकीय दृष्टचा मागासलेली हीच वर्षे हिटलरच्या व्यक्तिगत जीवनात सर्वात चांगली अशी गेली. बव्हेरिअन आल्प्स पर्वतातील बर्चेसगाडन् खेड्याच्या माथ्यावर हिटलर पुष्कळ काळ विश्रांतीसाठी येत असे. यावेळी आपल्या संबंधात पुष्कळ स्त्रियाही आल्या असे हिटलरने लिहून ठेवले आहे. परंतु लग्नाचा विचार त्याच्या मनात येऊनही त्याने निकराने विचार टाळला. याला तो कारण सांगतो— ' At the slightest imprudence, I ran the risk of going back to prison. एखाद्या लहानशा वेडेपणापायीही, पुनः कारावासात पडावे लागेल अशी सतत भीती त्याला वाटत असे. यामुळे लग्न करून संसार थाटण्याचा विचार त्याने मनात रुजूही दिला नाही.

## स्ट्रासर : गोबेल्स

हिटलरला एक लहानशी डोकेदुखी याच काळात मात्र निर्माण झाली. हिटलर लँड्सबर्ग तुरुंगात असताना नाझी संघटनेत ग्रेगार स्ट्रासर ( Gregar Strasser ) नावाच्या तरुणाचे प्रस्थ बरेच वाढत गेले. हिटलरपेक्षा तो तीन वर्षांनी लहान होता. व हिटलरप्रमाणेच महायुद्धात त्याला Iron Cross Class I मिळालेला होता. १९२० सालीच तो नाझी संघटनेत दाखल झाला होता व दक्षिण बव्हेरियात तो नाझी संघटनेचा महत्त्वाचा पदाधिकारी होता. हा स्ट्रासर उत्तम वक्ता होताच व उत्तम संघटकही होता. थोडक्यात, हिटलरपाशी असलेले सर्व गुण याचेपाशीही होते व अर्थातच हा स्ट्रासर हिटलरच्यापुढे वाकायला राजी नसे. हिटलर सुटून आल्यावर जी पहिली रॅली त्याने घेतली तिला स्ट्रासर हजर राहिला नाही.

१९२४ च्या निवडणुकीत या शत्रुपक्षाच्या बालेकिल्ल्यात, नाझी संघटनेचे बरेच प्रचारकार्य केले होते. त्याने जनतेशी चांगले संबंध प्रस्थापित केले होते व उत्तर जर्मनीत नाझी संघटनेला यश हवे असेल, तर स्ट्रासरला संभाळून घेतल्याखेरीज हिटलरला गत्यंतर नव्हते. अशा प्रत्येक वेळी हिटलरने वैयक्तिक मान-अपमान बाजूला सारलेला आढळतो. यावेळीही त्याने स्ट्रासरशी नमते घेऊन उत्तर जर्मनीतील संघटनेचे कार्य त्याच्यावर सोपविण्यात यश मिळविले.

बर्लिनमध्ये स्ट्रासरने आपला भाऊ Otto Strassar याच्या संपादनाखाली एक वृत्तपत्र लगेच सुरू केले व एक पाक्षिकही सुरू केले.

त्या पाक्षिकात मुख्यत्वे करून नाझी संघटनेची दैनंदिन प्रगति चित्रित होऊ लागली. प्रशिया, सॅक्सनी, हॅनोव्हर, ऱ्हाइनलँड या भागातून स्ट्रासरने तुफानी दौरे काढले. तो स्वत: १९२४ च्या निवडणुकीत राईशस्टॅटमध्ये नाझी तिकिटावर निवडून गेलेला समासद असल्या· मुळे त्याला हिटलरपेक्षा अधिक सवलतीने हे प्रचारकार्य करता येत असे. एकतर कुठेही जाण्याचा रेल्वेपास त्याला असे. त्यामुळे खर्चाचा प्रश्न नसे व शिवाय पार्लमेंट समासदाला असणारे भाषणस्वातंत्र्य त्याला वापरता येत असे.

आपल्या पाक्षिकासाठी स्ट्रासरने आणखी एक सहकारी निवडला. ऱ्हाईनलँडमधून आलेल्या या तरुणाचे नाव होते पॉल जोसेफ गोबेल्स हिटलरच्या प्रचारयंत्रणेचा हाच तो जगद्‌विख्यात अधिकारी.

डॉ. गोबेल्स हा बुटका होता. त्याचा एक पाय अधू होता. आणि त्याचे व्यक्तिमत्व हे काहीसे गुंतागुंतीचे होते. १९२२ साली त्याने प्रथम हिटलरचे व्याख्यान ऐकले व तो नाझी संघटनेत खेचला गेला· पहिली तीन वर्षे त्याच्याकडे कुणाचे फारसे लक्ष गेले नव्हते. परंतु एकदा स्ट्रासरने त्याला जाहीर सभेत भाषण करताना ऐकला, व गोबेल्सचा उपयोग प्रचारासाठी उत्तम रीतीने करता येईल याची खूणगाठ त्याने मनाशी बांधली. गोबेल्सचे विश्वविद्यालयीन शिक्षणही पूर्ण झालेले होते. नाझी संघटनेत गोबेल्स हाच सर्वांत शिक्षित होता· स्ट्रासरचा सेक्रेटरी हिमलर याची नेमणूक हिटलरने अन्यत्र केल्यामुळे स्ट्रासरला चांगला सहाय्यक हवाच होता. त्याने गोबेल्सला पुढे खेचले.

१८९७ साली गोबेल्सचा जन्म झाला. २९ ऑक्टोबर ही त्याची जन्म तारीख. त्याचा बाप एका गिरणीत फोरमन होता, व धर्माने तो कॅथॉलिक होता. गोबेल्सने वयाच्या चोविसाव्या वर्षी हायडेलबर्ग विश्वविद्यालयातून P. H. D. मिळविली. यापूर्वी कोलोन, फ्रँकफूर्ट, म्यूनिक, बॉन, बर्लिन या ठिकाणच्या विश्वविद्यालयातून त्याने परीक्षा दिल्या होत्या. त्याचे विषय होते – तत्त्वज्ञान, इतिहास आणि वाङ्मय! याशिवाय लॅटिन आणि ग्रीक भाषाचे त्याचे ज्ञान चांगले होते.

### अधू पायाचा शाप

'Michael' नावाची त्याची आत्मचरित्रपर कादंबरी डॉक्टरेट मिळण्यापूर्वीच लिहून प्रसिद्ध झाली होती. याशिवाय 'Wander' 'Lonesome Guest' ही दोन काव्यनाटके त्याच्या नावे जमा आहेत. ही दोन्ही नाटके त्याने स्वत: रंगभूमीवर आणली. लेखक म्हणून यश असूनही वृत्तपत्रव्यवसायात शिरण्याचे केलेले सर्व प्रयत्न फोल ठरले होते. याला मुख्य कारण त्याचा डावा अधू पाय असावा. वयाच्या सातव्या वर्षी त्याच्या डाव्या पायाचे हाड झडू लागले (Osteomyelitis) व त्यावर केलेली शस्त्रक्रिया विफल होऊन तो पाय उजव्या पायापेक्षा आखूड झाला. लाकडी पायामुळे गोबेल्सला युद्धातही भाग घेता आला नाही व त्याला हवी असलेली वृत्तपत्र-व्यवसायातील नोकरीही याच व्यंगामुळे मिळू शकली नाही.

पायात व्यंग असल्यामुळे, महत्त्वाकांक्षेला पायबंद बसलेली माणसे, ही बहुश: खुनशी व पाताळयंत्री होतात. कारण शारीरिक बलाशिवाय दुसऱ्यावर कुरघोडी करण्यासाठी लागणारी बुद्धीची वाढच फक्त त्यांच्या बाबतीत झपाट्याने होते.

गोबेल्स हा नाझी पक्षात दाखल झाला तेव्हा कट्टर समाजवादी होता. कामगार पददलित वर्गाची उन्नती करण्यासाठी झटणारा हा पक्ष आहे अशी त्याची समजूत होती. हिटलरच्या तो जसजसा अधिक अधिक सहवासात आला तसतसा त्याचा या बाबतीत भ्रमनिरास झाला. परंतु या वेळेपर्यंत तो स्वत:च इतका बदलला की आपली पूर्वीची मते त्याला हास्यास्पद वाटू लागली.

स्ट्रासर व गोबेल्स यांनी उत्तर जर्मनीत नाझी संघटनेचे स्वरूप बरेचसे समाजवादी विचारसरणीचेच ठेवले होते. नाझी या शब्दात समाजवाद येतोच व याच अर्थाने हे दोघे संघटना उभारीत होते.

१९२५ च्या फेब्रुवारीत गोबेल्स व हिटलरची पहिली सलामी झडली. जर्मनीतील मोठाल्या जहागिऱ्या व वतने रद्द करावी यासाठी कम्युनिस्टांनी उभारलेल्या चळवळीत नाझी पक्षाने सहकार्य द्यावे, असे स्ट्रासर व गोबेल्स यांचे समाजवादी मत होते. हा प्रश्न सार्वमताने ठरवण्यात येणार असल्यामुळे प्रचाराची धामधूम सुरू झाली होती.

हिटलरच्या नाझी पक्षाला द्रव्यसाहाय्य करणारे बरेचसे मिरासदार होते. त्यांचा पैसा घेऊन त्यांचीच वतने नष्ट करा असे पक्ष कसे सांगणार? हिटलर अस्वस्थ झाला. या वतनदार वर्गाखेरीज बरीच कारखानदार धनिक मंडळी नाझी पक्षाचा बोल्शेव्हिकांना ठेचण्याचा कार्यक्रम पाहून, पक्षाकडे आकर्षित झाली होती. बोल्शेव्हिकांशीच या प्रश्नावर संगनमत करणे म्हणजे पायावर धोंडा पाडण्यासारखे होते.

या प्रश्नाचा विचार करण्याकरता स्ट्रासरने उत्तर जर्मनीतील नाझी पक्षसदस्यांची सभा बोलावली. २२–११–१९५५ ला झालेल्या या सभेला हिटलर हजर राहिला नाही. धूर्तपणे त्याने आपला एक प्रतिनिधी मात्र पाठवला. सभेत कम्युनिस्टांशी सहकार्य करण्याचे धोरण मंजूर झाले. या सभेत हिटलरवर टीका करताना गोबेल्स म्हणाला, 'हिटलरला पक्षातून काढूनच टाका...!'

### अखेर मात केली!

ही सर्व घटना हिटलरने फक्त पाहिली. अखेर गोबेल्स हा बच्चा होता. हिटलरच्या आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वावर विलक्षण विश्वास होता. त्याने चार महिन्यानंतर दक्षिण जर्मनीत 'बामबर्ग' येथे पक्षाची सभा पुन: बोलाविली. या सभेला स्ट्रासर व गोबेल्स हजर राहिले. या सभेला हिटलरने आपले कडवे अनुयायी बहुसंख्येने उपस्थित ठेवले होते. भाषणाला हिटलर उभा राहिला. आणि सभा त्याने जिंकली. मात्र गोबेल्सला मोठाच धक्का बसला. आपल्या दैनंदिनीत त्याने त्या दिवशी लिहिले–

"Hitler talked for two hours. I felt as though some one had beaten me. What sort of Hitler is this? A reactionary? Completely wrong on the Russian question! Italy and England are our natural allies! Horrible!!"

[ हिटलर दोन तास बोलत होता. कुणीतरी माझ्यावर प्रहार करावे तसे मला वाटले. हा हिटलर आहे तरी कसा? प्रतिगामी? रशियनांच्या बाबतीत तर त्याची मते सर्वस्वी चूक आहेत. इटली व इंग्लंड हे नैसर्गिकरित्या आपले मित्र! सारेच भयानक .....! ]

परंतु असे असूनही हिटलरने गोबेल्सला जिंकले. पक्षात मोठेपणा मिळाला की भले भले आपल्या पगड्या फिरवतात हा राजकारणातला अनुभव हिटलरला ठाऊक होता. त्याने म्युनिकला होणाऱ्या एका

चड सभेत बोलण्यासाठी गोबेल्सची निवड केली. या सभेत फक्त हिटलर बोलणार होता व नंतर गोबेल्स. ही मात्रा अचूक लागली. आपला हा केवढा मोठा सन्मान असे गोबेल्सला वाटू लागले. त्याचा विरोध संपला. आपल्या दैनंदिनीत गोबेल्सने लिहिले आहे. ...

"एप्रिल ७ आज हिटलरचे पत्र आले. उद्याच्या सभेत मी बोलणार आहे माझे हृदय इतक्या जोराने स्पंदन करीत आहे की ते फुटेल की काय असे वाटते ...

"एप्रिल ८... मी बोलावयास उभा राहिलो. भीती वाटतच नव्हती. हिटलर शेजारी होता. उभा रहाताच टाळ्यांनी प्रचंड स्वागत झाले. भाषण संपले तेव्हा हिटलरने मला मिठीच मारली."

१७ एप्रिलला जेव्हा गोबेल्सने म्युनिक सोडले तेव्हा तो हिटलरच्या पुरता आधीन झालेला अनुयायी होता. २० एप्रिलला हिटलरच्या जन्मदिवशी त्याला पाठविलेल्या पत्रात गोबेल्स लिहितो—

"I have learned so much from you ... you have finally made me see the light."

गोबेल्स इथेच थांबला नाही. ऑगस्ट महिन्यात त्याने स्ट्रासर-वाद्यांना उद्देशून म्युनिकहून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रात (Voelkisches Beobachter) लेख लिहून जाहीरपणे स्ट्रासरलाईन सोडली

१९२५ च्या ऑक्टोबरात हिटलरने गोबेल्सला बर्लिन येथे नाझी संघटनेतील उच्च अधिकारपद दिले. बर्लिनमध्ये खुद्द अजून कम्युनिस्ट व सोशॅलिस्टांचाच दबदबा होता. हा मोडून काढून नाझी पक्षाचा दरारा प्रस्थापित करण्याची महत्त्वाची कामगिरी गोबेल्सवर सोपवण्यात आली.

### हिटलरचे प्रेमपात्र

१९२८ च्या उन्हाळ्यात हिटलरने बर्चेसगाडन या पर्वतातील ठिकाणाच्या वरच्या अंगाला एक व्हिला भाड्याने घेतला. त्याच्या बापाची पहिल्या बायकोची मुलगी अँजेला राउबल (Angela Raubal) ही विधवा झालेली होती. या विधवा बहिणीला हिटलरने व्हिएन्नाहून बोलावून घेतले व आपल्या दोन मुलींसह ती हिटलर-जवळ राहण्यास आली. या मुलींपैकी गेली राउबल, ही त्यावेळी वीस वर्षांची होती. तिचे केस दाट व भरपूर होते. बांधा सुरेख होता, आवाज गोड होता व एकंदर व्यक्तित्त्व मोठे आकर्षक होते. हिटलर या आपल्या भाचीच्या प्रेमात पडला. सभांना, पक्षबैठकांना, हिटलर-बरोबर गेली जाऊ लागली.

हिटलरचे व त्याच्या भाचीचे संबंध हा पक्षाच्या कार्यकर्त्यांत मोठाच विषय होऊन बसला. या दोघांचे लवकरच लग्न होईल तर ठीक, अन्यथा हिटलरने तिचा नाद सोडला पाहिजे, असाच शहाण्या-सुरत्या कार्यकर्त्यांचा सल्ला होता.

पण वर्षभरात या प्रेमप्रकरणाला निराळेच वळण लागले शिररला जी माहिती मिळाली त्यानुसार गेलीचे इतरत्र काही संबंध होते. हिटलरचे जरी गेलीवर प्रेम असले तरी तिचे हिटलरवर प्रेम नव्हते याचा परिणाम असा झाला की दोघांचे संबंध हळूहळू पार बिघडले. भांडणे होऊ लागली. गेलीने अखेर व्हिएन्नाला परत जाण्याचे ठरविले आणि हिटलरची तर या गोष्टीला परवानगी मिळेना.

१७ सप्टेंबर १९३१ ला हिटलरने हॅम्बुर्गला जाण्यासाठी घर सोडले. त्याच्या आदल्या दिवशी गेलीने व्हिएन्नाला जाण्यासाठी हट्ट धरला व हिटलरने तिला नकार दिला...ही बोलाचाली शेजारीपाजारी यांनी ऐकली. दुसऱ्या दिवशी सकाळी गेली राउबल हिचा घरातच गोळी झाडून खून झालेला आढळला. तिच्या डाव्या खांद्याखालील छातीतून गोळी आरपार जाऊन, तिच्या हृदयाचा अचूक वेध घेतलेला आढळला. ही आत्महत्या आहे असा कॉरोनरने निकाल दिला असला, तरी हा खून एकतर हिटलरने स्वतःच, किंवा हिमलर्‌करवी केलेला असावा असा संशय घेण्यात येतो.

मात्र हिटलरचे यानंतरचे वर्तन ही आत्महत्याच असावी या निर्णयाला पुष्टि देणारे आहे. गेलीच्या मरणाने हिटलर काही दिवस वेडा-पिसा झाला होता. ग्रेगॉर स्ट्रासर ह्याने पुढे एका जबानीत ही गोष्ट मान्य केली आहे. स्ट्रासर व हिटलर हे प्रतिस्पर्धी होते ही गोष्ट ध्यानात घेतली, तर या विधानाचे महत्त्व लक्षात येईल. पुढे चॅन्सेलर झाल्यावरदेखील हिटलरच्या खोलीत गेलीचे तैलचित्र ठेवण्यात आले होते. यावरून हिटलरने फक्त गेलीवरच आयुष्यात खरेखुरे प्रेम केले असे म्हणावे लागेल.

या सर्व काळात हिटलरचा चरितार्थ चालत होता तो केवळ 'माझा लढा' या पुस्तकाच्या रॉयल्टीमधून. पक्षाच्या पैशातून तो क्वचितच उचल करीत असे. याला मुख्य कारण त्याची राहणी साधी व सोपी होती. पैसा हा जीवनात फारसा महत्त्वाचा त्याने कधीच मानला नव्हता. शिररने म्हटले आहे—

"Hitler – it must be said in fairness, never seemed to care much about money."

[एक गोष्ट मान्य केलीच पाहिजे की हिटलरने पैशासाठी आयुष्यात कधीच फारशी हाव धरली नाही.]

पैशाची हाव हिटलरला नव्हतीच. गेलीचा मोह त्याला पडला होता, परंतु आत्महत्या करून गेली राउबल ही देखील त्याच्या आयुष्यातून दूर झाली. याचा परिणाम असा झाला की आपल्या सर्व ईश्वर-दत्त शक्ती, त्याने यापुढे नाझी पक्षाची वाढ करण्यासाठीच खर्ची घालण्यास सुरुवात केली.

जे आज ना उद्या घडणारच असा हिटलरचा कयास होता ती घटना १९२९ च्या ऑक्टोबर महिन्यात अखेर घडली. ३ ऑक्टोबर १९२९ ला स्ट्रेसमन् निधन पावला. परराष्ट्रमंत्री म्हणून त्याने सहा वर्षे जिवाचे रान करून जर्मनीची पत वाढवली होती व जर्मनीला दोस्तांकडून असंख्य सवलती मिळवल्या होत्या. 'लीग ऑफ नेशन्स' मध्ये जर्मनीचा प्रवेश झालेला होता. लोकार्नोचा करार त्यानेच घडवून आणला होता.

### शेवटी बाजार कोसळले

याच सुमारास जगभर मंदीची लाट वेगाने पसरू लागली. २४ ऑक्टोबर १९२९ म्हणजे स्ट्रेसमनच्या मृत्यूनंतर फक्त तीन आठवड्यांनीच "वॉल स्ट्रीट" चे बाजार कोसळले जर्मनीची सारी मदार अमेरिकेतून वाहणाऱ्या पैशावर असल्यामुळे 'वॉल स्ट्रीट' कोसळताच हा पैशाचा प्रवाह अचानक आटला. याच वेळी जुन्या कर्जाचे परत-फेडीचे हप्ते तुंबू लागले. जर्मन अर्थव्यवस्था डचमळू लागली. जर्मनीची निर्यात थांबताच आयात बंद होऊ लागली, कारण साऱ्या जगातच या मंदीची झळ पोचलेली होती. रोख मोजल्याखेरीज कुणीही देश एक धान्याचे पोतेही देशाबाहेर पाठवण्यास राजी नव्हता. कारखानं

बंद पडू लागले, उत्पादन थावले. निर्यात थावली. धान्य आयात होईना. हजारो लोक बेकार झाले. ऑस्ट्रियाची सर्वांत मोठी बँक Kreditanstall बुडाली. पाठोपाठ बर्लिनमधील राष्ट्रीय बँकेचे दिवाळे वाजले.

जर्मनीला वाचवण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट हूव्हर यानी जर्मनीला सर्व कर्जहप्त्याना तात्पुरती सूट दिली, परतु यामुळे फारसा परिणाम झाला नाही.

हिटलरला हे सर्व घडणार याचा अचूक अंदाज असला तरी हे सर्व कशामुळे घडणार आहे याची शास्त्रशुद्ध समज त्याला होती, असे वाटत नाही. त्याला या घटनेमागचे अर्थकारण समजले नाही, तरी प्राप्त परिस्थितीत कोणते राजकारण खेळावयाचे, याचा विचार त्याने पूर्वीच करून ठेवला होता. तो पहात होता. कारखाने बद पडले होते; जवळवजळ साठ लाख कामगार बेकार झाले होते. भाकरीच्या पिठासाठी लागणाऱ्या रागा मैलोगणती वाढत होत्या. या सर्वांना कारण कोण याचे उत्तर तयार होते. वायमार प्रजासत्ताक ! या प्रजासत्ताकाचे समाजवादी पुरस्कर्ते हे सर्वजण याला कारणीभूत होते !

मार्च १९३० मध्ये सोशल डेमोक्रॅट चॅन्सेलर मुएलेर (Mueller) यानी राजीनामा दिला. कारण ज्या पक्षाच्या सयुक्त आघाडीत, सोशल डेमोक्रॅट्स पक्ष सामील होता त्याच्यात मतभेद विकोपास गेले होते. त्याच्या जागीं कॅथॉलिक पक्षाचा हेन्रिच ब्रुएर्निग (Heinssch Bsueniny) हा चॅन्सेलर झाला. या माणसाचे नाव सुचवले ते जनरल व्हॉन स्लाइशर (Von Schleicher) या सेनाधिकाऱ्याने. हा स्लाइसर मोठा महत्त्वाकाक्षी व उचापती करणारा हुषार माणूस होता. त्याचे सर्व सैनिकी आयुष्य, सैनिकी कचेरीतच बढत्या घेण्यात गेले होते. त्यानेच प्रेसिडेंट हिंडेनबुर्ग याना ब्रुएर्निगचे नाव सुचविले. कारण ब्रुएर्निग हा काहीसा धीम्या प्रकृतीचा व सनातनी वृत्तीचा होता. राज्याला सैन्याचा आधार हवा असे त्याला वाटत असे.

स्वत: ब्रुएर्निग हा प्रामाणिक, नि:स्वार्थी व शुद्ध चारित्र्याचा धीरगंभीर माणूस होता. जर्मनीत माजलेला सावळा गोंधळ दूर करावा, पार्लमेंटरी पद्धती दृढमूल करावी, अशा उदात्त हेतूनेच त्याने चॅन्सेलरपद स्वीकारले. परतु हा चॅन्सेलरपदावर आला तो एका सेनाधिकाऱ्याने सूत्रे फिरवली म्हणून. यामुळे देशात लोकशाही दृढमूल करण्याचे प्रयत्न विफल होऊन अखेर यानेच लोकशाहीचे थडगे खणले. उदात्त हेतू उराशी बाळगणाऱ्या या माणसाची शोकातिका हीच हिटलरच्या उदयाची नादी ठरली.

अधिकारसूत्रे हाती घेताच चॅन्सेलर ब्रुएर्निगने आपला नवा आर्थिक कार्यक्रम अध्यक्षापुढे ठेवला व जेव्हा राईशस्टॅगचा या नव्या करवाढीला विरोध दिसू लागला, तेव्हा त्याने घटनेच्या ४८ व्या कलमाखाली देशात 'आणीबाणी' जाहीर करावी असा अध्यक्षांना सल्ला दिला. आणीबाणी जाहीर झाली, परतु राईशस्टॅगने हा उपाय बहुमताने भिरकावून दिला. अखेर जुलै १९३० मध्ये राईशस्टॅग बरखास्त करून अध्यक्षानी चॅन्सेलरच्या सल्ल्यानुसार नव्या निवडणुका जाहीर केल्या.

हिटलरला निवडणुका हव्या होत्या. मागल्या निवडणुकीनंतर जवळजवळ चार लक्ष तरुण नव्याने मतदार झालेले होते त्याच्यातील बहुसख्य नाझी तत्त्वज्ञानाने भारलेले होते. जो गोधळ माजला होता तो येनकेन प्रकारेण थाबावा त्याकरिता एखादा कणखर माणूस पुढे यावा, अशीच सर्व जनतेची इच्छा दिसत होती.

### निवडणुकीतील घोडदौड

हिटलरने निवडणुकीच्या गदारोळात नाझी पक्ष उतरवला. त्याने निवडणूक जाहिरनामा काढला, व पक्षाचे हेतू स्पष्ट नमूद केले–

(१) जर्मनी पुन: वलसपन्न करू.

(२) खडणी म्हणून यापुढे दोस्ताना एक छदाम देणार नाही.

(३) व्हर्सायचा तह आम्ही मानणार नाही.

(४) देशातील लाचलुचपत जालीम उपायानी नेस्तनाबूत करू.

(५) देशातील सटोडियाना ताळ्यावर आणू.

(६) प्रत्येक धडधाकट जर्मन तरुणाला, कामधदा व अन्नवस्त्र मिळेल याची तरतूद करू.

यापेक्षा सामान्य जनतेला आणखी काय हवे असते ?

निवडणुकाचे निकाल १४ सप्टेंबर १९३० ला रात्री जाहीर झाले. ज्या राईश्मध्ये नाझी पक्षाचे फक्त एक डझन सभासद होते–त्या जागी या निवडणुकीत नाझी पक्षाचे १०७ सभासद निवडून आले होते. राईशमधला दुसऱ्या क्रमाकाचा सर्वांत मोठा पक्ष म्हणून नाझी पक्ष ठरला होता.

कम्युनिस्टाचे बळही ५४ वरून ७७ वर गेले होते.

जे नाझी पक्षाने व कम्युनिस्टानी हिसकले ते सर्व 'सोशल डेमोक्रॅट्स'चे बळ ! आता ब्रुएर्निग अधिकच पेचात आला. कारण पूर्वीपेक्षा त्याला पाठिंबा असलेल्या पक्षाचे बळ, या निवडणुकीत अधिकच क्षयी झाले होते.

उलट नवा आशावादी पक्ष म्हणून नाझी पक्षाच्या दुदुभी सर्वत्र झडू लागल्या होत्या. देशात ज्या दोन मोठ्या सस्था सघटित होत्या त्या म्हणजे–सैन्य व मोठाले कारखानदार ! या दोघाना आपल्या पक्षामागे उभे करण्याच्या उद्योगाला आता हिटलर लागला.

आपल्या लिखाणातून आणि सभाषणातून हिटलरने सैन्याची मनधरणी सुरु केली होतीच.

राईशवेर् सैन्यात नाझी सभासदाना बदी होती. परंतु बरेचसे सैनिक हे हिटलरभक्त झालेले होते. कधी उघडपणे तर कधी गुप्तपणे नाझी पक्षाला त्याची सहानुभूती मिळू लागली होती.

### लिप्झिग्चा खटला

निवडणुकीच्या सुमारास, तीन सैनिकांना नाझी पत्रके सैन्यात वाटण्याच्या आरोपाखाली जनरल ग्रोएनेर्ने अटकेत टाकले होते व हे प्रकरण दाबून टाकण्याचा त्याचा विचार होता. परतु निवडणुकात सभासद फार मोठ्या सख्येने निवडून येताच, हे प्रकरण नाझी सदस्य पार्लमेंटमध्ये उपस्थित करतील, या भयाने या तिघाना कोर्ट मार्शल करण्याचे जनरल ग्रोएनेर्ने ठरवले. या तिघांच्या वतीने पुढे नाझी पक्षात गाजलेले हान्स फ्रँक (Hans Frank) व डॉ. कार्ल झॅक (Carl Sack) यानी लिप्झिग्च्या सुप्रीम कोर्टात वकीलपत्र दाखल केले.

हिटलरने हा बनाव मोठ्या योजनेने घडवला होता. 'बिअर हॉल'च्या खटल्याचा उपयोग त्याने ज्या कौशल्याने केला, तितक्याच कौशल्याने त्याने हा खटलाही गाजवला. फ्रँक याने या खटल्यात हिटलरची साक्ष काढली. कायदा गाढव असतो. हिटलरला न्यायालयापुढे बोलण्याची सधी कायद्याने नाकारता येईना.

वस्तुत: हिटलरने केवढा धोका पत्करला होता पहा ! या तीन

सैनिकाशी नाझी पक्षाचा सबंध नाकारणे, म्हणजे सैन्यात वाढीस लागलेल्या नाझी प्रेमाला ठोकरण्यासारखे होते. परतु या तिघांचा सबंध स्वीकारणे म्हणजे, त्या सैनिकावरील जो प्रमुख आरोप, की ' राज्य उलथू पाहणाऱ्या नाझी पक्षाशी सबंध ठेवला, ' या आरोपाचा स्वीकार करण्यासारखे झाले असते. अर्थात् हिटलरने ओळखले होते की सैनिकाना विश्वासात घेण्याची ही सुवर्णसधी आहे. त्याचा आपल्या स्वत:च्या निर्णयावर ठाम विश्वास होता व अखेर तो या प्रयत्नात यशस्वी झाला. शिरर लिहितो–

" From this national forum which the witness box afforded, Hitler made good use of all his forsenic talents and his subtle sense of political strategy. "

[ साक्षीदाराचा पिंजरा हे एक राष्ट्रीय व्यासपीठ म्हणून हिटलरने वापरले, व आपल्या सर्व कायदाविषयक ज्ञानाचा आणि राजकीय मुत्सद्देगिरीचा योग्य तो उपयोग केला... ]

हिटलरने कोर्टाला आणि उपस्थित सेनाधिकाऱ्याना स्पष्टपणे सांगितले, की S. A. सघटना किंवा नाझी पक्ष याचे सैन्याशी कसलेही भाडण नाही. तो म्हणाला—

" माझे असे स्पष्ट मत आहे की, सैन्याला बाजूला सारण्याचा प्रयत्न करणे हे मूर्खपणाचे आहे. आमचा तसला काहीही हेतू नाही. याउलट मी असे आश्वासन देतो की उद्या सत्ता आमचे हाती आलीच तर आजचे राईशवेअर् सैन्य हे आम्ही एवढे मोठे करू की जगाला त्याचा हेवा वाटावा... "

पुढे हिटलरने सागितले की आम्ही सनदशीर मार्गानेच जाणार आहोत. बलाचा वापर अभिप्रेत नाही.

" Our movement has no need of force. The time will come when the German nation will get to know of our ideas, the thirty-five million Germans will stand behind me. "

[ आमच्या चळवळीला बलाची आवश्यकता नाही. यथावकाश जर्मन राष्ट्राला आमच्या विचाराची ओळख पटेल.. साडेतीन् कोटी जर्मन जनता त्यावेळी माझे पाठीशी एकदिलाने उभी राहील.. ]

या ठिकाणी कोर्टाच्या प्रमुख न्यायाधीशानी हिटलरला अडवले व विचारले.

" १९२३ साली जाहीर भाषणात आपण नोव्हेंबर हरामखोराना देहान्त शासन देण्याची भाषा वापरली होती. त्याच्याशी आपले आताचे म्हणणे विसगत नाही काय ? "

हिटलर गडबडला नाही. त्याला हिंसाअहिंसेचा निरर्थक काथ्याकूट अभिप्रेत नव्हता. त्याने तितक्याच बेडरपणे सागितले.

" जेव्हा आम्ही अधिकारावर येऊ तेव्हा नाझी न्यायासनापुढे नोव्हेंबर १९१८ च्या हरामखोराची पुन चौकशी होईल आणि मागचा सूड म्हणून मुडकी मारली जातील... "

[ The November 1918 revolution will be avenged and heads will roll. ]

कोर्टाच्या जमलेल्या असख्य प्रेक्षकाच्या अगावर यावेळी रोमाच उठले. टाळ्यांचा कडकडाट झाला. सामान्य नागरिक आणि सैनिक हे एकाच वेळी हिटलरला साथ देऊ लागले. कोर्टाच्या अध्यक्षानी घटा बडवली. व टाळ्या बंद झाल्या.

कोर्टाने तिघा सैनिकाना दोषी ठरवून, अठरा महिने कारावासाची शिक्षा ठोठावली. पण या एकदर खटल्याचा जो वृत्तान्त दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध झाला, त्यात प्रामुख्याने गाजली ती हिटलरची साक्ष !

## नवा प्रेषित हिटलर

निवडणुकीतील दणदणीत यश, कोर्टातील हिटलरची कामगिरी आणि सैन्यात उफाळलेले हिटलरप्रेम या सर्वांचा परिणाम असा झाला की जर्मन देशभक्तीला आणि राष्ट्रवादाला जोराची फुकर मिळाली. देशभक्तीचा आणि राष्ट्रवादाचा स्फुल्लिग धगधगू लागला. सर्वसामान्य जनता, सैनिक, कारखानदार हे सर्व हिटलरकडे नव्या प्रेषिताच्या भक्तीने पाहू लागले. कम्युनिझम, सोशॅलिझमच्या वकव्यापेक्षा निराळे, लोकशाहीच्या खेळखडोब्यातून राष्ट्राला वाचविणारे असे काहीतरी हिटलर करू पाहात आहे, त्याला ज्वलत राष्ट्रवादाचा मुलामा आहे, या सर्व गोष्टी लोकाना मारून टाकू लागल्या.

परतु लिप्झिग खटल्याचा मुख्य परिणाम हा झाला, की सैन्यातील काही उच्चपदस्थ अधिकारी हे नाझीपक्षाकडे आशेने पाहू लागले. व्हर्सायचा तह हा जर्मन सैन्याच्या कर्तबगारीवरचा कलक होता. हा पुसून टाकण्याची, तह ठोकरण्याची भाषा हिटलरने वापरताच सैनिक आणि सेनाधिकारी याच्या हृदयाच्या तारा कुठे तरी छेडल्या गेल्या.

कुठलाही पक्ष जनतेत प्रिय होऊ लागला, की थैलीशहाच्या पिशव्या या पक्षाच्या ओटीत पैसा ओतू लागतात. कारण राजकीय पक्ष म्हटला की कार्यकर्त्यांचे पगार, अधिवेशनाचा टोलेजग खर्च, निवडणुकीतील पैशाचे गटार या सर्वासाठी अमाप पैसा लागतो. हा पैसा कुठून येतो याची पक्ष फारशी चिंता वाहात नाही. अशावेळी थैलीशहा आपला पैसा या पक्षाच्या ओटीत ओततात. कालांतराने पक्ष अधिकारावर आला की त्याच्या लक्षात येते, की आपण काही थैलीशहाचे मिंधे आहोत. हे मिंधेपण आता नाकारणे शक्य नसते ! मग तोडात समाजवादाचे तत्त्वज्ञान आणि करणी थैलीशहाच्या हिताची असा व्यवहार जन्म घेतो. अखेर सगळेच परिस्थितीचे दास असतात. मग ' तेरी बी चूप मेरी बी चूप ' या न्यायाने मांडवलदारांच्या तंत्राने राज्याची चक्रे फिरू लागतात.

निवडणुकीत यश मिळताच नाझीपक्षाची पैशीची ददातच सपली. डॉ. शाक्तसारखा अर्थशास्त्रज्ञच हिटलरच्या कच्छपी लागला. एकदा अधिकारपद भोगलेल्या या माणसाला सर्व थैलीशहाच्या किल्ल्या ठाऊक होत्या. त्याने भाडवलदाराचा फौजफाटा हा हा म्हणता हिटलर मागे उभा केला. यात जर्मन पोलाद धद्याचा बादशहा जगद्विख्यात क्रप (Krupp) हा देखिल होता.

गोअरिंग हा १९२७ साली जर्मनीत परतला होता. त्याची वायको क्षयी होऊन स्वीडन्मध्येच अथरुणावर खिळून होती. १९२८ साली जे बारा नाझी सदस्य निवडून आले त्यात हर्मन गोअरिंग होता. गोअरिंग हा विमानवाहतुकीच्या व्यवसायात बड्याबड्या व्यक्तींच्या सहवासात येत असे. या सर्व ओळखीपाळखीचा उपयोग हिटलरला आता होऊ लागला.

अर्न्स्ट रोएम हा हिटलरवर रागावून १९२५ मध्ये पक्ष सोडून

गला होता. १९३० अखेर तो परत पक्षात आला, व हिटलरने S. A. संघटनेचे नेतृत्व पुन: त्याच्याकडे दिले.

स्ट्रासर, गोअरिंग, गोबेल्स, अर्न्स्ट रोएम्, हिमलर, डॉ. शाक्त, आल्फरेड रोझेनबर्ग ही सर्व मंडळी आता हिटलरचे विश्वासू सहकारी म्हणून नाझी पक्षाचा डोलारा सावरू लागली होती.

१९२५ ते १९३१ हा नागमोडी प्रवास हिटलरने संपवला होता. या प्रवासात हिटलरने अधिकाराच्या दिशेने बरीच वाटचाल कापली होती.. राईशस्टॅग अर्धांगाचा झटका आल्याप्रमाणे लुळे झाले होते. चौऱ्यांशी वर्षे वयाचा अध्यक्ष हिंडनबुर्ग आता म्हातारपणामुळे, बुद्धीनेही विकल होऊ लागला होता. जनतेत मात्र नाझी पक्षाच्या प्रेमाला हळूहळू उधाण येत होते. जनता मात्र हवालदिल होती. मध्यमवर्ग नाश पावण्याच्या मार्गावर होता—कारखाने नीट चालत नव्हते. पोटभर अन्न नव्हते. बेकारी वाढत होती. अर्थात हीच परिस्थिती नाझीवादाला पोषक ठरत होती. स्ट्रासरने तर जाहीरपणे सांगून टाकले—

" All that serves to precipitate the catastrophe is good, very good for us and our German Revolution. "

[ ज्या ज्या गोष्टीमुळे सर्वनाशाचा दिवस जवळ येईल, त्या त्या गोष्टी आमच्या दृष्टीने, जर्मन क्रांतीच्या दृष्टीने हितकारकच आहेत... ] ● (अपूर्ण)

" हिटलरने चॅन्सलरपदावर जी अचूक झेप घेतली त्याचे नाट्य आता सुरू होत आहे "—पण...नाही. हे नाट्य येथे सादर करण्यास थोडा अवकाश आहे. कारण रा. म. शास्त्री यांनी जरी ते लिहून पूर्ण केले असले तरी जागेअभावी ते या अंकात जाऊ शकले नाही. वाचकांनी क्षमा करावी ! —संपादक

**शोध आणि बोध**

# गणेश गाढवे वळी



# आणि

# खंडोबा दाढी करी !



महाराष्ट्रात इस्लामी सत्तेने धुमाकूळ मांडल्यानंतर हतबुद्ध आणि दिङ्मूढ झालेल्या मराठी जनतेला जागविण्याचा व्यापक प्रयत्न मराठी संतांनी सुरू केला. त्यांनी रामायण-महाभारतातील आदर्श लोकमानसापुढे मांडले आणि लोकांचे पौरुष जागविले. संतांची ही जनजागरणाची दृष्टी रामकथेच्या द्वारा विशेष व्यक्त झाली. आपल्या काळात पुन: रावण मातला आहे, त्याने निरपराध्यांचा छळ मांडला आहे, स्त्रियांच्या शीलाचे अपहरण चालविले आहे, आणि देवांचीही प्रतिष्ठा पायतळी तुडविली आहे, हे लोकांच्या मनात बिंबवून त्यांच्या ठायी सुप्त असलेला ' सुप्त राम ' जागृत करावा आणि त्या जागृत रामाच्या कर्तृत्वाने रावणाचा नि:पात घडावा, यासाठी मराठी संतांनी रामकथेचे गायन पुन: पुन: केले आहे.

एकनाथांनी रचलेल्या भावार्थ रामायणात ही स्वकालाची जाणीव स्पष्टपणे उमटलेली दिसते. रामकथेत स्वकालीन तपशील भरून लोकांची मने पेटविण्यासाठी नाथांनी कसा प्रयत्न केला, त्याचे एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. रावणाने सर्व देवांना बंदिवान् करून त्यांचा छळ चालविला, या प्रसंगाचे वर्णन करताना नाथांनी रामायणकालीन देवतांऐवजी स्वकालीन लोकप्रिय देवतांची नामावळी लोकांपुढे मांडली आणि लोकांना ज्या देवतांविषयी अत्यंत भक्ति होती, त्या देवतांचा छळ मांडल्याचे वाचून-ऐकून लोकांची मने संतप्त व्हावी अशी भूमिका तयार केली. नाथ लिहितात :

**मार्तंड नापित होऊन। श्मश्रु करी स्वकरे करून गर्दभ राखी गजवदन। मनात लाज न धरिता ।।**

नाथांच्या नंतर रामकथेवर रचना करणाऱ्या सर्व मराठी संतकवींनी नाथांच्या या विशिष्ट पद्धतीचा अवलंब केला.

—जेव्हा समाजात ' रावण ' निर्माण होऊन देवांची ही प्रतिष्ठा धोक्यात आणतात, तेव्हा समाजातील धुरीणांनी समाजमनातील ' रामा 'ला जाग आणण्यासाठी असे जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. **—रा. चिं. ढेरे**



'रत्नदीपा'तील एकमेव ज्योत (रेखा)

# रत्नदीप

## जुने आहे पण सोने नाही !

श्रीकृष्ण पोंक्षे

* * *

कुलायतन या नाट्यसंस्थेने ५ जून १९६४ रोजी भरत नाट्य-मंदिर पुणे येथे श्री. यशवंत रांजणकर यांचे 'रत्नदीप' हे नवे नाटक सादर केले.

### गावाकडची गोष्ट

'एक असतो राजा, त्याला असतात दोन राण्या, एक असते... अशा तऱ्हेच्या गोष्टी लहान मुलांना आणि त्याजबरोबर मोठ्या माणसांनाही आजपर्यंत आवडत आलेल्या आहेत. अगदी अशीच एका इनामदार राजा-राणीची ही 'रत्नदीप' या नाटकाची कथा ! मात्र यातल्या पहिल्या राणीला कॅन्सर झालेला असतो आणि ती दुसऱ्या राणीची व्यवस्था कशी करते हा या नाटकाचा विषय !

कोणा एका गावच्या महेश (चित्तरंजन) या इनामदारांच्या घरी प्रो० प्रताप (राजा करंवेळकर) हा त्यांचा मेहुणा आपली मैत्रीण मीरा (लीला मेहता) हिला मुंबईहून घेऊन येतो. मीरा ही "खेडी व त्यांचा सांस्कृतिक वारसा" हा विषय घेऊन पीएच्. डी. चा अभ्यास करीत असते. या विषयाच्या अभ्यासासाठीच ती या इनामदारांच्या घरी, आपला मित्र प्रताप याच्या ओळखीने येते.

ही मंडळी येतात त्या दिवशी सती पौर्णिमा असते. फक्त या इनामदार घराण्याच्याच पंचांगात असलेल्या ह्या सणाची हकीगत त्यांचा पुरोहित त्याचे नाटकातील नाव गुरुजी– (आ. दे. पाटील) कडून मीरेला (आणि अर्थात प्रेक्षकांनाही) साद्यंत ऐकविली जाते.

फार वर्षांपूर्वी कुणा एका दासीने इनामदार घराण्याकरता आपले प्राण दिले होते...एवढ्या लहान वाक्यात जे सांगावयाचे ते रटाळपणे बऱ्याच तपशीलासह सांगितले जाते.

पौर्णिमेच्या दिवशी ही मंडळी येतात त्या रात्री सती वृंदावनाजवळ दीप लावण्याची तयारी घेऊन इनामदारांचा जुना वयोवृद्ध नोकर खाशाबा (शंकर घाणेकर) येतो. त्यावेळी इनामदारांची बायको उमा (रेखा) तिथे नसते. ती अजून घरातच असते. त्या दीपोत्सवाची हकीगत, तो दीप आणि ती तयारी पाहून मोहित झालेली मीरा, तो दीप लावायला उत्सुक होते. पण तिला त्या गोष्टीला मनाई केली जाते. तो दीप फक्त इनामदारांच्या कुलस्त्रीनेच लावण्याचा या घराण्यातील संकेत तिला सांगितला जातो. मग उमा येते. तो दीप पाजळते आणि इतक्यात इनामदार महेश, एका रानडुकराची शिकार करून त्या दीपोत्सवाची सांगता करण्यास येतात. पूर्वी या दिवशी गनिमाचे प्रतीक म्हणून बोकड बळी दिला जाई, पण महेश इनामदारांनी केलेली या उत्सवातील ही सुधारणा...इनामदारांच्या पौरुषाचे प्रतीक ! महेशचे पंचारती ओवाळून आगत स्वागत होते. आणि त्याच वेळी त्याच्याकडे पाहुणी आलेल्या मीरेची आणि त्याची दृष्टादृष्ट होते. क्षणभर दोघेही गोंधळतात. पुढे मग त्या गोष्टीचा त्यांना चांगलाच सराव होतो.

पण त्या रात्री मात्र महेशला झोप येत नाही. इतक्यात उमा बाहेर येते. तिला कसली तरी व्याधी जडलेली असते. ती लपवून ती पतीची काळजी वाहात असते. दोघांच्या बोलाचालीतून विषय भलतीकडे वळतो आणि उमा-महेश संबंध कसे होते, त्याचे इतक्या उत्कट प्रीतीत रूपांतर कसे झाले, वगैरे वगैरे सारा इतिहास संवादातून सांगण्यात येतो. उमा आणि महेश यांतील दुजाभाव साफ विसरून जाऊन ती दोघे एकरूप झाल्याचे दर्शन घडते. या दर्शनाने, आधीच शारीरिक व्याधीने होणारा मानसिक ताण सहन करणारी ती उमा, पतीच्या या उत्कट प्रीतीच्या 'प्र'दर्शनाने भारावून जाऊन भोवळ येऊन पडते. आणि महेश उमेला सावरीत असता असता पहिला अंक संपतो.

उमेच्या वाढलेल्या आजाराचे चित्र रेखाटीत दुसरा अंक उगवतो. तिच्यावर उपचार करणारा डॉक्टर (मालचद्र रणदिवे) तिच्या पूर्वपरिचयाचाच असतो. रोगाचे हे भयकर स्वरूप तो तिला सागतो. आपल्या पतीला रोगाचे हे भयकर स्वरूप कळले तर तो हाय खाईल, म्हणून त्याला ते न सागण्याबद्दल ती डॉक्टरला आपली शपथ घालते. डॉक्टर ती शपथ स्वीकारून निघून जातो. मग उमेची विचारचक्रे फिरू लागतात. आपल्या पतीला जर ही परिस्थिती कळली तर...? तर आपल्या प्राणावरोबरच हा रोग या घराण्याचाही घात करील या भयशंकेने अस्वस्थ झालेली उमा परत सती वृंदावनापाशी भोवळ येऊन पडते. इतक्यात बाहेर फिरावयास गेलेली महेश व मीरा ही जोडी मोठ्या खुशीत हसत खेळत प्रवेशते. मीरेशी हास्य-विनोद करता करता एकदम महेशला उमेची आठवण होते. उमा तिथेच असलेली पाहून मीरा-महेश चपापतात. उमेच्या ते ध्यानी येते. ती सफाईने त्यावर पडदा टाकून आत निघून जाते. ओशाळलेला महेशही मग तिच्या पाठोपाठ आत जातो. आणि मीरेला इथे सोडून परत मुंबईला गेलेला प्रो० प्रताप परत येतो. तो सरळ सरळ मीरेला लग्नाविषयी विचारतो. ती त्याला स्वच्छ नकार देते. 'तुझ्याविषयी असलेल्या उत्कट जिव्हाळ्याच्या भावनेत माझ्या मनी असले काही नव्हते' असे सांगते. आणि दुसरे म्हणजे 'तू हा प्रश्न मला फार उशिरा विचारतो आहेस. आता नाइलाज आहे,' असे सागते. (खरे-खोटे राजणकर जाणे !)

महेश मीरेला एकातातील एका उत्कटक्षणी प्रताप पकडतो आणि त्या हृदयशून्य कृतीचा जाव विचारतो. महेश–मीरा निरुत्तर होतात प्रतापच्या वाक्बाणानी विद्ध झालेल्या आपल्या पतीला सोडवण्यासाठी उमा मधे पडते. इनामदार घराण्याची प्रतिष्ठा राखण्यासाठी, ती बाहेर चव्हाट्यावर जाऊ नये यासाठी, भावाला घराबाहेर घालवते. (यामुळे अब्रू कुठे राहते कुणास ठाऊक ?) आणि आपल्या मोठ्या मनाच्या पदराखाली, महेश–मीरेला आणि इनामदार घराण्याच्या प्रतिष्ठेला घालून, नवऱ्याचे हे नवे प्रेमप्रकरण आसन्नमरण उमा स्वीकारते. (का ते प्रेक्षकाना आधीच ठाऊक असल्यामुळे नाटक खरे म्हणजे इथेच सपते, परंतु पुढे आणखी एक अंक असतो.)

तिसऱ्या अकात उमेच्या कृपाछत्राखाली महेश–मीरेचे प्रकरण आणि डॉक्टराच्या कृपाछत्राखाली उमेचा आजार वाढण्याची चढाओढ लागते. भवितव्याची जाणीव उमेला आता झाली आहे. तिला कॅन्सर झाला आहे असे डॉक्टरानी महेश इनामदाराना अखेर सागितले आहे. महेश .. 'सागा ना ! सागा ना ! सागा ना !'... अश्रु... डॉक्टरना गळ घालतो. डॉक्टर अखेर... 'नाही मी बोलत' म्हणत रडतात... पण अखेर सागतात. रोग असाध्य आहे असे कळताच महेश चिडतो, मग गहिवरतो, रडतो तडफडतो. पण धीराची उमा त्याची समजूत काढते. त्याला धीर देते. आणि ससाराच्या सारीपाटाचा खेळ मोडला जाऊ नये म्हणून आपल्या बदली मीरेला मिडू करून घेण्याबद्दल सुचवते. मग महेश आपल्या एकदर वर्तनाबद्दल खेद व्यक्त करतो. आत्मनिंदेची कारंजी उडवतो. (का कुणास ठाउक !) आणि अखेर उमेच्या हट्टासाठी मीरेला प्रेयसीच्या पदावरून बढती देऊन, पत्नीच्या रिकाम्या होणाऱ्या जागेवर चढविण्यास तयार होतो. मग उमा इनामदारीणपदाची सारी वस्त्रेभूषणे मीरेच्या स्वाधीन करते. उमेची ही सारी आहेवलेणी मोठ्या दुःखित अतःकरणाने लेवून ही भावी इनामदारीण तो रत्नदीप पाजळीत असता नाटक सपते ! यशवंत राजणकरानी माडलेली अशी ही कथा !

**नुसते 'दिवा लाविते दिवा !'**

या नाटकात नाटककाराने ज्या व्यक्तिरेखा चितारल्या आहेत त्यातील फक्त उमाची रेखा स्पष्ट आणि बरीचशी रेखीव आहे. बाकीची पात्रे काही अर्धीमुर्धी तर काही मुळी बिन चेहऱ्याचीच आहेत. वर आम्ही अंकवारी कथा निवेदन केली आहेच त्यात पहिला अंक त्या सती वृंदावनाच्या गौरव–माहात्म्यात आणि उमा–महेशाचे हितसबध स्पष्ट करण्यात खर्च झाला आहे. काही विशेष घटना व नाट्य या अंकात मुळीच नाही. खाशाबाची भूमिका पहिल्या अकात कुठे जीव धरू लागलेली दिसत होती, पण पुढे त्या भूमिकेचे कलम करून तिला वाऱ्यावर का फेकून दिले ते कळत नाही. सतीवृंदावनाच्या कथेचे प्रवचन पहिल्या अकात गुरुजीच्या तोडून इतक्या कटाळवाण्या स्वरूपात मांडले आहे की, प्रेक्षक अक्षरशः त्यात गाडला जातो. सबंध पहिला अंक सपतो तरी नाटक उभे रहात नाही, कुठलीही समस्या निर्माण होत नाही. आणि मनात असा विचार येतो की, हा तास सव्वा तासाचा प्रपंच कशासाठी ?

दुसऱ्या अकात नाटक उभे राहात आहे असे वाटू लागते. उमेची व्यक्तिरेखा प्रेक्षकाचे मनात घर करू लागते, पण कथेचा नायक महेश कोणत्या अधिष्ठानावर लेखकाने उभा केला आहे कळत नाही. ज्या आपल्या पत्नीवर त्याचे नितात प्रेम आहे तिला विसरून तो आपल्या मेव्हण्याच्या प्रेयसीच्या करपाशांत कोणत्या दृष्टिकोनातून गुरफटला जातो हेही एक गूढच. महेश या पात्राचे अधिष्ठान हे या नाटकात इतके डळमळीत आणि हास्यास्पद आहे की त्याच्यावर भाष्य करणेच कठीण ! पहिल्या बाजीरावाच्या थाटात तो आपल्या मोठेपणाच्या ओझ्याचे दुःख माडतो. पण हे वाघाचे कातडे लवकरच विरते आणि आतील कोल्हे स्पष्ट दिसू लागते. उमेसारख्या सत्प्रवृत्त आणि कर्तबगार बाईचा तो नवरा आहे या पलिकडे त्याचा मोठेपणा कोणता कळत नाही. उमेच्या श्वासोच्छ्वासातलाही गूढार्थ शोधणारा हा महेश, मीरेच्या श्वासात अगदी सहज श्वास मिळविण्याची इच्छा धरताना पाहून त्याच्या तोडी घातलेली नीती-नियमभावनेची भाषा अत्यत हास्यास्पद वाटते. असा हा एक बिनबुडाचा नायक या नाटकात दृष्टीस पडतो. मीरेचे व्यक्तित्व सबध नाटकात कुठेच उभे राहू शकले नाही. कोणत्याही तऱ्हेची जीवननिष्ठा नसलेली एक ठिसूळ व्यक्ती, यापरते तिचे वर्णन नाही. उमेच्या करवी तिला मोठे करण्यात नाटककाराला सपूर्ण अपयशच आले आहे. उमा ज्या व्यक्ती मनाच्या मोठ्या आहेत असे आग्रहाने सागत आहे, त्या व्यक्तीचा मोठेपणा सबध नाटकात कुठेही दिसत नाही. उमेला मीरेचा मोठेपणा कशात दिसला कळत नाही. ती उमेच्या मुलाना जपते, (हीसुद्धा पडद्यामागील गोष्ट, त्या मुलाचे दर्शन स्टेजवर घडेल याविषयी प्रेक्षक वाट पहात होते); तिच्या नवऱ्याचे अनेक दृष्टीने मनरंजन करते, यातच असेल तर आमचे म्हणणे नाही. आणि कॅन्सरचा रोग स्पष्ट झाल्यावर हा बिनबुडाचा नायक नायिकेसाठी इतकी तडफड का करतो हेही कळत नाही ! ज्याने तिच्या तब्येतीविषयी यापूर्वी कधी विशेष दखल घेतलेली नाही, त्याच हे वागणे हा

एक निवळ फाजील कांगावाच वाटतो. उमा इनामदार घराण्याची इभ्रत मीरेच्या ओटीत जेव्हा घालते, तेव्हा हा सर्व प्रकार केवळ उमेचे मन दुखावले जाऊ नये, या भावनेने मीरा आणि महेश नाइलाजाने मान्य करतात हे चित्रण म्हणजे या सर्व नाटकातील विनोदावरील कळस म्हणावा लागेल.

बाकी नाटककाराची भाषा कमावलेली असून अनेक ठिकाणी योजलेली सूचक वाक्ये आणि प्रसंग यातून त्याची प्रतिमा स्पष्ट दिसून येते. हे नाटक लिहिताना त्यानी कुसुमाग्रजाचे 'दुसरा पेशवा' हे नाटक डोळयापुढे ठेवले असावे असे दिसते. फरक इतकाच की कुसुमाग्रजानी चेहरे असलेले व्यक्तिचित्रण केले आणि यांनी बिनचेहऱ्याचे ! महेश आणि खाशावा याच्याकडे ते इतके दुर्लक्ष न करते तर उमेबरोबरच ही पात्रे सरस आणि सकस झाली असती. एकूण या नाटकात उमेशिवाय कुठल्याच पात्राला नाटककाराने न्याय दिलेला नाही. आणि म्हणूनच हेतू आणि कथावस्तू चागली असूनही त्यांचा हा प्रयोग फसला आहे

**रत्नदीपातील तेलवाती !**

आता राहिले नाटकाच्या प्रयोगासंबधी. रेखा कामत यानी आपल्या समर्थ अभिनयाने उमेची भूमिका अप्रतिम उभी केली त्याच्या अभिनयापुढे दुसरे कुठलेच पात्र उभे राहू शकले नाही. चित्तरजन याचे काही प्रवेश वेधक वाटले, पण काही काही वेळा त्याच्या अगात गणोजी शिर्के सचारल्यासारखे वाटत होते. इतक आरडाओरडा कशासाठी ? चित्तरजनसारख्या जाणत्या कलावताने या नाटकात असा आणि अशाच तऱ्हेचा बराच गोधळ उडवून दिला हेही एक या नाटकाचे वैशिष्टचच ! पहिल्याच अकात "मी तुला अत्यत हीन वृत्तीने वागवीत होतो. सैतानानेही मला गुरू मानावे, अशा तऱ्हेची वागणूक मी तुला दिली" यावद्दल खत व्यक्त करताना, त्या प्रसंगाची स्मृतिचित्रे उभारताना आरडाओरडीची किंवा नायिकेच्या शरिराशी हिसडाहिसडी करण्याची काय आवश्यकता होती ? वास्तविक त्या हीनवृत्तीच्या जाणिवेने नायक अत्यत व्यथित आणि शरमिंदा झालेला. अशा ठिकाणी चित्तरजनसारख्याकडून अशा तऱ्हेच्या अभिनयाची कल्पनाच असह्य वाटते. दुसरी अगदी सहज डोळयात भरणारी चूक अशी की, ज्या सती वृंदावनाचे सामर्थ्य आणि पावित्र्य हे इनामदार घराणे डोक्यावर घेऊन नाचवीत आहे, त्याच्या आसपास कोल्हटकर खुशाल चप्पल घालून वावरत होते ! ते सारीपाट सुद्धा चप्पल न काढताच जमिनीवर खेळावयास बसले होते. श्री शकर घाणेकर यानी आपली भूमिका सरस वठविली. पण ग्रामीण भाषा त्याना म्हणावी इतकी पेलली नाही. एवढा अपवाद सोडल्यास, या वेळी त्यानी अत्यत संयमाने काम करून चुटपुट लावली. लीला मेहतांची भूमिकाच ठिसूळ तेव्हा त्याना अभिनयकौशल्य दाखवायला हवा तसा वावच मिळाला नाही. राजा करबेळकर यानी प्रतापची छोटी भूमिका चागली केली आहे पाटील यानी उभा केलेला गुरुजी ठीक होता पण त्याची पुराणपुरुषी वेशभूषा थोडी खटकली. श्री. भालचद्र रणदिवे हे या नाटकाचे दिग्दर्शक. त्यानी केलेले डॉक्टरचे काम अत्यत ढिसाळ वाटले. राहिले मधू आपटे. त्यानी थोडा हशा पिकवला, श्री. पांडुरग कोठारी यानी नेपथ्याची बाजू छान संभाळली होती. श्री. राम मेटे याचे पार्श्वसगीत बरे होते.

या नाटकात या नाटकाच्याच पुस्तकप्रकाशनाचा आणखी एक न लिहिलेला प्रवेश केला गेला. अध्यक्ष ग. दि. माडगूळकर यानी अध्यक्षाची भूमिका यापूर्वी बरेच वेळा केली असल्यामुळे ह्यावेळीही त्यानी ती सरस वठविली. आपल्या अध्यक्षीय भाषणात या नाटकासंबधी त्यानी पद्धतशीर मौन पत्करले आणि जाता जाता नवनाटचाला चार दोन टपला मारीत ते या नाटकाच्या आणि नाटककाराच्या हेतूसबधाने बोलले. श्री. माडगूळकरानी भाषणात जे गौरविले त्याचा मागमूस प्रेक्षकाना पुढच्या अकातून लागेना. आपल्या भाषणात त्यांनी असे सागितले की, "जे चित्रपटात चालते तेच बहुधा रगभूमीवर चालेल !" इथेच सगळा घोटाळा आहे. या घोटाळयाचे प्रात्यक्षिक पाहायला मिळाले हा एक चागला योग या नाटकाने लाभला इतकेच ! ●

## मंत्री आणि कीर्तनकार

एका मोठया शहरी काही महिन्यांपूर्वी सोनोपंत दाडेकरांचे व्याख्यान ठरले होते. ते तेथून ५ मैलावरील एका खेडेगावात स्नेह्याचे घरी उतरले होते. तेथे सभेच्या १ तास अगोदर मोटार मागविली होती. मोटारीची वाट पहात सोनोपत बैलगाडीतून त्या सभेच्या जागी आले. ते पाहून कार्यकर्त्यांना थोडीशी लाज वाटली.- तुम्ही का आला ? आम्ही मोटार आत्ताच पाठविणार होतो. आमच्या शहरात सभेला दिलेल्या वेळेपेक्षा १ तासाने उशीरा सुरवात करावी असे नामदार मंत्र्यांनी सागितले आहे. कारण श्रोते जमण्यात वेळ जातो. सोनोपत म्हणाले, 'ते तुमचे सर्व ठीक आहे तुमचे मत्रीही मोठे आहेत. पण माझ्या सभेला श्रोते जमण्याची काही अडचण नसते. वेळेच्या अगोदर तासभर ते येत असतात.'





# याचें श्रेय तुम्हांलाच आहे.

बेडेकर लिंबू लोणच्याला आणि रसलिंबूला इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्चतर्फे बंगलोर येथें जानेवारींत भरलेल्या प्रदर्शनांत प्रथम पारितोषिक मिळालें. बेडेकरांच्या लोकमान्य उत्पादनांवर राजमान्यतेचें शिक्कामोर्तब झालें. या सर्वांचें श्रेय तुम्हांला-आमच्या चिकित्सक ग्राहकांनाच आहे. उत्कृष्ट तेंच घेऊं हा तुमचा हट्ट ! आणि उत्कृष्ट तेच पुरवूं हेच आमचें ध्येय !


बेडेकर उत्पादनें—उत्कृष्टपणाची एक हमीच.






**बेडेकर मसालेवाले**
**मुगभाट मुंबई ४**

शाखा—ठाकूरद्वार, फोर्ट, परेल, दादर, पेरूगेट पुणें.



जंगली परंपरेतील

'शक्ति' चित्र

# काश्मिर की कली

## एक शर्मिला आणि एक गोरिला !

### कुणीतरी चांगला दिग्दर्शक हिच्या देणग्याचे चीज करील काय ?

काश्मिर की कली' हा चित्रपट पाहावयास जाताना मनावर एक गुंगी होती ती 'जंगली' या चित्रपटाची. 'जंगली' चित्रपट त्याच्या सर्व दोषांसह सांगायचे तरी एक मनोरंजक चित्रपट होता. मनाला कुठे तरी जाऊन तो भिडला. या हिशेबात हा चित्रपट त्या चित्रपटाच्या आसपास येईल असे वाटले होते. दुसरे आकर्षण होते ते शर्मिला टागोर या हिंदी चित्रपटात प्रथमच येणाऱ्या बंगाली तारकेचे !

चित्रपट उलगडू लागला व शम्मी कपूरने एका गिरणीच्या रौप्यमहोत्सवात कामगारांना वीसपंचवीस लाखांची खिरापत वाटून आपल्या गिरणीच्या मॅनेजरला आणि मातोश्रीला पेचात टाकले. वाटले हा चित्रपट फार्सिकल ठरून आता नीट वळणाला लागला. हळूहळू गुंगी साफ उतरली. पहिल्या एका हशातच शम्मी कपूरला सरळ दोन पायावर उभा राहिलेला पाहिला. त्यानंतर त्याचा जो गोरिला झाला तो चित्रपट संपेपर्यंत !

शर्मिला टागोरने काश्मिरमधल्या एका माळणीचे काम केले असल्यामुळे ह्या गोरिला गिरणीमालकाला काश्मिरात जाणेच भाग होते. या गोरिलाला शर्मिला भेटते. तो प्रेमात पडतो...आणि त्याचा डोक्याचा स्क्रू उडाल्यासारखा धांगडधिंगा सुरू होतो.

मखमलीच्या पडद्यावर माकडाने उड्या माराव्या त्याप्रमाणे काश्मीरच्या निसर्गरम्य पार्श्वभूमीवर हा गोरिला कधी दोन्ही पाय वर करून, कधी पाठीवर होडीसारखा हात पाय ताणून... गाणी वगैरे म्हणतो व शर्मिलेचे प्रियाराधन करतो.

**कथानक :**

कथानक सांगायचे राहिलेच. शर्मिला ही खरी गिरणीच्या मालकिणीची मुलगी असते. तिला एक दारूच्या व्यसनाधीन झालेला माणूस ( नासिरहुसेन ) लहानपणीच पाळण्यातून पळवतो व या माणसाचीच बहीण शर्मिलेच्या घरी नोकराणी असल्यामुळे तिच्यामार्फत आपला गोंडस मुलगा त्या घरात पाठवतो. शर्मिलेला घेऊन हा दारुडा काश्मिरात जातो. मुलीला पळविताना काटेरी कुंपणावर पडून त्याचे डोळे जातात. असल्या अवस्थेत तो शर्मिलेला मोठी करतो व तिच्याच जिवावर जगतो. "जगाच्या पाठीवर" या राजाभाऊंच्या चित्रपटातला तुकडा इथे टाकलेला आहे. आतापर्यंत संगीतात चोरलेले तुकडे टाकीत असत; आता हिंदी चित्रपटांत कथानकाचे पण तुकडे दिसू लागले आहेत.

अर्थात हा दारुडा म्हणजेच शम्मीचा बाप व लहानपणचा तो गोंडस मुलगा म्हणजेच आतां गिरणीमालक झालेला हा गोरिला... हे चतुर हिंदी सिनेमा रसिकांनी ओळखले असेलच......शर्मिला शम्मीच्या प्रेमात विघ्न घालायला एक खलनायक (प्राण) असतोच. याचा मुख्य उपयोग चित्रपटाच्या शेवटी शम्मीशी एक भयानक ठोकाठोकी करण्या-

करता मुख्यत: होतो. ही मारामार पडद्यावर जवळजवळ वीस मिनिटे चालू असते. एका धरणावर ट्रॉलीला लोंबकळून ठोकाठोकी होते; डोंगरावर गडबडा लोळणे होते...रस्त्यावर होते...अगदी कंटाळा येईपर्यंत रक्ताचा एक थेंब न सांडता भयानक आवाजासह मारामारी रंगते.

काश्मिरात हा गोरिला एका आंग्ल पद्धतीच्या बारमध्ये जातो. का जातो ? जातो...! तेथे एक सेक्साफोन वाजवणारा माणूस आंग्ल संगीताचे सूर काढीत असतो. त्यामुळे गोरिलाला शांती लाभते. या बारची दृश्ये पाहताना हसावे की रडावे कळत नाही.

**अभिनय :**

रंजन बोस नावाच्या कुणा माणसाची ही कथा शक्तीसामंतांनी दिग्दर्शित केली आहे. दिग्दर्शन म्हणजे नेमके काय केले ते राम जाणे.

अनुपकुमार ( 'चलती का नाम गाडी' मधील अशोककुमार यांचे तृतीय बंधू ) व धुमाळ हे विनोदी कामे करतात. धुमाळ हा गोरिलाच्या काश्मिरातील बंगल्याचा मॅनेजर. इथे 'कम् सप्टेंबर' मधील तुकडा टाकलेला आहे. अनुपकुमार हा गोरिलाचा मित्र असतो. शम्मीकपूर पण त्याची बायको होऊन बुरखा पांघरून धावत्या ट्रकमधे तरुण पोरीत धुडगूस घालतो. तेव्हा पठाणाचे काम हा अनुपकुमार चांगले करतो.

**शर्मिला टागोर :**

शर्मिला टागोरविषयी सांगायचे तर हिचा चेहरा सुरेख आहे. गालाला खळण पडतात, हसते गोड. नाक चाफेकळी आहे. वयाने १७।१८ दिसते. 'काश्मिरकी कली' वाटते. परंतु तिच्याबरोबर दृश्यात तो गोरिला आला की ती शापित ऊर्मिलेसारखी दिसू लागते. शम्मीच्या धांगडधिंग्यात...सायराबानू एवढी ही काही समरस होऊ शकत नाही. अशा चित्रपटाकरता या तारकेची घडणच दिसत नाही. कुणीतरी चांगला दिग्दर्शकच हिच्या देणग्यांचे चीज करील अशी आशा करू या.

ओ. पी. नय्यर यांचे संगीत 'जंगली' व 'फिर वही दिल' परंपरेतील आहे. गाणी बरी वाटतात. बाकी सर्व...छायाचित्रण वगैरे अंगेही ठीक आहेत.

—महेश

• • •






लुइसे रेने

## अकाली प्रसिद्धीचे दु:ख





लागोपाठ दोन वर्षे 'ऑस्कर' पारितोषिकांचा मान पटकावणारी एकमेव नटी म्हणजे लुइसे रेने ! १९३६ साली 'दि ग्रेट झीगफेल्ट' आणि १९३७ साली 'दि गुड अर्थ' या चित्रपटातून तिने केलेल्या अप्रतिम भूमिकांबद्दल तिने 'ऑस्कर' पटकावले होते. त्यावेळचा अनुभव सांगताना ती म्हणते—

'माझ्या काळी चित्रपटातून काम करणे म्हणजे कारखान्यात काम करण्यासारखे होते. आम्ही म्हणजे एक यंत्रच होतो. आणि आम्हांला कसलेही हक्क नव्हते." रेनेने आता पन्नाशी ओलांडलेली आहे. लंडनमधील बेलग्राव्हिआसारख्या सुखवस्तू भागात आपल्या पतीबरोबर ती सध्या रहात असते. तिचे पती पुस्तकप्रकाशनाचा व्यवसाय करतात. फ्रान्सेस्का नावाची सतरा वर्षांची मुलगी आणि दोघे नवराबायको असा त्यांचा आटोपशीर संसार आहे. विशी ओलांडण्याच्या आतच रेनेने 'ऑस्कर' पारितोषिके पटकावली होती. त्याबद्दल बोलताना ती म्हणते, "मला फार लवकर प्रसिद्धी मिळाली हे फार वाईट झाले. एकदा 'ॲकॅडमी' अवॉर्ड मिळाले की पुढील बोलपटांतील भूमिकांतून चुका करण्याची संधी कलावंत गमावून बसतो."

'गुड अर्थ' चित्रपटातील तिचे चिनी नायिकेचे काम हेच तिचे चिरस्मरणीय काम आता ठरणार आहे.

इये मराठीचिये नगरी...
एक नवल कथा !

स्वातंत्र्यदिनाच्या सुमुहूर्तावर
ऑगस्ट १९६४ चा 'माणूस'
जनता–विशेषांक म्हणून
आपल्या भेटीस येत आहे.

**माणूस**

## या अंकात....

- **काळदरीचा सर्जाबा....**

  शिवचरित्रकार बाबासाहेब पुरंदरे यांनी सांगितलेली एका रामोशाची कथा.

- **वाटुली पाहता शिणले डोळुले...**

  संतसाहित्याचे व्यासंगी श्री. रा. चिं. ढेरे यांच्या लेखणीतून उतरलेली संत नामदेव यांची कथा आणि व्यथा.

- **मराठीचे माहेरी....**

  मराठवाड्याच्या अंतरंगाचे श्री. रा. शं. नगरकरांना झालेले दर्शन.

- **मी इथे व्यथालयांत दुःख सांगतो तुला....**

  नागपूरचे श्री. आनंद फुले यांनी पुण्यामुंबईकडील साहित्यक्षेत्रातील चितारलेले काही चेहरे.

- **कळी....**

  दारिद्र्याच्या क्रूर पावलाखाली चुरडल्या जाणाऱ्या एका कळीची श्री. राम पेठे यांची गोष्ट.

- **नाझी भस्मासुराचा उदयास्त....**

  श्री. रा. म. शास्त्री यांच्या हिटलरवरील लेखमालेचा तिसरा हप्ता.

- **आणि....**

  मराठीतील विनोदी लेखक श्री. द. मा. मिरासदार, 'यावेळी तुम्हाला काय द्यावे?' याच विचारात आहेत.

  या शिवाय माहितीपूर्ण आणि विनोदी चौकटी, कविता, चित्रपट वगैरे नेहमीची सदरे.

# क्रांति

ऑगस्ट हा महिना एक पुरुषार्थाचा महिना म्हणून समजला जातो.

जागतिक इतिहासाला कलाटणी देणाऱ्या अनेक महत्त्वपूर्ण घटना घडून आल्या त्या याच महिन्यात.

१७ वर्षांपूर्वी—दिनांक १५,ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला, ही ऑगस्ट महिन्यातील महत्त्वपूर्ण घटनांच्या मालिकेतील अशीच एक क्रांतिकारक घटना.

'माणूस' मासिकाने यंदाचा पंधरा ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन एका अत्यंत अभिनव आणि क्रांतिकारक पद्धतीने साजरा करण्याचे ठरविले आहे.

कारण, या स्वातंत्र्याची धुरा आपल्या समर्थ खांद्यावर एकाकी वाहणारा, स्वतंत्र भारताचा पहिला शिल्पकार आपल्यातून निघून गेला आहे आणि आमजनतेने, व्यक्ति-व्यक्तीने आपापल्या जबाबदारीचा अल्पस्वल्प वाटा स्वीकारून, स्वातंत्र्यरक्षणाचा व संवर्धनाचा गोवर्धन उचलून धरण्याचे सामुदायिक जबाबदारीचे पर्व आता सुरू होत आहे.

'माणूस' ची क्रांतिकारक योजना अशी :

१ : ऑगस्ट-अंक 'जनता विशेषांक' म्हणून प्रसिद्ध होईल.

२ : याचे स्वरूप नेहमीच्या अंकाप्रमाणेच विविधतापूर्ण, रंजक, बोधक आणि आकर्षकअसेल.

३ : पृष्ठसंख्याहि जवळजवळ नेहमीचीच.

४ : प्रसिद्धी दिनांक १४ ऑगस्ट.

आणि 'क्रांति' ही की

५ : या जनता अंकाची किंमत

फक्त चार आणे.

काय ? नेहमीसारखे मासिक आणि चार आण्यात ?

होय, पूर्ण विचारांती 'व्यवस्थापक माणूस मासिक' असे जाहीर करीत आहेत की, या जनता अंकाची किंमत फक्त चार आणे. केवळ नये पंचवीस पैसे राहणार आहे.

अभिरुचीसंपन्न साहित्याच्या प्रसाराचा आणि विक्रीचा एक नवा उच्चांक प्रस्थापित करण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे.

वाचक या जनता अंकाचे भरपूर प्रमाणात सक्रिय स्वागत करतील असा विश्वास आहे.

१५ १५० १५०० १५०००

'१५ ऑगस्ट' 'माणूस' अंकाचा
१५ हजार मराठी कुटुंबात प्रवेश !
मासिक १५० रुपयावर उपजीविका करणाऱ्या
गरीब कारकून-कामगार शिक्षकापासून
मासिक १५०० रुपयांची प्राप्ति असणाऱ्या
इंजिनियर-डॉक्टर इत्यादि वरीष्ठ मध्यमवर्गीयांपर्यंत
सर्व थरातील, सर्व क्षेत्रातील,
महाराष्ट्राच्या सर्व विभागातील

# आ म ज न ते ला

रूचेल, पटेल आणि सहज परवडेल
असा अत्यल्प किंमतीचा
आणि अमोल साहित्याचा
बहुगुणी आणि बहुढंगी
१५ ऑगस्ट १९६४ चा
'माणूस'

# ज न ता वि शे षां क

[ अधिक माहितीसाठी याच पृष्ठाच्या मागील बाजूस पाहावे ]